मराठीतून विश्ववाङ्‌मयाकडे

टॉलस्टॉय	तीन दीर्घ कथा	पंढरीनाथ रेगे
टॉलस्टॉय	कथा	गुरुवर्य बा. ग. जगताप
चेखव	सात कथा	सुमती कानिटकर
चेखव	आठ दीर्घ कथा	सुमती कानिटकर
दस्तयेवस्की	कारमाझफ बंधू	भाऊ धर्माधिकारी
दस्तयेवस्की	काकांचे स्वप्न	अविनाश बिनीवाले
दस्तयेवस्की	शापित कोझाकीण	अशोक डांगे
दस्तयेवस्की	समीक्षा	अनिरुद्ध कुलकर्णी
दस्तयेवस्की	गुन्हा आणि प्रायश्चित्त	का. बा. कोनकर
बाल्झाक	अजेनी ग्रांदे	श्री. मा. भावे
शेक्सपीयर	सुनीते	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	हॅम्लेट	परशुराम देशपांडे
शेक्सपीयर	राजमुकुट	वि. वा. शिरवाडकर
फ्लोबेर	मादाम बोवारी	जयंत धुपकर
नासर	सुंदर ते मन	कमलिनी फडके
स्टाईन	बिकट वाट	व्यंकटेश माडगूळकर
जिब्रान	प्रेषित	श्रीपाद जोशी
जिब्रान	तुटलेले पंख	मनोहर शहाणे

आमच्या प्रकाशनांची सूची विनामूल्य मागवा

कॉन्टिनेन्टल

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०

टॉलस्टॉयच्या कथा



अनुवाद : गुरूवर्य बा. ग. जगताप

टॉलस्टॉयच्या कथा

कै. गुरुवर्य बा. ग. जगताप

कॉन्टिनेन्टल
विजयानगर, पुणे ४११०३०.

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ४११०३०.

टाईप संटिंग : सुप्रिया जोगदेव
स्नॅप आर्टस्, पुणे ४११०३०.

मुद्रक : आनंद लाटकर
कॉम्प्रिंट कल्पना
टिळक रोड, पुणे ३०.

मुखपृष्ठ : अशोक बोकील

रेखाचित्रे : कै. चित्रकार मुळगांवकर

प्रकाशन क्रमांक : १४०६

टॉलस्टॉयच्या कथा

प्रथमावृत्ती : १९३४
आवृत्ती दुसरी : १९४०
आवृत्ती तिसरी : १९४८
आवृत्ती चवथी : १९५३
आवृत्ती पाचवी : १९६०
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
नवी आवृत्ती सहावी : २००८

किंमत : पंचेचाळीस रुपये

पाचव्या आवृत्तीच्या निमित्ताने

जगात राहावे कसे ही एक मोठी कला आहे. संत ही कला मनुष्यास शिकवीत असतात, परंतु मनुष्य ती लवकर शिकत नाही. आज शिकलेले तो उद्या विसरतो व म्हणून संतांना त्याला नेहमी नेहमी शिकवावे लागते. ख्रिस्ताने हा घडा आपल्या रक्ताने लिहिला, परंतु तो फारच थोड्यांनी गिरविला. ख्रिस्तापूर्वी अनेकांनी तो घडा दिला होता. ‘मी नवे काही शिकविण्यास आलेलो नाही’ असे ख्रिस्ताने अनेक वेळा म्हटले आहे. टॉलस्टॉयने ख्रिस्ताचा उपदेश जगाला सांगण्याचा पुन: प्रयत्न केला. टॉलस्टॉयचे ग्रंथ अनेक भाषांत अनुवादले गेले असून सर्व जगावर त्याचा परिणाम झाला.

टॉलस्टॉय यांना रशियाचे गांधी म्हणून मानतात. टॉलस्टॉयच्या शिकवणीचा महात्मा गांधींच्या जीवनावर फार मोठा परिणाम झाला आहे. वाईटाचा तिटकारा करून ते जगातून नाहीसे करता येत नाही. प्रेम, सहानुभूती दिल्यानेच सुधारणा होत असते. ‘अहिंसा’ हेच दोघांच्या शिकवणीचे सार आहे. प्रत्येक गोष्टीत शिकवण आहे. ती लक्षात घ्या. व ती आपल्या आचरणात आणा.

१९३४ साली ‘टॉलस्टॉयच्या गोष्टी’ आम्ही प्रथम प्रसिद्ध केल्या. आज पुस्तकाची पाचवी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. कागद व छपाई महागली असताही किंमत पूर्वीचीच ठेविली आहे. अनेकांना पुस्तकाचा लाभ व्हावा ही इच्छा.

सर्वोदय प्रेसचे व्यवस्थापक श्री. व्यं.रा. शिंगरे यांनी पुस्तकाची छपाई उत्तम केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहो.

अनुवादक : बा. ग. जगताप.

वर्ष प्रतिपदा, ता. २८.३.६०

१२४८, शुक्रवार पेठ (जुना)
१४६ व १४८ गुरुवार पेठ (नवा)
मामलेदार कचेरीसमोर, पुणे ४११०४२.

सहाव्या आवृत्तीच्या निमित्ताने..

काउन्ट लिओ टॉलस्टॉय हा माझ्या आजोबांचा - कै. ती. बाबूराव जगताप यांचा आवडता लेखक. जहागिरदार घराण्यात जन्मास येऊनही टॉलस्टॉय अन्यायाविरुद्ध झगडणारा व माणुसकीचा गहिवर असणारा थोर लेखक होता. त्याच्या साहित्यात तत्कालीन रशियन समाजाच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे. अशा या प्रतिभावान लेखकाच्या लेखणीतून उतरलेल्या काही बोधप्रद आणि वास्तववादी कथांचा अनुवाद माझ्या आजोबांनी १९३४ साली पुस्तक रूपाने मराठी भाषेत प्रथम प्रसिद्ध केला. सुमारे पंच्याहत्तर वर्षांपूर्वी प्रकाशात आलेल्या या गोष्टींचे स्वागत लहान थोरांनी इतक्या उत्साहात केले की, या पुस्तकाच्या नंतरच्या पंचावन्न वर्षांत पाच आवृत्त्या निघाल्या. यातच या कथांच्या अवीट गोडीचे प्रत्यंतर येते.

आपल्या अवतीभोवती दैनंदिन जीवनात ज्या काही शुभाशुभ, लहान सहान घटना घडत असतात त्यातून प्रत्येकाला बरेच काही शिकण्यासारखे असते. किंबहुना या घटना हाच आपल्या जीवनाचा शिक्षक आहे, असेच टॉलस्टॉयला सूचित करायचे आहे.

२० नोव्हेंबर २०१० रोजी या थोर रशियन लेखकाची व विचारवंताची शंभरावी पुण्यतिथी येत आहे. याचे औचित्य साधून आज या चिमुकल्या कथासंग्रहाची सहावी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे. माझ्या दिवंगत पितामहांना अर्पित केलेली ही एक श्रद्धांजलीच आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. माझ्या आजोबांनी मराठीत प्रथमच शब्दबद्ध केलेल्या या कथा पुष्पाचा स्वीकार लहान-थोर वाचक सारख्याच उत्सुकतेने व आनंदाने करतील यात तिळमात्र संदेह नाही.

- जयसिंग ज. जगताप

'गीता निवास' १४६+ १४८ गुरुवार पेठ
मामलेदार कचेरीसमोर.पुणे ४११०४२. दूरध्वनी : २४४९१९६६

कथानुक्रम

: १ :

मुलांपासून तरी शहाणपणा शिका.



ईस्टरच्या सणाचे दिवस होते. कुठे कुठे बर्फ अजून दिसत होता. पाण्याचे ओघळ वाहत रस्त्यावर आले होते.

एका लहानशा रस्त्यावर लहानसे पाण्याचे डबके साचले होते. शेजारच्या दोन घरांतून दोन लहान मुली त्या डबक्याजवळ आल्या. .त्यांच्या आयांनी त्यांना नवे कपडे घातले होते. सणामुळे त्या मुली आपल्या घरच्या मंडळींबरोबर देवळात गेल्या होत्या.व नुकत्याच परतल्या होत्या.दोघींनी आपले नवे कपडे एकमेकींना दाखविले व नंतर त्या खेळू लागल्या. खेळता खेळता त्यांच्या डोक्यात, 'पाणी उडवावे' हा विचार आला. धाकटी मुलगी जोड्यांसुद्धा त्या

डबक्यामध्ये शिरण्याच्या विचारात होती, इतक्यात थोरली तिला म्हणाली, ‘मालशा, पाण्यात जाऊ नकोस, अग, तुझी आई तुला रागे भरेल. मी माझे बूट व पायमोजे काढते व तूही आपले बूट व पायमोजे काढ.’

झाले ! दोघींनी आपापले बूट व पायमोजे काढले व आपले अंगावरचे कपडे आवरून त्या दोघी पाण्यात शिरल्या. पाणी मालशाच्या घोट्यापर्यंत लागले.

‘ अग बाई, पाणी बरेच खोल आहे. आकुला मला बाई भीती वाटते.’

‘ अग, भीती कसली ? घोट्यापेक्षा जास्त काही पाणी नाही ’ दुसरी म्हणाली.

त्या दोघी एकमेकींजवळ आल्या.

‘ मालशा, नीट चल. असं पाणी उडवू नकोस. ’ इतके आकुला म्हणते तोच मालशाने आपल्या पायाने आकुलाच्या अंगावर पाणी उडविले. ते खराब पाणी आकुलाच्या झबल्यावर उडाले, इतकेच नव्हे तर तिच्या तोंडावरही उडाले. आपले झबले खराब झालेले पाहून आकुलास फार राग आला. आणि ती मालशाच्या मागे तिला मारण्याकरिता धावली. आता आपलेही कपडे खराब होणार , असा विचार मनात येऊन मालशाही घाबरली. ती लगबगीने त्या डबक्यातून बाहेर आली व घरी पळून जाऊ लागली.

योगायोग असा की, याचवेळी आकुलाची आई त्या बाजूने जात होती. आपल्या मुलीचे नवे कपडे खराब झालेले पाहून ती ओरडली, ‘ काय घाणेरडी कार्टी ही ! काय ग केलंस हे ? ’

‘मालशाने मुद्दाम माझ्या अंगावर पाणी उडविले ’, तिने उत्तर दिले.

मुलीचे हे उत्तर ऐकल्याबरोबर तिने मालशाला धरले व तिच्या मानेवर एकदोन चापट्या लगावल्या. मालशाने एवढ्या मोठ्याने भोकाड पसरले की, सगळी आळी दणाणून गेली. अर्थात मालशाची आई, काय झाले म्हणून

पाहण्याकरिता बाहेर आली.

‘काय ग बया, माझ्या पोरीला मारतेस ?’ ती म्हणाली व आपल्या शेजारणीला शिव्या देऊ लागली. शब्दाने शब्द वाढला व त्या भांडू लागल्या. पुरुषही बाहेर आले व रस्त्यावर एकच गर्दी जमली. जो तो ओरडू लागला व कोणी कोणाचे ऐकेना. बाचाबाची होता होता धक्काबुक्कीस सुरुवात झाली व शेवटी मारामारीवर प्रकरण आले. इतक्यात आकुलाची म्हातारी आजी बाहेर आली व लोकांना शांत होण्याबद्दल विनंती करू लागली. कोणीही त्या म्हातारीचे ऐकेनात. एकदा दोनदा तर त्या गर्दीत तीच पडायची !

इकडे भांडण अगदी रंगात आले. तिकडे आकुलाने आपल्या कपड्यावरचा चिखल पुसून टाकला व एक दगड घेऊन ती त्या डबक्याजवळ गेली. आणि दगडाने जमीन उकरून डबक्याचे पाणी लहानशा पाटाने रस्त्याकडे आणण्याचा प्रयत्न करू लागली.

मालशाही तिला येऊन मिळाली. तिने एक लाकडाची ढलपी घेतली व आकुलास तिच्या कामात मदत करू लागली.

इकडे थोर मंडळी अगदी हातघाईवर आली, तर दुसरीकडे या लहान मुलींनी पाण्याचा पाट पाडून , तो थेट जेथे मंडळी भांडत होती तेथे आणला. पाणी वाहू लागल्याबरोबर मुलींना अत्यानंद झाला व त्या दोघी प्रवाहाच्या दोन्ही बाजूंनी धावू लागल्या आणि आनंदाने ओरडू लागल्या.

‘जाऊ दे ! मालशा, जाऊ दे पाण्याला ! ’ आकुला ओरडली. मालशालाही इतका आनंद झाला की, तिला बोलता येईना ! या दोघी मुली पाण्याच्या प्रवाहाबरोबर माणसांच्या गर्दीपर्यंत आल्या.

त्या म्हाताऱ्या आजीने त्यांना पाहिले व ती लोकांना उद्देशून म्हणाली –

‘अरे, तुम्हाला लाजा वाटत नाहीत काय ? त्या मुलींचे भांडण तुम्ही होऊन आपल्या अंगावर घेतलेत. त्या आपल्या भांडण विसरल्या आणि परत

खेळूही लागल्या. या माझ्या छकुल्या, तुम्हापेक्षा शहाण्या नाहीत काय ? '

सर्व माणसे त्या मुलींच्याकडे पाहू लागली. लाजेने त्यांनी माना खाली घातल्या आणि स्वत:च्या मूर्खपणास हासत ती आपापल्या घरी गेली.

अस्सं परत फिरून लहान मुलं झाल्याशिवाय तुम्हाला परमेश्वर भेटणार नाही.

: २ :

ही सुध्दा केवढी खर्चाची बाब आहे !



भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावर फ्रान्स व इटली या देशांच्या सरहद्दीजवळ मोनॅको या नावाचा एक देश होता. या देशाची लोकसंख्या फक्त सात हजार होती. या लहानशा देशात एक लहानसा संस्थानिक राज्य करीत असे. त्याचा एक राजवाडा होता. त्याचे पदरी सरदार होते, दरकदार होते, धर्माधिकारी तसेच सेनापतीही होते, शिवाय सैन्यही होते. एखाद्या बलाढ्य राजाप्रमाणे याचाही थाटमाट होता.मात्र सैन्य काही मोठे नव्हते, फक्त साठ शिपाईच. तरी

पण ते सैन्यच होते की नाही ? इतर देशांप्रमाणे इथेही कर होते. तंबाखूवर कर, दारूवर कर, त्याचप्रमाणे प्रत्येक माणसावर कर होता. दारू पिणारे व तंबाखू ओढणारे लोक इतर देशांप्रमाणे इथेही होते, परंतु ते फार थोडे असल्यामुळे केवळ त्यांच्यापासून मिळणाऱ्या कराच्या पैशावर राजाचा डामडौल चालणे शक्य नव्हते. व म्हणून राजाने जुगारावर एक कर बसविला होता. जुगाराचे अड्डे ठेवणाऱ्या माणसाला जेवढा नफा होत असे, त्यातून अड्डेवाल्यांना कर द्यावा लागत असे. युरोपमधील इतर काही देशांत हे अड्डे बंद केल्यामुळे जुगाराला या देशात ऊत आला होता. जुगारापासून अनेक तोटे आहेत हे समजून आल्यामुळे इतर देशांनी जुगार बंद केली होती. परंतु मोनॅकोच्या अधिपतींना कोण उपदेश करणार ?

ज्याला जुगार खेळावयाचा तो मोनॅकोला येऊ लागला. कोणी जिंको किंवा कोणी हरो, अधिपतींना प्राप्ती होत असे. जुगार वाईट आहे हे त्यांना कळत नव्हते, असे नाही, पण ते तरी काय करणार ? ' प्रामाणिकपणाने वागून कोणी राजवाडे बांधले आहेत काय ?' या म्हणीवर त्यांचा विश्वास होता. त्यांनाही जगावयाचे होते. इतर बलाढ्य राजांप्रमाणे आपला इतमाम चालावा असे त्यांना वाटे. इतरांप्रमाणे त्यांच्याही संस्थानात दरबार, कायदेकानू, कायदेमंडळे, न्यायासने वगैरे सर्व असत.

एकदा ह्या छोटेखानी राज्यात एकाने खून केला. त्यांच्या संस्थानात लोक शांतताप्रिय असल्यामुळे आजपर्यंत असे कृत्य कोणीही केलेले नव्हते. सर्व न्यायाधीशांची बैठक बसली व गुन्ह्याची चौकशी सुरू झाली. वकील, बॅरिस्टर, साक्षीदार सर्व गोळा झाले. अखेर गुन्हेगारास फाशीची शिक्षा द्यावी असे ठरले. अधिपतींपुढे त्यांनी आपला निकाल ठेवला. अधिपतींनीही शिक्षा कायम केली. 'जर गुन्हेगारास फांशी देणे जरूर आहे, तर फाशी दिलीच पाहिजे -' असे ते म्हणाले.

फक्त एकच अडचण होती. उभ्या राज्यात फाशी देणारा नव्हता की

फाशी देण्याचे साहित्यही नव्हते. प्रधान-मंडळाने विचार केला की, फाशी देणारा व फाशी देण्याचे साहित्य फ्रेंच सरकारकडून भाड्याने मागवावे व भाडे काय पडेल तेही विचारावे. पत्र पाठविले. एका आठवड्यात उत्तर आले. लागणाऱ्या साहित्याबद्दल सोळा हजार फ्रँक्स पडतील, असे कळविण्यात आले. हा पत्राला मिळालेला जबाब राजापुढे ठेवला. राजाने बराच विचार केला. सोळा हजार फ्रँक्स. ' त्या नीच गुन्हेगाराची एवढी किंमत काय ? थोडक्यामध्ये त्याला फाशी देता येणार नाही काय ? सोळा हजार फ्रँक्स म्हणजे माझ्या प्रजेला , प्रत्येक माणसी, दोन फ्रँक्स कर द्यावा लागेल. एवढा कर प्रजेला खात्रीने झेपणार नाही. कदाचित ते माझ्या विरुद्ध बंड करतील.' असे राजाने अखेर विचार करून ठरविले.

प्रधान - मंडळाची पुन: बैठक बसली व पुढे काय करावे, याचा विचार झाला. फ्रान्स हे लोकसत्ताक राज्य असल्यामुळे त्यास कोणत्याच राजाबद्दल आदर वाटत नाही व त्यामुळेच जबर भाडे त्याने मागितले असावे, असे मंडळास वाटले व इटलीकडून तेच साहित्य मागविण्यास पत्र लिहिण्याचे ठरले. इटलीमध्ये राजसत्ता असल्यामुळे भाडे कमी पडेल, असे प्रधान - मंडळास वाटले. एका आठवड्याने इटलीहून उत्तर आले. बारा हजार फ्रँक्स भाडे पडेल असे कळविण्यात आले.

हे भाडे जरा कमी होते, ही गोष्ट खरी. तरीपण पूर्वीप्रमाणे ते जबरच होते. त्या हरामखोराची खात्रीने एवढी किंमत नव्हती. पुन्हा मंडळाची सभा बोलावण्यात आली. एखादा शिपाई हे मारण्याचे काम करणार नाही काय ? असे एकाने सुचविले. सेनापतींना बोलावण्यात आले. ' या गुन्हेगाराचे डोके उडविण्यास एकादा सैनिक मिळणार नाही काय ? लढाईमध्ये बिनदिक्कत एकमेकांना ठार मारण्याचे काम चाललेले असते, आणि हेच शिक्षण या सैनिकांना दिलेले असते.' सेनापतीने सैनिकांची मुलाखत घेतली व या प्रश्नाचा विचार केला. परंतु हे काम करण्यास कोणीही तयार होईना. ' हे काम आम्हाला

करता येणार नाही व ह्याची शिकवणही आम्हास कधी दिली गेलेली नाही,' असे जो तो म्हणू लागला.

पुनः पंचाईत आली, प्रधान - मंडळाची बैठक बसली. त्याने या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक समिती नेमली व त्या समितीने पुन: एक पोट - समिती निवडली. अखेर फाशीची शिक्षा रद्द करून 'जन्मभर तुरुंगवास' ही शिक्षा देण्याचे ठरले. यायोगे राजाने गुन्हेगारावर दया दाखविल्यासारखे होईल व शिक्षा देण्यास खर्चही येणार नाही.

राजाला हा विचार पसंत पडला. व त्याप्रमाणे योग्य ती व्यवस्था करण्याचे ठरले. अडचण येवढीच की, राज्यात तुरुंगच नव्हता. तुरुंगासारखा जिचा काही वेळ उपयोग केला जात असे , अशी एक कोठडी होती. शेवटी जिचा तुरुंगासारखा उपयोग करता येईल अशी भक्कम जागा शोधून काढण्यात आली आणि तेथे त्या गुन्हेगारास ठेविले. त्यावर एक पहारेकरी शिपाई ठेविला. याच शिपायाने कैद्याचे जेवण आणावयाचे असे ठरले.

कैदी एक वर्षभर तुरुंगात राहिला. वर्ष झाल्यानंतर ज्यावेळी राजापुढे राज्याचे जमाखर्चाचे तक्ते गेले, त्यावेळी खर्चाची नवीन बाब त्याच्या दृष्टीस पडली. हा खर्च त्या कैद्यासाठी करण्यात आला होता. व बाबही दुर्लक्ष करण्याइतकी कमी खर्चाची नव्हती. पहारेकऱ्याचा पगार, शिवाय कैद्याचे जेवण एकूण खर्च ६०० फ्रँक्स आला. बरे, कैदी पाहावा तर अगदी तरुण, सशक्त. आणखी पन्नास वर्षे जगेल असा. त्याच्या हयातीचा खर्च लक्षात घेतला तर केवढा तरी होणार . हे कसं चालणार ? राजाने प्रधानांना पुन: बोलाविले.

'या गुन्हेगाराची वासलात काही निराळ्या मार्गाने लाविली पाहिजे. तुम्ही शोधून काढलेला मार्ग फार खर्चाचा आहे.' राजाने सांगितले. प्रधान-मंडळाने पुन: विचार केला. यांच्यापैकी एक जण म्हणाला, 'आपण पहारेकरी काढून टाकावा,' त्यावर दुसरा म्हणाला, 'मग कैदी पळून जाईल.' 'जाऊ द्या

गेला तर, औषधावाचून खरूज गेली.' पहिल्याने उत्तर दिले. शेवटी पहारेकरी काढून टाकण्याचा निर्णय ठरला. व तो राजाला कळविण्यात आला. पहारेकरी काढून टाकल्यावर काय होते आहे, हे पहाण्याकरिता सर्वांचे लक्ष लागून राहिले. जेवणाची वेळ झाली . कैदी आपल्या खोलीतून बाहेर आला. पहारेकरी नाही हे पाहून, जेथून त्याला पूर्वी जेवण येत असे त्या स्वयंपाकघरात तो गेला व त्याने आपले जेवण आणले, जे त्याला पूर्वी मिळत असे ते त्याने आता स्वत: जाऊन आणले. तुरुंगात पुन: आला व स्वत: तुरुंगाचे दार लावून घेऊन नेहमीप्रमाणे त्याने व्यवहार केला. जे पहिल्या दिवशी वर्तन केले, तेच दुसऱ्या दिवशी व पुढे तेच. तो पळून जाण्याचे कोणतेच चिन्ह दिसेना. पुनः प्रश्न पडला.

'आपण त्या कैद्याला स्पष्ट सांगू या की, आम्हाला तुला यापुढे तुरुंगात ठेवणे होणार नाही.' एकाने सुचविले व ते सर्वांना पटले. न्यायाधीशाने कैद्याला बोलावून आणिले व विचारले, 'तू पळून का जात नाहीस ? आता तुझ्यावर पहारेकरी नाही. तुला वाटेल तिकडे तू जा. राजेसाहेबांचे काही म्हणणे नाही.'

त्यावर कैदी म्हणाला, 'राजेसाहेबांचे काही म्हणणे नसेल, परंतु मी जाऊ कोठे ? मी करू काय ? तुम्ही मला शिक्षा देऊन माझी अब्रू घेतलीत. आता कोण मला दारापुढे उभा करील ? शिवाय काम करण्याची माझी सवय पार नाहीशी झाली. हा तुमच्या वागणुकीचा परिणाम. न्हे तुमचे वर्तन अगदीच अयोग्य होते. प्रथम तुम्ही मला देहान्त शासन देण्याचे ठरविले. त्याच वेळी माझे डोके उडवावयास पाहिजे होते, ते तुम्ही केले नाही. याविरुद्ध मी तक्रार केली नाही. नंतर मला जन्मभर तुरुंगवासाची शिक्षा दिलीत व माझे जेवण आणण्यास एक पहारेकरीही ठेवला. काही दिवसांनी तो पहारेकरी काढून टाकला व मला माझे जेवण आणणे भाग पडले, तरीही मी तक्रार केली नाही. आता तुम्ही तुरुंग सोडूनच जा म्हणता । ही गोष्ट मला बिलकूल पसंत नाही. तुम्ही या देहाचे वाटेल ते करा. परंतु मी तुरुंग सोडून जाऊ शकत नाही.'


पुन: एकदा मंडळ बसले. काय करावे, कैदी जात नाही. कर कर विचार केला. शेवटी कैद्याला पेन्शन द्यावे व जा म्हणून सांगावे असे ठरले. त्याप्रमाणे राजाला निर्णय कळविला. ६०० फ्रँक्स पेन्शन ठरले व कैद्याला त्याप्रमाणे कळविण्यात आले.

'तुम्ही हे ठरलेले पेन्शन नियमित देणार असाल तरच मी तुमचा हा निर्णय कबूल करतो '— असे कैद्याने उत्तर दिले. शेवटी या प्रकरणाचा कायमचा निकाल लागला. वार्षिक पेन्शनचा तिसरा हिस्सा कैद्याने आगाऊ मागितला. तो त्यास देण्यात आला. रेल्वेने पंधरा मिनिटांत राज्याच्या बाहेर जाऊन त्याने एक जमिनीचा तुकडा खरेदी केला. त्या शेतीवर भाजीपाला काढून आता तो बाजारात विकावयास आणीत आहे. व मोठ्या आनंदाने आपले दिवस तो घालवीत आहे. ठराविक वेळी राजवाड्यात जाऊन तो पेन्शन घेतो. जुगाराच्या अड्ड्यावर जाऊन जुगार खेळतो. कधी जिंकतो, कधी हरतो व मग घरी जातो. एकूण त्याचे आता ठीक चालले आहे.

ज्या देशामध्ये फाशी देण्यासाठी किंवा तुरुंगात ठेवण्यासाठी येणाऱ्या खर्चाची फिकीर बाळगीत नाहीत, अशा देशामध्ये तो जन्माला आला नाही, हे त्याचे सुदैवच समजावयाचे .

: ३ :

सुरत येथील खाणावळ



हिंदुस्थानात सुरत म्हणून एक गांव आहे. तेथे खाणावळीत वेगवेगळ्या भागांतून आलेले काही प्रवासी जमले आणि एकमेकांशी गप्पा मारू लागले.

यामध्ये पर्शियाचा पंडितही होता. या पंडिताने ईश्वराचे स्वरूप समजून घेण्यामध्ये आपले सर्व आयुष्य खर्च केले होते. त्याने या विषयावर पुष्कळ वाचन केलेले असून, लिहिलेलेही पुष्कळ होते. त्याने देवाविषयी इतका विचार, वाचन व लेखन केले होते की, शेवटी त्याच्या बुद्धीला भ्रम झाला. त्याच्या विचारांचा इतका गोंधळ झाला की, परमेश्वरावरील त्याचा विश्वासही उडाला. पर्शियाच्या शहाने यामुळे त्याला पर्शियामधून घालवून दिले. लोक त्याला वेडा म्हणून समजावयास लागले, परंतु या जगताला शास्ता कोणी नाही,

अशी त्याची समजूत झाली.

या पंडिताचा एक गुलाम होता. तो आफ्रिका खंडातील राहणारा होता. तो सदासर्वकाळ आपल्या मालकाबरोबर असे. पंडित जेव्हा खाणावळीत शिरला तेव्हा तो गुलाम बाहेर दरवाज्याजवळ, उन्हामध्ये एका दगडावर बसून आपल्याभोवती घों, घों, करणाऱ्या माशांना मारत होता. पंडित खाणावळीत एका पाटावर बसला व त्याने एक अफूचा पेला खाणावळवाल्यास मागितला. (त्यावेळी चहाप्रमाणे अफूचे पाणी करून पिण्याची वहिवाट होती असे दिसते.) अफू घेतल्यानंतर तिचा अंमल हळूहळू पंडितावर चढू लागला व तो बसल्याबसल्याच बाहेर असलेल्या आपल्या गुलामाशी बोलू लागला.

' अरे गुलामा, ईश्वर आहे असे तुला वाटते काय ?'' '' होय तर '' असे म्हणून त्या गुलामाने आपल्या कमरेच्या पट्ट्यामधून एक लाकडाची मूर्ती काढली व म्हणाला, '' हा पहा देव. याने माझ्या जन्मापासून माझे रक्षण केले. आमच्या देशामध्ये प्रत्येक मनुष्य निर्जीव झाडाचे पूजन करतो व त्याच झाडाची ही मूर्ती केलेली आहे.''

हे मालकाचे व नोकराचे चाललेले भाषण जमलेली मंडळी मोठ्या आतुरतेने ऐकत होती. धन्याचा प्रश्न व त्याला नोकराने दिलेले उत्तर, या दोहोंचे त्यांना आश्चर्य वाटत होते. त्यांपैकी एक ब्राह्मण होता. गुलामाचे उत्तर ऐकून तो त्याकडे वळला व म्हणाला, '' अरे दुर्दैवी मूढा, देव असा कमरेला गुंडाळता येईल काय ? देव एकच आहे आणि तो ब्रह्म आहे. तो ह्या जगापेक्षा मोठा आहे, कारण त्यानेच हे जग निर्माण केले आहे. ब्रह्म हाच एक वरिष्ठ देव असून त्याचे सन्मानार्थ गंगेच्या काठी देवळे बांधलेली आहेत. व तेथे ब्राह्मण त्याची पूजा करीत आहेत. त्या ब्राह्मणांनाच खरा देव कळला आहे. इतरांना नाही. हजारो वर्षे लोटली, परंतु ह्या ब्राह्मणांचे स्थान अढळ आहे. कारण एक खरा देव ब्रह्म, यानेच त्यांचे रक्षण केले आहे.''

आपल्या भाषणाने सर्वांचे समाधान झाले असेल, अशी स्वत:ची समजूत

हा ब्राह्मण करतो आहे तोच एक ज्यू जातीचा दलाल प्रत्युत्तरादाखल त्यास म्हणू लागला —

' नाही, खऱ्या देवाचे देऊळ हिंदुस्थानात नाही व देव ब्राह्मण जातीचेही रक्षण करीत नाही. ब्राह्मणांचा देव हा खरा देव नसून आब्राहाम, इसाक व जेकब यांचा देव खरा देव आहे. तो आपले आवडते लोक, जे इस्रायली लोक, यांचेच रक्षण करतो. जगाच्या सुरुवातीपासून तो आमच्या राष्ट्रावर प्रेम करीत आहे. आम्ही जरी या जगामध्ये सर्वत्र पसरलो असलो तरी तो आमची जणूकाय परीक्षाच पाहत आहे. कारण त्यानेच असे वचन दिले आहे की, मी एके दिवशी सर्वांना जेरूसलेम येथे एकत्र आणीन.'

इतके तो ज्यू बोलतो आहे तोच त्याचा कंठ भरून आला . त्याला आणखी काही बोलावयाचे होते, परंतु इटली देशाच्या पाद्र्याने बोलण्यास सुरुवात केली. तो ज्यूला म्हणाला, ' तुम्ही म्हणता ते अगदी खोटे आहे. तुम्ही देवाला अन्यायी ठरविता. इतरांपेक्षा तो तुमच्यावर जास्त प्रेम करतो, असे तुम्हाला म्हणता यावयाचे नाही. एके काळी त्याने तुमच्यावर प्रेम केले असेल. परंतु त्या गोष्टीला आज एकोणीसशे वर्षे झाली. देवाच्या कोपाला तुम्ही कारण झाला असून त्याने तुमच्या राष्ट्राचा विध्वंस केला आहे. सर्व जगभर तुमचे लोक थोडे थोडे वाटले असून धर्मावरील तुमच्या अविश्वासामुळे तुमचा धर्म कोणीही स्वीकारीत नाही. ईश्वर कोणत्याही राष्ट्राला अधिक मान देत नाही, जे खरे मुमुक्षू आहेत त्यांना रोमच्या पुराण मंदिराकडे तो बोलावीत आहे. रोमच्या बाहेर कोणासही गती मिळणे शक्य नाही.'

इतके इटालियन पाद्री म्हणतो आहे तोच तेथे असलेला प्रॉटेस्टंट पंथाचा पाद्री त्या पुराणमतवादी पाद्र्याकडे वळून म्हणाला, ' मोक्ष काय तो तुमच्याच धर्माच्या लोकांना मिळतो, असे तुम्ही कसे म्हणता ? धर्मग्रंथात ख्रिस्ताने सांगितल्याप्रमाणे जे प्रेमतत्त्वाला व सत्याला स्मरून चालतात त्यांनाच तो मिळतो.'

त्याच खाणावळीत एक तुर्की अधिकारी तंबाखू ओढीत होता. त्यास त्या दोघा ख्रिस्तांचे म्हणणे पटेना. त्यांवर मात करण्याच्या दृष्टीने तो म्हणतो, 'तुमचा त्या रोमन धर्मावरील विश्वास फुकट आहे. बाराशे वर्षांपूर्वी मुसलमानी धर्माने त्याचा पाडाव केला. मुसलमानी धर्माचा फैलाव युरोप व आशियातच नव्हे तर चीन सारख्या विख्यात देशातही कसा झाला, हे तुम्ही पाहिलं पाहिजे. परमेश्वराने ज्यू लोकांचा धिक्कार केला, कारण त्यांच्या धर्माचा प्रसार होत नाही व सर्वत्र त्यांचा अपमान होतो आहे, ही गोष्ट तुम्ही स्वत: कबूल करता. त्याच्या उलट मुसलमानी धर्म पहा. तो सर्वत्र पसरला जात आहे. व त्यातच त्यांचे यश आहे. ईश्वराचा जो दूत महंमद त्याच्याच अनुयायांना मोक्ष प्राप्त होणार आहे. विशेषत: उमरचे अनुयायीच उद्धरले जातील, अलीचे नाहीत. कारण ते धर्माशी बेइमानी आहेत.'

यावर अली पक्षाचे एक पर्शियन पंडित उत्तर देणार होते, पण निरनिराळ्या धर्माच्या लोकांमध्ये बाचाबाची सुरू होऊन एकच गोंधळ झाला. ईश्वर म्हणजे काय व त्याची पूजा कशी करावी याविषयी आपापल्या परीने ते बोलू लागले. आमच्याच देशात खरा देव ओळखला जातो व त्याची खरी पूजा केली जाते, असे जो तो म्हणू लागला. एक चिनी माणूस मात्र स्वस्थ एका कोपऱ्यात आपला चहा पीत होता. त्याला अशा रीतीने शांत बसलेला पाहून एका तुर्काने विचारले,' काय हो सभ्य गृहस्थ, तुम्ही स्तब्ध आहात? परंतु मी म्हणतो ते तुम्हाला पटले आहे, असे मला खात्रीने वाटते. तुमच्या गावाहून पुष्कळ व्यापारी माझ्याकडे येतात. ते सांगतात की, चीनमध्ये जरी पुष्कळ धर्म असले तरी तुम्ही मुसलमानी धर्माला श्रेष्ठ मानता व तो मोठ्या आनंदाने स्वीकारता. तेव्हा तुम्ही आता पुढे होऊन खरा देव व खरा भक्त कोण हे या लोकांना सांगा.' यावर इतर लोकही 'होय, होय, सांगा तुमचे काय मत आहे ते ,' असे म्हणू लागले.

कन्फ्युशिअसच्या त्या भक्ताने - चिनी गृहस्थाने - क्षणभर डोळे मिटले,

विचार केला व शेवटी सर्वांना दोन्ही हातांनी वंदन करून शांतपणाने तो बोलू लागला.-

'महाराज, आपल्यामध्ये जो अहंकार आहे तो धर्माच्या बाबतीत कोणाशी जमू देत नाही . जर तुम्ही माझे ऐकाल तर मी तुम्हास एक गोष्ट सांगणार आहे व त्यामध्ये तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळणार आहे.

''सर्व पृथ्वीला प्रदक्षिणा घालणाऱ्या इंग्रजी बोटीने मी चीनहून इथे आलो. गोडे पाणी घेण्याकरता सुमात्रा बेटाचे पूर्व बाजूस आमची बोट थांबली. ती दुपारची वेळ होती. आमच्यापैकी काही जण विश्रांती घेण्यासाठी समुद्रकाठी नारळाच्या झाडाखाली बसले होते. आमच्यामध्ये सर्व धर्माचे लोक होते.''

''आम्ही तेथे बसलो असता एक आंधळा मनुष्य आमच्यामध्ये येऊन बसला. सूर्य ही काय चीज आहे हे समजण्यासाठी व त्याचा प्रकाश हस्तगत करण्यासाठी तो सूर्याकडे सारखा पाहत असे व त्यामुळे त्याचे डोळे गेले, हे आम्हास मागाहून समजले. सूर्याकडे पाहून सूर्याविषयी काही जास्त ज्ञान त्यास झाले नाही, उलट त्याचे डोळे मात्र गेले. तो स्वत:शी म्हणाला, 'सूर्यप्रकाश हा पातळ पदार्थासारखा नाही, कारण तसे असते तर तो एका भांड्यातून दुसऱ्या भांड्यात ओतता आला असता. वाऱ्यानेही पाण्यासारखा तो हलला असता. तो अग्नीसारखा असता तर पाण्याने त्याला विझविले असते. तो सूक्ष्म म्हणावा तर डोळ्याला दिसतो, जड म्हणावा तर त्याला इतर जड पदार्थाप्रमाणे इकडून तिकडे उचलून ठेवता येत नाही. यासाठी ज्याअर्थी प्रकाश पातळ नाही, विस्तव नाही, सूक्ष्म नाही व जडही नाही, त्याअर्थी तो काही नाही.''

याप्रमाणे सूर्याकडे नेहमी पाहिल्यामुळे व सूर्याविषयी नेहमी विचार केल्याने त्याने आपले डोळे व विचार करण्याची शक्ती ही दोन्ही घालविली होती.दोन्ही डोळे गेल्यामुळे त्याने स्वत:ची अशी समजूत करून घेतली होती की सूर्याला अस्तित्वच नाही.

या आंधळ्याबरोबर त्याचा एक सेवक होता. त्या सेवकाने आपल्या

आंधळ्या मालकाला झाडाखाली बसविले, झाडाखाली पडलेला नारळ घेतला व रात्री प्रकाश मिळावा यासाठी दिव्याची सोय करू लागला. खोबऱ्यापासून त्याने तेल काढले, करवंटीपासून तंतू काढून त्याची एक वात वळली व ती तेलात भिजविली. या सेवकाचा हा उद्योग इकडे चालला असता त्याच्या धन्याने त्याला विचारले, ‘अरे सेवका, सूर्य नाही असे जे मी म्हणतो, ते बरोबर आहे ना ? हा सर्वत्र काळोख पडला आहे, हे तुला दिसते ना ? इतके असून सुद्धा लोक म्हणतात की सूर्य आहे. जर तो आहे असे त्यांचे म्हणणे आहे तर त्याचे स्वरूप त्यांना सांगता येईन का ?’

‘सूर्य काय आहे, हे मला ठाऊक नाही व ते समजून घेणे हे माझे काम नाही.’ तो सेवक म्हाला, ‘ परंतु प्रकाश म्हणजे काय हे मला समजते. हा पहा येथे मी दिवा तयार केला आहे. त्याच्या सहाय्याने मला तुमची सेवा करता येईल व याच्या प्रकाशाने झोपडीतील सर्व चीजवस्तू मला दिसेल.’ असे म्हणून त्या सेवकाने तो दिवा उचलला व मालकास उद्देशून तो म्हणाला, ‘हा पहा माझा सूर्य.’

एक कुबड्या घेतलेला लंगडा मनुष्य तेथे बसला होता. हे ऐकून तो म्हणाला,—

‘तू सर्व आयुष्यभर आंधळा आहेस, तुला सूर्याची काय कल्पना असणार? तो काय आहे, हे मी तुला सांगतो. सूर्य हा एक अग्नीचा गोळा आहे. तो रोज सकाळी समुद्रातून वर उगवतो व आपल्या बेटातील पश्चिमेकडील डोंगरात मावळतो. हे सर्व आम्ही पाहतो व तुला डोळे असते तर तूही हेच पाहिले असतेस.’

एक कोळी हे सर्व ऐकत होता. तो म्हणाला, ‘ तू कधी आपल्या बेटाच्या बाहेर गेला नाहीस हे स्पष्ट आहे. तू जर लंगडा नसतास व माझ्यासारखा मच्छीमारीकरता नावेत हिंडतास तर तुला असे दिसून आले असते की, तो जसा समुद्रातून उगवतो तसा समुद्रातच मावळतो. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी

रोज पाहतो व ते सत्य आहे.’

त्यावर तेथे असलेला एक हिंदी गृहस्थ म्हणतो, ‘ अहो, शहाणी माणसे सुद्धा असे बोलावयास लागली म्हणजे मला आश्चर्य वाटते. विस्तवाचा गोळा पाण्यातून निघेल कसा ? व पाण्यातच मावळेल कसा ? सूर्य हा अग्नीचा गोळा नसून ती देवता ‘देव ’ या नावाने प्रसिद्ध आहे. तो रथामध्ये बसून मेरू नावाच्या सुवर्ण पर्वताभोवती फिरत असतो. कधी कधी ते दुष्ट सर्प - राहू व केतू - या सूर्यास ग्रासतात व त्यामुळे पृथ्वीवर अंधार पडतो. परंतु आमचे ऋषी परमेश्वराची प्रर्थना करतात व राहूकेतूच्या हातून सूर्याची मुक्तता होते. तुमच्या अज्ञानी लोकांनाच सूर्य आपल्या देशावर प्रकाशतो असे वाटते. कारण ते बेटाबाहेर गेलेले नाहीत.’

यावर ईजिप्त बोटीवरील मुख्य जो तेथे होता, तो म्हणाला, ‘नाही, नाही, तुम्ही चुकता आहात . सूर्य ही देवता नाही व ती हिंदुस्थानाभोवती व त्याच्या सुवर्ण पर्वताभोवतीही फिरत नाही. मी काळ्या समुद्राच्या बाजूने व अरेबियाच्या किनाऱ्याने फिरलो आहे. तसेच मादागास्कर व फिलिपाईन या बेटांनाही गेलो आहे. सूर्य सर्व पृथ्वीला प्रकाश देतो, फक्त हिंदुस्थानालाच नव्हे. तो एका सुवर्ण पर्वताभोवती फिरत नसून , पूर्वेस दूर जपान बेटाकडे उगवतो व पश्चिमेस दूर इंग्लंड बेटाकडे मावळतो. त्यामुळेच जपानी लोक आपल्या देशाला ‘ निपॉन’ किंवा ‘सूर्याचे उगमस्थान ’ या नावाने संबोधतात. हे सर्व मला माहीत आहे कारण मी स्वत: पुष्कळ प्रवास केला आहे . ज्या माझ्या आजोबांनी सर्व समुद्रातून प्रवास केला, त्यांचेही म्हणणे असेच आहे.’

त्याने आपले म्हणणे पुढे चालविले असते, परंतु आमच्या बोटीवरील एका इंग्रजी खलाशाने मध्येच बोलावयास सुरुवात केली. तो म्हणाला —

‘सूर्याच्या हालचाली आम्हाला इंग्लंडमध्ये जितक्या पाहावयास सांपडतात, तितक्या कुठेच पाहावयास सांपडत नाहीत. इंग्लंडमध्ये प्रत्येकाला ठाऊक आहे की, सूर्य कोठेच उगवत नाही व कोठेच मावळत नाही. तो

पृथ्वीभोवती सारखा फिरत असतो. ही गोष्ट आम्ही पूर्ण जाणतो. कारण आम्ही पृथ्वीभोवती कितीतरी वेळा गेलो, परंतु सूर्याला कधीच स्पर्श करू शकलो नाही. इथे जसे होते, त्याप्रमाणे सर्वत्र सकाळी उगवणे व संध्याकाळी मावळणे, हे त्याचे चालतेच.' इतके बालून त्याने वाळूवर हातातील काठीने वर्तुळ काढिले.व लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न केला. परंतु ते त्यास बरोबर जमेना. शेवटी जवळ बसलेल्या कर्णधारास (कॅप्टनला) उद्देशून तो म्हणाला, 'माझ्यापेक्षा यांना ते चांगल्या रीतीने सांगता येईल.'.

तो कर्णधार फार जाणता होता. त्याने वरील सर्व भाषणे ऐकली. स्वत: तो होऊन काही सांगेना. अखेर इतरांनी सांगण्याबद्दल आग्रह केल्यांवरून तो सांगू लागला —

' तुम्ही सर्व चुकत आहात. सूर्य पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वीच सूर्याभोवती फिरत आहे. प्रत्येक चोवीस तासांत जपान, फिलिपाईन बेटे, अगर सुमात्राच नव्हे तर आफ्रिका, युरोप, अमेरिका व इतर देशही त्याचे भोवती फिरत आहेत. एका पर्वतासाठी, किंवा बेटासाठी किंवा समुद्रासाठी किंबहुना एका पृथ्वीसाठी नसून पृथ्वीसारख्या अनेक दुसऱ्या ग्रहांसाठीही आहे. तुम्ही आपल्या पायाखालच्या जमिनीकडे न पाहता वर आकाशाकडे पाहाल तर हे तुमच्या सहज लक्षात येईल व मग तुम्ही सूर्य आमच्यासाठी किंवा आमच्या देशासाठी उगवतो असे कधीही म्हणणार नाही ' याप्रमाणे ज्या कर्णधाराने पृथ्वीवर बराच प्रवास केला होता व आकाशाचाही अभ्यास केला होता, त्याचे विद्वत्तापूर्ण भाषण झाले.

' या कथेत दर्शविल्याप्रमाणे ' तो चिनी पंडित पुढे म्हणाला, ' धर्माच्या बाबतीतही आपला अहंकार आपल्या आड येत असून, गैरसमज व भांडणास तोच कारण होत आहे. जी सूर्याची गोष्ट तीच परमेश्वराची. प्रत्येकाला आपल्या स्वत:करता एक स्वतंत्र देव पाहिजे आहे. जो विश्व व्यापून उरला अशा परमेश्वराला लहानशा देवळामध्ये कोंबण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत आहे.

सर्व लोकांना एका धर्माखाली आणण्यासाठी ज्याने हे विश्वाचे मंदिर निर्माण केले, त्याची सर या आपल्या देवळांना येईल का ? सर्व मानवी देवळे या विश्वमंदिराच्या धर्तीवरच बांधली गेली आहेत. प्रत्येक देवळात पाण्याचे हौद आहेत, घुमट आहे, दिवे आहेत, चित्रे व नक्षीची कामे आहेत, धर्मग्रंथ आहेत, वेदी आहे, परमेश्वरास द्यावयाची दाने आहेत व उपाध्येही आहेत. परंतु कोणत्या देवळामध्ये समुद्रासारखा हौद आहे, आकाशासारखे घुमट आहे , सूर्य, चंद्र व तारे या सारखे दिवे आहेत, प्रेमळ व एकमेकास मदत करण्यास तयार अशी चालती बोलती चित्रे आहेत ? परमेशराची कृपा या जगात जितक्या लवकर आमच्या प्रत्ययास येते, तितक्या लवकर देवळातील कोणत्या धर्मग्रंथाने ती आमच्या प्रत्ययास येईल. अंत:करणात परमेश्वरी संकेत जितक्या खोल उमटलेले असतात, तितक्या खोल कोणत्या धर्मपुस्तकात ते पहावयास सापडतील, एकमेकांकरिता प्रमामुळे मनुष्य जो स्वार्थत्याग करतो त्यापेक्षा मोठी आहुती कोणत्या देवळात दिली जाते, ..आणि ज्या मानवी अंत:करणात प्रवेश करून परमेश्वर त्यागाचा बळी स्वीकारीत असतो, त्या अंत:करणापेक्षा कोणती वेदी जास्त श्रेष्ठ आहे ?

मनुष्याची परमेश्वराबद्दल जेवढी मोठी कल्पना असेल तितक्या चांगल्या रीतीने तो परमेश्वरास ओळखू शकेल, व जितक्या चांगल्या तऱ्हेने तो परमेश्वरास ओळखील तितक्या लवकर तो परमेश्वराजवळ जाईल. म्हणजेच परमेश्वराप्रमाणे त्याचे ठिकाणी चांगुलपणा, दया, व प्रेम आपणास पाहावयास सापडतील.

यासाठी, ज्याला सूर्याच्या - परमेश्वराच्या - प्रकाशाची पूर्ण ओळख पटली आहे, अशाने ज्याला आपल्या मूर्तीपासून प्रकाशाचे एक का होईना किरण मिळते आहे त्याला, कधीही दूषण देऊ नये. जो आंधळा आहे, सूर्यप्रकाश ज्याला दिसत नाही - परमेश्वरावर ज्याचा विश्वास नाही, अशा माणसाचाही त्याने तिटकारा करू नये.'

हे त्या चिनी पंडिताचे म्हणणे सर्वांनी शांत चित्ताने ऐकून घेतले व कोणीही धर्माच्या श्रेष्ठत्वाची पोकळ चर्चा यापुढे केली नाही.

: ४ :

जेथे प्रेम तेथे परमेश्वर



एका शहरामध्ये मार्टिन आवडिच् या नावाचा चांभार राहात असे. त्याचे एक लहानसे दुकान होते. या दुकानाला रस्त्याच्या बाजूला एक खिडकी होती. या खिडकीतून रस्त्याने जाणारा येणाराचे जरी पायच दिसत असत, तरी मार्टिन केवळ पायांकडे पाहून माणसांना ओळखत असे. तो या शहरात बरेच दिवस राहिला असल्यामुळे त्याच्या ओळखीही बऱ्याच झाल्या होत्या. ज्या बुटाला मार्टिनचा हात लागला नाही असा बूट क्वचितच असावयाचा. काही शिवलेले असावयाचे, काहीना ठिगळ लावलेले असावयाचे तर काहींना तळ मारलेला

असावयाचा व काहींना तर सबंध वरचे कातडे बसविलेले असावयाचे. त्याला खूप काम मिळत असे, कारण थोडे पैसे घेऊन तो उत्तम काम करीत असे. शिवाय कातडेही चांगले वापरीत असे. सर्वांचा त्याच्यावर विश्वास. आपल्याला अमुक दिवसांपर्यंत काम करून देता येणार नाही असे त्याला दिसले तर तो गिऱ्हाइकांना तसे स्पष्ट सांगत असे. उगीच थापा मारीत नसे. या त्याच्या गुणामुळे तो सर्वांच्या ओळखीचा झाला व त्याला भरपूर काम मिळू लागले.

मार्टिन हा नेहमी चांगुलपणाने वागत असे. जसा तो म्हातारा होऊ लागला,तसा त्याचा ओढा परमेश्वराकडे जाऊ लागला. व आत्म्याविषयी तो विचार करू लागला. तो दुसऱ्याचा ताबेदार होता, व स्वत:चे दुकान थाटण्यापूर्वी त्याची बायको वारलेली होती व त्याला तीन वर्षांचा कापीटोल नावाचा मुलगा होता. त्याची थोरली मुले वारली होती. प्रथम मार्टिनला असे वाटले की, आपल्या मुलाला खेडेगावी बहिणीच्या घरी पाठवावे. परंतु मुलाची ताटातूट करणे त्याच्या जीवावर आले. 'जिथे माझ्या कापीटोलच्या ओळखीचे कोणीही नाही अशा कुटुंबाकडे त्याला राहावयास कसे पाठवावे ? त्याला मी माझ्याजवळच ठेवीन.' असा त्याने शेवटी निश्चय केला.

मार्टिनने आपल्या मालकास सोडून स्वत:चे बिऱ्हाड केले, परंतु नशीब त्याला अनुकूल नव्हते. मुलगा वयात येतो न येतो तोच तो आजारी पडला व आठ दिवसांच्या तापानंतर माण पावला. 'हा मला माझ्या म्हातारपणी पोशील व सुख देईल' ही मार्टिनची आशा फोल ठरली. त्याला फार दु:ख झाले. 'माझ्या एकुलत्या मुलास तू नेलेस व मला म्हाताऱ्याला मागे ठेविलेस, मलाही घेऊन जा' अशी तो नेहमी परमेश्वराची प्रार्थना करीत असे. मधून मधून तो परमेश्वराला दूषणही देत असे, इतके की त्याने चर्चमध्ये जाण्याचेही सोडून दिले.

एके दिवशी मार्टिनच्या गावाचा एक मनुष्य, जो देव देव करीत गेली

आठ वर्षे फिरत होता तो, मार्टिनला भेटला. मार्टिनने आपले अंत:करण उघडे करून आपले दु:ख त्याला निवेदन केले, व म्हणाला,' हे सत्पुरुषा, माझी ह्यापुढे जगण्याची देखील इच्छा नाही. मला परमेश्वराने लवकर न्यावे हीच माझी त्याच्याजवळ प्रार्थना आहे. या जगात आता मला काय आशा राहिली आहे ?'

_.'मार्टिन, तुला असे म्हणण्याचा काय अधिकार आहे ? ' तो वृद्ध गृहस्थ म्हणाला,' परमेश्वर जे घडवून आणतो, ते चांगले किंवा वाईट असे आपल्याला म्हणता यावयाचे नाही. परमेश्वराच्या इच्छेने सर्व काही चाललेले आहे. तू जगावास व तुझा मुलगा मरावा हा जर त्याचा नेमानेम, तर त्याला आपण काय करणार ? आता तुला जी उदासीनता प्राप्त झाली आहे त्याला कारण आपल्या स्वत:च्या सुखाकरिताच जगण्याची तुझी इच्छा.'

'स्वत:च्या सुखाकरिता जगावयाचे नाही तर कशाकरिता जगावयाचे?' मार्टिनने विचारले.

' परमेश्वराकरिता जगावयाचे, स्वत:करिता नव्हे', त्या वृद्धाने पुन: उत्तर दिले .' त्याने आपल्याला आयुष्य दिले व आपण ते त्याच्याकरताच खर्च करावयास पाहिजे. परमेश्वराकरिता कसे जगावयाचे हे तू शिकलास तर तुला दु:ख होणार नाही.'

मार्टिन थोडा वेळ गप्प बसला व पुन: त्याने त्या वृद्धास विचारले, 'परमेश्वराकरिता कसे जगावयाचे ?'

' परमेश्वराकरिता कसे जगावयाचे , हे येशू ख्रिस्ताने दाखविले आहे.

'तुला वाचता येते काय ? तर मग बायबल विकत घे आणि ते वाच. माणसाने या जगात कसे वागावे हे तुला त्यात पाहावयास सापडेल.'

हे त्या मित्राचे शब्द मार्टिनच्या मनावर इतके बिंबले की त्याने त्याच दिवशी बाजारात जाऊन मोठ्या टाईपातील एक बायबल खरेदी केले व

वाचावयास सुरुवात केली.

सणावाराच्या दिवशीच वाचावयाचे असे त्याने प्रथम ठरविले, परंतु त्याचे मन रमू लागल्यामुळे तो ते दररोज वाचू लागला. कधी वाचण्यामध्ये तो इतका गढून जात असे की, दिव्यातील तेल संपल्यामुळे त्याला नाईलाजाने वाचन बंद करावे लागत असे. प्रत्येक रात्री तो नेमाने वाचू लागला व जसे त्याचे वाचन वाढू लागले तसे, परमेश्वराकरिता जगणे म्हणजे काय, हे त्याला समजू लागले. त्याचे मनही स्वस्थ झाले. यापूर्वी निजण्याचे वेळी त्याला त्याच्या मुलाची आठवण होऊन दु:ख होत असे , परंतु आता तो देवाचे स्मरण करीत आनंदाने झोपू लागला.

मार्टिनचा आयुष्यक्रम बदलून गेला. पूर्वी सणावारी हॉटेलात जाऊन चहा पिणे किंवा दारूचे दुकानात जाऊन दारू घेणे त्याला कमीपणाचे वाटत असे. मित्राबरोबर दारू घेऊन रंगेलपणाने बाहेर पडावयाचे, कोणासही मर्जीस येईल तसे बोलावयाचे , किंवा शिव्या द्यावयाच्या, असे त्याचे चालावयाचे. हा प्रकार आता बंद झाला. सकाळी कामास बसावयाचे व कांम आटोपल्यानंतर रात्री भिंतीचा दिवा काढून टेबलावर ठेवावयाचा व पुस्तक वाचण्यास सुरुवात करावयाची. हळू हळू त्याला बायबल चांगले समजू लागले व त्याच्या मनाला शांती प्राप्त झाली.

एके दिवशी याप्रमाणे वाचीत असताना तो वाचनात अगदी गढून गेला. तो ल्यूकचा वृत्तांत वाचीत होता. वाचता वाचता सहाव्या भागावर तो आला. त्या ठिकाणी त्याला खालील मजकूर आढळला :—

'' एकाद्याने एका गालावर मारले तर तू आपला दुसरा गाल त्याच्यापुढे कर. एखादा तुझा झगा घेऊन जाईल, तर त्याला तुझा झगा तर देच, परंतु शिवाय तुझा कोटही दे. जो जे मागेल ते त्यास दे व पुन: त्यापासून ते परत मागू नकोस. लोकांनी तुझ्याशी जसे वागावे असे तुला वाटते, त्याप्रमाणे तू त्यांच्याशी वाग.''

तसेच येशू ख्रिस्ताचे खालील बोलही त्याने वाचले.

'' मी सांगतो त्याप्रमाणे तुम्ही करत नाही, मग माझ्या नावाने 'प्रभु, प्रभु ' म्हणून का ओरडता? जे मला शरण येतात, माझे ऐकतात व त्याप्रमाणे करतात ते मजबूत पायाच्या घरात राहणाऱ्या लोकांसारखे आहेत. कितीही पाऊस येवो, पाण्याचा कसलाही मारा त्या घरावर होवो, त्याचा एक तुकडाही हालावयाचा नाही. उलट, जे माझे फक्त ऐकतात, परंतु ऐकल्याप्रमाणे वागत नाहीत, ते पायाशिवाय बांधलेल्या घरामध्ये राहणाऱ्या माणसांसारखे आहेत. पाण्याचा प्रवाह त्या घरावर आपटण्याचीच खोटी की, ते पडल्याशिवाय कधीही राहावयाचे नाही.''

मार्टिनने हे वाचल्याबरोबर त्याचे मनास समाधान वाटले. त्याने आपला चष्मा काढला. तो पुस्तकावर ठेवला व कोपर टेबलावर रोवून वाचलेल्या भागावर तो विचार करू लागला.

' माझे घर खडकावर आहे की वाळूवर आहे ? खडकावर असेल तर ठीक. परमेश्वराचे आज्ञेप्रमाणे आपण वागत आहोत हे पाहून कोणासही आनंदच वाटेल. परंतु तसे नसेल तर बेसावधपणे वागून पापाचा अधिकारी मी होणार नाही का ? अजून तरी सावध होऊ या. देवा, तू मला माझ्या कार्यात मदत कर.'

हा विचार त्याने आपल्या मनाशी केला. झोपी जाण्याची तयारी केली, परंतु त्यास पुस्तक सोडवेना. नंतर तो सातव्या भागावर आला. श्रीमंत शास्त्र्याविषयी तो भाग होता.

''नंतर त्या स्त्रीकडे वळून तो सायमनला म्हणाला, ''तू ही स्त्री पाहतोस का ? मी तुझ्या घरी आलो. तू मला पाय धुण्यास पाणी दिले नाहीस, परंतु हिने आपल्या अश्रूंनी माझे पाय भिजविले व आपल्या केसांनी ते पुसले. तू मला चुंबन दिले नाहीस, परंतु हिने इथे आल्यापासून माझ्या पायाचे अनेकवार चुंबन घेतले आहे. तू माझे डोकेदेखील तेलाने माखले नाहीस, हिने तर

माझ्या पायांनाही तेल लाविले आहे.''

मार्टिनने हा भाग वाचला व पुन: चष्मा काढून विचार करण्यास सुरुवात केली. 'शास्त्र्याने पाणी दिले नाही, चुंबन घेतले नाही व तेल लाविले नाही. तो माझ्यासारखाच स्वार्थी असला पाहिजे. आपल्याला चहा कसा मिळेल, आपले थंडीवाऱ्यापासून निवारण कसे होईल, यापलीकडे आपल्या विचाराची मजलच गेली नाही. शेजाऱ्याच्या, पाहुण्याच्या सुखदु:खाचा विचार आपण कधी केला नाही. आणि हा पाहुणा तरी कोण होता ? प्रत्यक्ष परमेश्वरच. तो जर माझ्या घरी येईल तर माझ्याकडून त्या शास्त्र्याप्रमाणेच वर्तन होईल काय?'

मार्टिनने विचार करता करताच आपले डोके हातावर टेकले व तो झोपी गेला. ' मार्टिन ' असा त्याला कानाजवळ येऊन कोणी हाक मारीत असल्याचा भास झाला. तो झोपेतून जागा झाला व 'कोण आहे' म्हणून त्याने हाक मातली. त्याने सभोवार पाहिले व दाराकडेही नजर टाकली, परंतु त्यास काहीच दिसेना. त्याने पुन: 'कोण आहे ?' म्हणून होक मारली, तो त्यास खालीलप्रमाणे स्पष्ट जबाब मिळाला:

'मार्टिन , मार्टिन . उद्या तू रस्त्याकडे पाहा, कारण मी येणार आहे.' मार्टिनची झोप पार उडाली. तो खुर्चीवरून उठला व ' मी हे शब्द स्वप्नात ऐकले की जागेपणी ऐकले ' याचा त्याला निर्णय लावता येईना. त्याने दिवा मालविला व तो झोपावयास गेला.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटेस तो उठला. परमेश्वराची प्रार्थना केली. विस्तव पेटवला. न्याहारीकरिता म्हणून पेज तयार केली. चहाचे भांडे चुलीवर ठेवले व खिडकीजवळ नेहमीप्रमाणे कामास बसला. काम करीत असता रात्री ऐकलेल्या शब्दांची त्याला आठवण झाली. एकदा वाटे की तो स्वप्नात भास झाला. पुन्हा वाटे की अशा गोष्टी कधी होत नाहीत का ? ते जागेपणीच ऐकलेले शब्द होते.

नेहमीप्रमाणे आज मार्टिनचे लक्ष खिडकीकडे अधिक जाऊ लागले.

नेहमी त्याची दृष्टी पायांकडे असे, परंतु आज तो तोंडाकडे पाहू लागला. एक घरकाम करणारा मनुष्य गेला. नंतर पाणी आणणारा गेला व त्यानंतर निकोलस राजाच्या वेळी शिपायाचे काम केलेला एक स्टीफन नावाचा म्हातारा शिपाई हातात टिकाव घेऊन रस्त्यावर आला. मार्टिनने त्याच्या बुटाच्या आवाजावरूनच त्यास ओळखले. शेजारच्या व्यापाऱ्याने त्याचा संभाळ केला होता. घरात मजुरांना मदत करणे हीच त्याची कामगिरी. मार्टिनच्या खिडकीजवळील बर्फ काढण्याकरिता तो आत आला होता. मार्टिनने त्याकडे ओझरते पाहिले व तो पुन: कामाला लागला. म्हातारपणाचा चळ मला लागला' मार्टिन स्वत:शीच हसत हसत पुटपुटला. 'स्टीफन बर्फ काढण्याकरिता आला आहे आणि मी समजतो आहे की ख्रिस्तच मजकडे आला. काय मूर्ख मी !'

दहाबारा टाके घातले असतील नसतील तो त्याने खिडकीवाटे पुन: पाहिले. स्टीफनने फावडे भिंतीला टेकवले असून विश्रांती घेण्यासाठी व स्वत:ला ऊब आणण्यासाठी तो उभा असल्याचे त्याला दिसले. तो म्हातारा असून बराच थकलेला होता, इतका की बर्फ काढण्यासाठी पुरेशी शक्ती त्याला नव्हती.

'मी स्टीफनला आत बोलाविले व चहा दिला तर कसे होईल ?' मार्टिन स्वत:शी विचार करू लागला. 'चहाही माझा तयार होत आला' मार्टिनने आपली सुई खाली ठेविली, दार उघडले व स्टीफनला आत घेतले.' आत ये. तू फार गारठला आहेस, जरा हातपाय शेक.'

'देव तुमचे कल्याण करो.' कृतज्ञतापूर्वक स्टीफनने म्हटले. ' माझे सर्व अंग दुखत आहे.' असे म्हणून आपल्या बुटाला लागलेला बर्फ दाराजवळील तरटाला तो पुसू लागला.

' राहूं द्या.पाय पुसण्याचे काही कारण नाही. जमीन मला झाडावीच लागेल, भरू द्या ती भरली तर. या. आत या. बसा, चहा घ्या' असे अत्यंत प्रेमळपणे मार्टिन म्हणाला व दोन कपांत त्याने चहा ओतला. एक आपल्या मित्राकरिता व एक स्वत:करिता घेतला. स्टीफनने सर्व चहा कपात ओतला व

चहाबद्दल मार्टिनचे आभार मानले. मार्टिनने पुन्हा एक कप स्टीफनला दिला व स्वत: घेतला. चहा घेता घेता मार्टिनने किती वेळा तरी बाहेर पाहिले.

'तुम्ही कोणाची मार्गप्रतीक्षा करता ?' स्टीफनने विचारले.

' मी मार्गप्रतीक्षा करतो ? होय. मला सांगावयास मोठा संकोच वाटतो. खरे पाहता मी कोणाचीच मार्गप्रतीक्षा करीत नाही. काल रात्री मी काही ऐकले व ते काही माझ्या मनातूनच जात नाही. तो भास आहे किंवा खराच साक्षात्कार आहे. सांगता येत नाही. मित्रा, काल मी बायबल वाचीत होतो. ख्रिस्ताने काय हाल सोसले व या भूतलावर तो कशा रीतीने अवतरला हे मी वाचीत होतो. तुलाही ही गोष्ट माहीत असेलच असे मला वाटते.'

'होय , ऐकली आहे मी ती गोष्ट. परंतु मी आहे अडाणी मनुष्य. मला काय वाचता येते आहे ?' स्टीफनने म्हटले. मार्टिनने काल रात्री घडलेली सर्व हकिगत सांगितली. स्टीफनने गंभीरपणे आपली मान हलविली व आपला चहा संपविला. मार्टिनने पुन्हा एक कप त्याला ओतला.

' हं. आणखी एक कप घ्या. देव तुमचे रक्षण करो. कालपासून मी ख्रिस्त कशा रीतीने या जगात वागला याचा सारखा विचार करीत आहे. त्याने कोणाचाही द्वेष केला नाही. गरिबांमध्ये तो नेहमी फिरत असे. गरिबांमधून त्याने आपली शिष्यमंडळी शोधून काढली. आपल्यासारखे पापी रोजगार करणारेच त्याचे अनुयायी होते. तो म्हणत असे, '' जो ताठ्याने वागेल, त्याचा गर्व हरण झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु जो सदैव नम्रतेने वागेल तोच मोठ्या योग्यतेस पोहोचेल. तुम्ही मला देव म्हणून हाक मारता, परंतु मी तुमचे पाय धुतो, पायाची सेवा करतो. ज्याला श्रेष्ठपणा मिळवावयाचा असेल त्याने सर्वांची सेवा करावयास हवी. जे गरीब आहेत, नम्र आहेत, तेच खरे दैववान आहेत.''

स्टीफन चहा घेण्याचे विसरला. इतके त्याचे लक्ष मार्टिनकडे लागून राहिले होते. तो वृद्ध होता व या ख्रिस्ताच्या गोष्टीने त्याच्या डोळ्याला पाणी

आले. मार्टिनकडे पाहता पाहताच ते पाणी त्याच्या गालांवरून ओघळू लागले.

'घ्या, आणखी चहा घ्या -' मार्टिन म्हणाला. परंतु स्टीफनने नमस्कार करून त्याचे आभार मानिले व तो जाण्याकरिता उठला.

'मार्टिन, मी तुमचा फार आभारी आहे. तुम्ही माझ्या शरीरालाच नव्हे तर माझ्या मनालाही अन्न व विश्रांती दिली आहे.'

स्टीफन निघून गेला. मार्टिनने राहिलेला चहा स्वत: घेतला. चहाची भांडी दूर ठेविली व कामाला बसला. मधून मधून खिडकीतून पाहण्याचे काम चालूच होते. दोन शिपाई आपले बूट रप् रप् वाजवीत गेले. शेजारचा धनी आपले चकचकीत बूट घालून गेला. नंतर रोटीवाला आपली पाटी डोक्यावर घेऊन गेला. हे सर्व लोक निघून गेले. नंतर एक खेड्याची बाई आपले जाडेभरडे मोजे व फाटका तुटका जोडा घालून चालली. मार्टिनने खिडकीतून तिच्याकडे पाहिले. ती परगावची असून तिच्याजवळ एक लहान मूल असल्याचे त्याने पाहिले. तिने ज्या बाजूने गार वारा येत होता त्या बाजूला आपली पाठ केली व आपल्या मुलाला गुंडाळून घेऊ लागली. ते मूल रडताना मार्टिनने ऐकिले. तो उठला, दार उघडले व त्या बाईस हाक मारली.

'अहो बाई, अहो बाई,''

त्या बाईने वळून मार्टिनकडे पाहिले.

'तुम्ही मुलाला घेऊन तेथे थंडीमध्ये का उभ्या आहात ? आत या, या उबदार घरात तुम्हाला मुलाला चांगले गुंडाळून घेता येईल. या, असे या बाजूने या.'

नाकावर चष्मा असलेला व पुढच्या बाजूस मळकपडा लावलेला एक वृद्ध गृहस्थ आपल्याला बोलावितो आहे, हे पाहून तिला आश्चर्य वाटले. तरीपण ती त्याच्याबरोबर घरात आली. दोघे एका लहान खोलीत शिरली. तेथील बिछान्याकडे बोट दाखवून मार्टिनने म्हटले, '' माझ्या मुली, तेथे त्या शेगडीशेजारी बस. अंग शेक व मुलास पाज.''

'सकाळपासून मी काही खाल्लेलं नाही, मला दूध तरी कोठून येणार ?'' त्या बाईने हळूच परंतु मार्टिनला ऐकू जाईल अशा आवाजात म्हटले. तरी पण तिने मुलाला स्तनाला लाविले.

मार्टिनला तिची दया आली. त्याने एका ताटात भाकरी आणिली. कोबीची पातळ भाजी ताटात ओतली. टेबलावर एक कपडा अंथरला व त्यावर ते ताट ठेविले. 'मुली, ये. हे खा, मी तुझ्या मुलाला सांभाळतो, मला मुलेबाळे होती. त्यांना कसे खेळवावयाचे हे मला ठाऊक आहे.''

बाईने परमेश्वराची प्रार्थना केली व ती जेवावयास बसली. मार्टिन प्रेमाने त्या मुलाला खेळवू लागला. त्याच्याही मनाला मोठे समाधान प्राप्त झाले. त्या बाईने खाता खाता आपली हकीगत सांगण्यास सुरुवात केली.' मी एका शिपायाची बायको आहे. त्यांनी माझ्या नवऱ्याला कोठेतरी पाठविले. झाले त्याला आठ महिने, मला त्याची गंधवार्ताही अजून कळलेली नाही. मी गरोदर होते तोपर्यंत स्वैपाकीण म्हणून नोकरी केली . परंतु बाळंत झाल्यावर तो मालक मला व पोराला सांभाळण्यास तयार होईना. गेले तीन महिने मी नोकरी धुंडत आहे. परंतु नोकरी कोठेच मिळत नाही. पोटासाठी माझ्याजवळ होते नव्हते ते मी विकले. मूल पाजण्याकरिता दाई म्हणून राहण्यासाठी मी तयार आहे, परंतु माझा कोणी पत्कर घेत नाही. ते म्हणतात मी रोड आहे. आता मी एका व्यापाऱ्याच्या बाईकडे गेले होते. त्या बाईजवळ आमच्या गावची बाई कामाला आहे. तिने मला नोकरी देण्याचे कबूल केले होते, सर्व ठरले आहे. परंतु आणखी दोन आठवडे थांबण्यास सांगितले आहे. माझा गाव येथून दूर आहे. मी अगदी दमून गेले. माझ्या बाळालाही भूक लागली. भाग्य आमचे की आमची घरवाली मला फुकट राहू देते. नाहीतर माझे काय हाल झाले असते कोणास ठाऊक ?'

मार्टिने एक दीर्घ श्वास टाकला व तिला विचारले, 'तुझ्याजवळ गरम कपडे नाहीत काय ?'

'मला उबदार कपडे कोठून मिळणार ? एक शाल होती, परंतु कालच सहा पेन्सला मी ती गहाण टाकली.'

त्या बाईचे जेवण आटोपले. तिने आपल्या मुलाला घेतले. मार्टिन उठला, घरात खुंट्यांवरील कपडे शोधले व त्यातून एक फाटका गरम झगा काढून तिला दिला.

' हा घे. जुना आणि फाटका असला तरी त्यात मुलाला गुंडाळून घेता येईल,' तो म्हणाला.

त्या स्त्रीने प्रथम झग्याकडे व नंतर त्या वृद्ध गृहस्थाकडे पाहिले आणि कृतज्ञतेने तिचे अंत:करण इतके भरून आले की, तो झगा घेता घेता तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. ' परमेश्वर तुमचे कल्याण करो.' ती बाई म्हणाली. 'खरोखर ख्रिस्तानेच तुम्हाला या खिडकीतून डोकावण्यास लावले, नाहीतर हे माझे बाळ थंडीने गारठून मरावयाचे. घरातून निघतेवेळी फारसा गारठा नव्हता ,परंतु आता कोण थंडी पडली आहे.'

हे ऐकून मार्टिन हसला व म्हणाला,'' खरोखर तू म्हणतेस ते अगदी बरोबर आहे. प्रभु ख्रिस्तानेच हे घडवून आणिले. केवळ यदृच्छेने घडले असे नाही.' यानंतर मार्टिनने त्या बाईला आपले स्वप्न सांगितले व त्या दिवशी प्रभूने भेटण्याचे अभिवचन कसे दिले हे निवेदन केले.

'परमेश्वराची लीला अगम्य आहे. त्याला सर्व काही शक्य आहे.' असे म्हणून ती उठली. तो झगा तिने मुलाच्या व आपल्या अंगाभोवती गुंडाळला, मार्टिनला नमस्कार केला आणि पुन: त्याचे आभार मानले.

' ख्रिस्ताचे नावाने हे घे ,' असे म्हणून मार्टिनने तिला सहा पेन्स दिले व गहाण ठेवलेली शाल सोडवून आणण्यास सांगितले. तिने परमेश्वरास हात जोडले, त्यानेही परमेश्वरास वंदन केले, व ती घराबाहेर पडली.

ती गेल्यावर मार्टिनने कोबीचा रस्सा घेतला, भांडीकुंडी बाजूला ठेवली.

तो कामास लागला, परंतु त्याचे खिडकीकडचे लक्ष काही कमी झाले नाही. खिडकीत सावली दिसली की कोण आहे हे पहाण्यासाठी तो उठे.

थोड्या वेळाने एक फळे विकणारी बाई खिडकीत उभी राहिलेली मार्टिनने पाहिली. तिच्या डोक्यावर मोठी पाटी होती. परंतु फळे विकून घरी चालल्यामुळे त्यात थोडीच फळे दिसत होती. चुलीसाठी गोळा केलेल्या ढलप्यांचे गाठोडे तिच्या पाठीशी होते, ते पुन: नीट बांधण्यासाठी तिने फळांची पाटी खाली उतरून ठेवली व ढलप्या व्यवस्थित रचू लागली.इतक्यात एक फाटकी टोपी घातलेला मुलगा तेथे आला व बाईची नजर चुकवून पाटीतील एक फळ तो लांबविणार तोच तिने त्याला धरले. मुलगा आपली सुटका करून घेण्याकरिता धडपड करू लागला. परंतु त्या बाईने दोन्ही हातांनी त्याला घट्ट धरले होते. तिने त्याची टोपी हिसकावून फेकून दिली व त्याचे केस धरले. मुलगा मोठ्याने ओरडू लागला. तर ती म्हातारी त्याला शिव्या देऊ लागली. मार्टिनने आपली सुई तशीच खाली टाकली व लगबगा तो दाराबाहेर गेला. या धांदलीत त्याचा चष्माही पडला. ती म्हातारी त्या मुलाचे केस ओढीत होती.त्याला शिव्या देत होती व पोलिसाकडे घेऊन जाण्याची धमकीही देत होती. ' मी तुझे फळ घेतले नाही. मला का मारतेस ? मला जाऊ दे ' असे ओरडत तो मुलगा सुटण्यासाठी धडपड करीतच होता.

मार्टिनने दोघांना वेगवेगळे केले. त्या मुलाचा हात धरून त्यास बाजूला सारून तो त्या म्हातारीस म्हणू लागला, ' आजीबाई, जाऊ द्या. प्रभु ख्रिस्तासाठी त्यावर दया करा. तो पुन: असे करणार नाही.' पुन: पुन्हा तिचे आर्जव केल्यानंतर तिने त्या मुलास सोडले. तो मुलगा पळून जात होता, इतक्यात मार्टिनने त्याला थांबविले..

'अरे. जाऊ नकोस, आजीबाईंची क्षमा माग. आणि पुन: असे कृत्य करू नकोस. मी तुला फळ घेताना पाहिले.'

केलेल्या दुष्कृत्याबद्दल मुलाला वाईट वाटू लागून तो रडू लागला व त्याने म्हातारीची क्षमा मागितली. हे मुलाचे वर्तन पाहून मार्टिनलाही समाधान वाटले व तो त्यास म्हणाला, 'शाबास, माझ्या बाळा, तुला फळ पाहिजे असेल तर हे घे,' असे म्हणून पाटीतील एक फळ काढून त्याने त्याला दिले व त्या म्हातारीकडे वळून म्हणाला, 'मी त्याचे पैसे देतो, आजीबाई.'

'अशा तऱ्हेने तुम्ही मुलांना बिघडवून टाकाल, दुसरे तर काही नाही. त्याला चाबकाखाली इतका बडवला पाहिजे की, निदान आठ दिवस तरी त्याला आठवण राहील.' ती म्हातारी चडफडत म्हणाली.

'अहो, आजीबाई, हा आपला मानवाचा कायदा झाला. परंतु दयाळू परमेश्वराची रीत अगदी वेगळी आहे. फळ चोरल्याबद्दल जर याला चाबकाखाली बडवावयाचा , तर आपल्या पापाबद्दल आपणाला केवढी मोठी शिक्षा मिळावयास पाहिजे.'

म्हातारी स्तब्ध बसली. मार्टिनने बायबलमधील एका श्रीमंत माणसाची गोष्ट सांगितली. या श्रीमंताने आपल्या नोकराचे मोठे कर्ज त्याला माफ केले, परंतु या नोकराने मात्र स्वत:चे दुसऱ्यांकडे असलेल्या कर्जांपासून त्यांची मुक्तता केली नाही.

'दुसऱ्यास आपण क्षमा केल्याशिवाय परमेश्वर आपणास क्षमा करणार नाही. अशी परमेश्वराची अनुज्ञा आहे. प्रत्येकाला क्षमा करा आणि अल्लड, अविचारी तरुणांना तर प्रथम करा.'

ती म्हातारी तर स्तब्धच होती. तिने आपली मान हलविली, एक सुस्कारा टाकिला व म्हणाली,' मार्टिन, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे, परंतु ही पोरे फारच बिघडली हो.'

' ही मुले बिघडली तर त्यांना योग्य मार्ग दाखविण्याचे काम आपले, वृद्धांचे, आहे.'

'मग मी तरी दुसरे काय म्हणते ?' ती म्हातारी आवेशाने म्हणाली, 'मला सात मुले होती, आता फक्त एक मुलगी राहिली आहे. ही सगळी माझी

नातवंडे होती. त्यांच्याकरिता मी रात्रंदिवस खपत असे. ही मुलगी तर मला जरा सोडीत नाही. आजी, आजी करीत सारखी माझ्या मागे असते. माझी बाळ मोठी गुणाची आहे.' म्हातारीचे अंत:करण प्रेमाने भरून आले. 'या पोराने माझे फळ उचलले, हा तरी त्याचा पोरकटपणा होता. परमेश्वर त्यांचे कल्याण करो !' इतके म्हणून ती ढलप्यांचे ओझे आपल्या पाठीवर घेते आहे तोच तो मुलगा पुढे झाला आणि हसतमुखाने म्हणाला, 'आजीबाई, द्या ते ओझे माझ्याकडे, मलाही तिकडेच जायचे आहे.'

म्हातारीही मनात हसली. तिने ते ओझे मुलाजवळ दिले व ती दोघे रस्त्याने चालू लागली. फळाबद्दल मार्टिनला पैसे मागण्याचेही ती म्हातारी विसरली. त्या दोघांना एकमेकांशी बोलत जाताना पाहून मार्टिन क्षणभर त्यांच्याकडे कौतुकाने पाहात उभा राहिला. ती दूर गेल्यावर मार्टिन घरामध्ये परत आला, खाली पडलेला चष्मा घेऊन त्याने कामास सुरुवात केली; परंतु संध्याकाळ झाल्यामुळे त्याला दिसेना. इतक्यात रस्त्याचे दिवे लावणाराही त्या बाजूने गेला. मार्टिनने आपला दिवा लावला व काम चालू केले. एक बूट संपविला. काम बरोबर झाले की नाही हे न्याहाळून पाहिले. सुई, कातड्याचे तुकडे एका बाजूला ठेवले व दिवा काढून टेबलावर ठेवला. कपाटामधून बायबल काढून घेतले. काल जेथपर्यंत वाचले होते तेथे एक लहानसा कातड्याचा तुकडा खूण म्हणून ठेवला होता. तेथे ते पुस्तक उघडावे अशी त्याची इच्छा होती; परंतु ते दुसरीकडेच उघडले. पुस्तक उघडते न उघडते तोच त्याला कालच्या स्वप्नाची आठवण झाली व आठवण झाल्याबरोबर आपल्यामागे कोणीतरी बूट वाजवीत आले आहे, असा त्याला भास झाला. मार्टिनने मागे वळून पाहिले तो त्याला कोपऱ्यामध्ये कोणी माणसे उभी आहेत असे दिसले. परंतु ती कोण आहेत याचा निर्णय होईना. 'मार्टिन, मार्टिन, तू मला ओळखत नाही ?' असे त्याच्या कानात कोणीतरी कुजबुजले.

'कोण आहे ?' मार्टिनने विचारले.

'तो मी आहे' असा कोपऱ्यातून आवाज आला व त्या अंधारातून स्टीफन बाहेर पडला. मार्टिनकडे पाहून तो हसला व ढगासारखा थोड्याच वेळात अदृश्य झाला.

'ती मी आहे' असा पुन्हा दुसरा आवाज त्या कोपऱ्यामधून निघाला व बाई आपल्या लहान मुलास खांद्यावर घेऊन बाहेर पडली. ती बाई हसली, ते मूलही हसले व ती दोघेही अदृश्य झाली.

'ती मी आहे' तिसरा आवाज निघाला व त्याचे पाठोपाठ एक वृद्ध बाई व एक मुलगा अंधारातून बाहेर पडला. मार्टिनकडे पाहून ती हसली व अदृश्य झाली.

मार्टिनचे अंत:करण तृप्त झाले. त्याने परमेश्वरास हात जोडले. डोळ्यांस चष्मा घातला व ज्या ठिकाणी बायबल उघडले तेथे वरच्या बाजूवर खालील मजकूर वाचला -

'मी भुकेलेला होतो व तू मला जेवण दिलेस; मी तहानलेला होतो व तू माझी तृष्णा शांत केलीस ; मी अनोळखी होतो व तू मला घरात घेतलेस.' त्याच पानावर शेवटी खालील मजकूर होता. 'या माझ्या बांधवांशी तू जे प्रेमाचे वर्तन केलेस ते सर्व मला मिळाले.'

मार्टिनला स्वत:च्या स्वप्नाचा उलगडा झाला व परमेश्वराने खरोखरच म्हटल्याप्रमाणे आपणाला भेट दिली हे पाहून, आपण खरोखरीच कृतकृत्य झालो असे त्याला वाटले.

: ५ :

कोंबडीच्या अंड्याएवढा मोठा दाणा



एके दिवशी काही मुलांना धान्याच्या आकाराचा एक पदार्थ सापडला. तो कोंबडीच्या अंड्याएवढा होता. एका प्रवाशाने तो पदार्थ त्या मुलांजवळून एका पेनीला विकत घेतला व शहरात जाऊन 'चमत्कारिक पदार्थ' म्हणून राजाला विकला.

राजाने आपल्या राज्यातील विद्वान मंडळी बोलाविली, त्यांपुढे तो पदार्थ ठेविला व तो काय आहे, हे विचारले. पंडितांनी विचार कर कर केला, परंतु तो पदार्थ काय आहे, याचा काही पत्ता लागेना. राजाने तो पदार्थ तसाच खिडकीमध्ये ठेविला.

एके दिवशी एक चिमणी त्या खिडकीजवळ आली व तिने त्या पदार्थाला चोंच मारली. चोंच मारल्यामुळे त्याला थोडे भोक पडले व त्यावरून तो पदार्थ धान्याचा दाणा आहे हे सर्वांना कळून चुकले. पंडितांनी त्याप्रमाणे राजास कळविले.

हा दाणा आहे हे समजल्यामुळे तर राजाला फार आश्चर्य वाटले. नंतर त्याने विद्वान लोकांना हे धान्य केव्हा व कोठे उगवले, हे शोधून काढण्यास सांगितले. विद्वानांनी अनेक ग्रंथ शोधिले, पुष्कळ विचार केला, परंतु काहीच निर्णय देता येईना. शेवटी ते सर्व राजाकडे गेले व म्हणाले,:—

'सरकार, आम्हाला काहींच सांगता येत नाही. याविषयी पुस्तकांमध्ये कोठे काहीच आधार सापडत नाही. कदाचित् शेतकऱ्यांनाच विचारावे लागेल. काहींनी आपल्या वडिलांच्या तोंडून अशाच प्रकारचे धान्य कोठे व कधी उगवले हे ऐकिले असण्याचा संभव आहे.'

राजाने पंडितांच्या सूचनेप्रमाणे वृद्ध शेतकऱ्यास बोलावण्याबद्दल आपल्या सेवकास हुकूम केला. सेवकांनी योग्य शेतकऱ्याची निवड केली. कमरेत वाकलेला, तोंडात एकही दांत नसलेला, पांढरा फटफटीत पडलेला, असा एक म्हातारा दोन कुबड्या दोन काखात घेऊन लटपटत कसा तरी राजापुढे येऊन उभा राहिला. राजाने तो दाणा त्यास दाखविला. परंतु त्या म्हाताऱ्याची दृष्टी मंद झाल्यामुळे तो दाणा त्याने हातानेच चापसला.

'यासारखे धान्य कोठे उगवत असे ? तुम्ही कधी असले धान्य विकत घेतले होते काय ?किंवा असले बी कधी पेरले होते काय ?' राजाने विचारले.

तो म्हातारा बहिरा असल्यामुळे त्याला राजाचे म्हणणे बरोबर ऐकू येईना. मोठ्या कष्टाने ते त्याला समजावून द्यावे लागले.

शेवटी तो म्हणाला,' नाही, मी असले धान्य पेरले नाही व कापले नाही. आज ज्याप्रमाणे धान्य आपण पहातो, त्याच प्रकारचे धान्य आमच्या बाळपणीही होते. कदाचित् माझ्या वडिलांना अशा प्रकारचे धान्य कोठे वाढत असे हे सांगता येईल. त्यांना विचारावे.'

राजाने त्या म्हाताऱ्याच्या वडिलांस बोलाविले. तो ही एका काखेत कुबडी घेऊनच चालत आला.राजाने त्याला तो दाणा दाखविला व त्याविषयी पूर्वीप्रमाणेच प्रश्न टाकला. त्या म्हाताऱ्याने तो दाणा नीट न्याहाळला, कारण त्याची दृष्टी म्हणण्याइतकी क्षीण झाली नव्हती. तसेच राजाचे म्हणणेही त्याला चांगले ऐकू येत होते.

‘ नाही सरकार, मी माझ्या शेतात अशा प्रकारचे धान्य पेरले नाही व कापणीही केली नाही. विकत घेण्याचा तर प्रश्नच उत्पन्न होत नाही, कारण आमच्या वेळी कोणी धान्य विकत नसत. कोणाला लागलेच तर आम्ही एकमेकांना देत असू. सध्या ज्या प्रकारचे धान्य आपण खातो, त्यापेक्षा आमचे धान्य मोठे होते. परंतु आपण दाखविता एवढे मोठे धान्य मात्र आम्ही खास पाहिले नाही. माझे वडील आम्हास आजही सांगतात की, त्यांच्या वेळचे धान्याचे दाणे फार मोठे असत. कदाचित् ते या दाण्याबद्दल आपणास काही सांगू शकतील.’

राजाने त्याच्या वडिलांना बोलाविणे पाठविले. तो वृद्ध कुबडी न घेता सहज चालत आला. त्याची दृष्टी चांगली होती, ऐकावयासही चांगले येत होते, शिवाय वाणीही स्पष्ट होती. राजाने तो दाणा त्यास दाखविला. तो वृद्ध आजोबा तो दाणा हातात घेऊन वर-खाली करू लागला.

‘असला दाणा पाहून मला फार वर्षे झाली,’ असे म्हणून त्या वृद्धाने त्या दाण्याचा एक कण दाताने कुरतडला व त्याची चव कशी आहे ते तो पाहू लागला. ‘ होय, तोच तो,’ असे म्हणून त्या वृद्धाने आपल्या म्हणण्यास पुष्टि दिली.

‘आजोबा,’ राजाने पुन्हा विचारले,‘ केव्हा व कुठे असल्या प्रकारचे धान्य पैदा होत असे ? अशासारखे धान्य आपण कधी खरेदी केले होते काय? किंवा आपल्या शेतात पेरले होते काय ?’

‘अशा प्रकारचे धान्य आमच्या वेळी सर्वत्र होत असे.’ तो वृद्ध म्हणाला. ‘मी माझ्या तरुणपणी या धान्यावर राहिलो व दुसऱ्यासही ते खाऊ घातले.

पेरणी, कापणी, मळणी आम्ही अशाच धान्याची करीत असू.’

‘ मग आजोबा, मला असे सांगा की असले धान्य तुम्ही दुसरीकडे कोठे तरी विकत घेत होता की स्वत: पैदा करीत होता ?’

तो म्हातारा हसला आणि म्हणाला,‘ माझे वेळी धान्य विकण्याचे किंवा विकत घेण्याचे पाप करण्याचा कोणी विचारही करीत नसे. प्रत्येकाला स्वत:चे पुरेसे धान्य असे.’

‘ज्या तुमच्या शेतात असले धान्य उगवत होते, ते तुमचे शेत कोठे होते?’ राजाने विचारले.

‘ माझे शेत? माझे शेत म्हणजे परमेश्वराचे हे सगळे जग. जेथे आम्ही नांगरू ते आमचे शेत. जमिनीवर मालकी नव्हती. ही माझी जमीन, असा हक्क कोणी सांगत नसे. स्वत:ची मेहनत, स्वत:चे कष्ट काय ते आपले.’ वृद्ध आजोबा म्हणाले.

राजाला या माहितीवरून समाधान वाटल्यासारखे दिसत होते. तो पुन: म्हणाला, ‘आणखी दोन प्रश्न मला विचारावयाचे आहेत. पहिला : जमीन एवढे धान्य त्यावेळी का निर्माण करू शकली ? आज ती का असमर्थ आहे ? आणि दुसरा : तुमचा नातू दोन कुबड्यांशिवाय चालू शकत नाही, तुमच्या मुलास एक कुबडी लागते, व तुम्ही - आजोबा -इतके वृद्ध असूनही तुम्हास एकही कुबडी लागत नाही, तुमची दृष्टी चांगली आहे, दांतही खंबीर आहेत, ऐकायलाही चांगले येते, शिवाय वाणीही स्पष्ट आहे हे कसे काय ?’

तो वृद्ध म्हणाला,‘ सध्याच्या दुबळेपणाचे कारण मनुष्य स्वत:च्या कष्टावर अवलंबून न राहता, दुसऱ्याचे श्रमावर अवलंबून राहतो, हे होय . पूर्वी मनुष्य परमेश्वराचे कायद्याप्रमाणे वागत असे. ‘स्वत:चे कष्टाने मिळवलेले तेच आपले ’ असे पूर्वीचे लोक समजत असत. ते दुसऱ्यांनी श्रम करून मिळविलेल्या वस्तूंचा हेवा करीत नसत.’

: ६ :

एक ठिणगी



एका खेडेगावात इवान नावाचा शेतकरी राहत होता. त्याच्या तरुणपणी त्याची स्थिती बरी होती. कष्टाळू शेतकऱ्यांपैकी तो एक होता. शिवाय कर्तेसवरते तीन मुलगे त्याच्या हाताशी होते. थोरल्याचे लग्न झाले होते, दुसऱ्याच्या लग्नाची तयारी होती व तिसरा अजून पोर होता. तरी नांगरणे, घोड्याला पाणी पाजून आणणे वगैरे कामे तो करीत असे. इवानची बायकोही घरकामात हुशार व काटकसरीने संसार करणारी होती. सून मिळाली होती तीही आज्ञाधारक व पडेल ते काम करणारी . निरुद्योगी असा केवळ माणूस आणि तो म्हणजे इवानचे वडील. त्या बिचाऱ्याला सात वर्षांपासून दम्याचा विकार होता. चुलीजवळ आपला खोकत पडावयाचा. इवानला आज कशाची गरज होती असे नाही. तीन घोडे, एक शिंगरू, एक गाय - तिचे वासरू व पंधरा मेंढ्या त्याच्या जवळ होत्या. पुरुष शेती करीत असत व स्त्रिया त्यांना मदत करून कुटुंबाला लागणारा कपडा विणीत असत.

वर्षभर पुरेल इतके पुरेसे धान्य ते पिकवीत असत. शिवाय सरकारी कर देण्यासाठी व इतर गरजा भागविण्यासाठी ओट धान्य विकून त्यांना लागणारा पैसा मिळत असे. अशा रीतीने इवान व त्याची मुले-बाळे यांना सुखात राहता येण्यासारखी परिस्थिती होती. वाईट गोष्ट एवढीच होती की, इवान व त्याचा शेजारी गॅब्रिअल यांचे वितुष्ट होते.

गॅब्रिअलचे वडील जेव्हा जिवंत होते व इवानचा बापही जेव्हा आपला संसार पाहत असे, तेव्हा शेजाऱ्यास शोभेल असेच दोघांचे वर्तन होते. घरामध्ये कुणाला चाळण लागली, भांडे लागले, तर ती एकमेकांना देत असत. एकाची गाडी नादुरुस्त झाली तर त्याने दुसऱ्याची वापरावी. मळणीच्या वेळी शेजारचे वासरू आले व धान्य खाऊ लागले तर ' अहो, या वासराला सांभाळा हो, इकडे आमचे धान्य पडले आहे ' असे म्हणून त्या वासराला लावून देत असत. त्यांच्यामध्ये प्रेमभाव इतका होता की, धान्याच्या कोठाराला कुलूप क्वचितच लागलेले असावयाचे. एक दुसऱ्यापासून कोणतीही गोष्ट चोरून ठेवीत नसे. एकमेकांचा चहाडी-चुगली करणे तर त्यांना कधीही माहीत नव्हते.

ही झाली परिस्थिती वडिलांच्या वेळची. मुले ज्यावेळी कर्तीसवरती झाली त्यावेळी सर्वच गाडा पालटला. बरे, याला कारण काही मोठे होते म्हणावे तर तेही नाही.

इवानच्या सुनेची एक कोंबडी होती व तिने अंडी घालण्यास सुरुवात केली होती. ईस्टरच्या सणाकरिता ती सून अंडी जमवून ठेवू लागली. प्रत्येक दिवशी त्या कोंबडीने तबेल्यात जावे व तेथे गाडीमध्ये अंडे घालावे. एके दिवशी मुलांनी हुसकावल्यामुळे की काय कोण जाणे , ती कोंबडी शेजारच्या घरी गेली व तिने तेथे अंडे घातले. अंडे घातल्यावर कोंबडी ओरडते, त्याप्रमाणे ती या वेळीही ओरडू लागली. सून कामात होती. ती कोंबडीस उद्देशून म्हणते, '

आता नाही वेळ तुझ्याकडे यायला. माझे काम झाले म्हणजे मी येईन अंडे न्यायला.' काम उरकल्यावर ती गाडीकडे नेहमीप्रमाणे गेली, परंतु तेथे तिला अंडे दिसेना. सासूला, दिरांना अंडे नेले का म्हणून ती विचारू लागली. कोणीच हो म्हणेना. धाकट्या दिराने कोंबडीला पाहिले होते. तो काय म्हणतो, ' अहो वहिनी, तुमच्या कोंबडीने शेजारच्या घरी जाऊन अंडे घातले. ती तेथूनच मघाशी ओरडत होती व तेथूनच ती आपल्या आवारात उडून आली.'

त्या बाईने कोंबडीचा शोध केला. इतर कोंबड्यांबरोबर ती बसलेली तिने पाहिली. ' तू अंडे कोठे घातलेस ?' असे त्या कोंबडीसच विचारावे असे तिला वाटले, परंतु त्याचा काय उपयोग ? शेवटी ती शेजाऱ्याच्या घरी गेली. ती आलेली पाहून गॅब्रिअलची आई बाहेर आली व ' आपल्याला काय पाहिजे हो बाई ?' म्हणून तिने विचारले.

' माझी कोंबडी आज सकाळी आपल्याकडे आली. तिने आपल्याकडे अंडे घातले काय ?' ती म्हणाली.

' आम्ही तिला अंडे घालताना पाहिले नाही. आणि देव भले करो, आमच्या कोंबड्याही अंडी घालावयास लागल्या आहेत. आम्ही आमच्या कोंबड्यांचीच अंडी गोळा करतो. आम्हाला दुसऱ्यांच्या अंड्यांचे काय करावयाचे आहे. आणि पोरी, आम्ही आमची अंडी दुसऱ्याच्या घरी हुडकावयालाही जात नाही.'

त्या म्हातारीने दिलेला हा टोमणा त्या तरुण स्त्रीला फारच लागला. तिला ज्या गोष्टी बोलावयास नको होत्या, त्या ती बोलून गेली. शेजारणीनेही तिचे शब्द तिला सव्याज परत केले. इवानची बायको पाणी आणण्याकरिता गेली होती, तीही इतक्यात येऊन दाखल झाली व तिने भांडणात तोंड घातले. गॅब्रिअलची बायको पुढे सरसावली व घडलेल्या आणि न घडलेल्या गोष्टींचीही कुभांडे विरुद्ध पक्षावर रचण्यास तिने सुरुवात केली. सर्वत्र आरडाओरड सुरू झाली. सर्वच एकदम ओरडू लागले. व तोंडास येईल ती भाषा वापरू लागले.

विचार असा राहिलाच नाही.

'तू अशी आहेस, नि तू तशी आहेस ? तू चोर आहेस व लबाड आहेस, तू आपल्या सासऱ्याला अन्नावाचून ठार मारतेस, तर तुझी कवडीची किंमत नाही, मी चाळण वापरायला दिली आणि तू तिला भोक पाडून ठेविलेस, पाणी आणायला आमची कावड घेतली कशाला, दे ती इकडे.' इतकी बोलणी होतात तोच कावडीची हिसकाहिसक झाली व तीमधून आणलेले पाणी सांडले. एकमेकींचे फ्रॉक्स धराधरी व फाडाफाडी होऊन प्रकरण हातघाईवर आले. इतक्यात इवान व त्याचा मुलगा हेही दोघे पुढे सरसावले. इवान हा ताकदवान् गृहस्थ असल्यामुळे त्याने सर्वांची दाणादाण केली व गॅब्रिअलच्या दाढीचे केस उपटले. शेजारीपाजारी जमा झाले व त्यांनी भांडखोरांना सोडविले.

वितुष्ट यायला ही अशी सुरुवात झाली. इवानने उपटलेले आपल्या दाढीचे केस गॅब्रिअलने एका कागदात गुंडाळले व इवानविरुद्ध फिर्याद देण्यासाठी तो कोर्टात गेला. गॅब्रिअलची बायकोही शेजाऱ्याकडे जाऊन 'आम्ही इवानला सायबेरियाच्या तुरुंगात पाठवू तेव्हाच राहू' असे म्हणू लागली. भांडण हळूहळू जास्तच पेटू लागले.

इवानच्या वृद्ध पित्याने मात्र शांत होण्याबद्दल सर्वांची मनधरणी केली, परंतु त्या म्हाताऱ्याचे कोण ऐकतो . ' अरे मुलांनो, तुम्ही एवढ्याशा क्षुल्लक कारणावरून काय भांडता ? अंड्याची ती काय किंमत ? ईश्वराने सर्वांकरिता पुरेसे निर्माण करून ठेविले आहे. आणि घटकाभर असे आपण समजून चालू या की, शेजाऱ्याने आपणास कठोर भाषा वापरली तर त्याचे एवढे लावून कशाला घ्यायला हवे? प्रेमाने कसे बोलावे, हे त्यांस शिकवा म्हणजे झाले. भांडण होऊ नये - आणि भांडणे कोठे होत नाहीत ? — आपण सर्व पापी माणसे आहोत, झाली चूक दुरुस्त करून भांडणे गाडून टाकणे हेच श्रेयस्कर. रागाचा अग्नी पेटत ठेवण्यामध्ये आपलेच नुकसान आहे.'

परंतु या वृद्धाच्या उपदेशाकडे तरुण लक्ष देईनात. त्यांना हा उपदेश

म्हणजे म्हातारपणाची वृथा बडबड वाटली. शेजाऱ्यापुढे स्वतः कमीपणा स्वीकारणे हे इवानला पसंत पडेना.

'मी त्याची दाढी कधीही धरली नाही, त्यानेच माझे केस उपटले. त्यांच्या मुलांनीच उलट माझ्या या शर्टची फाडून चाळण बनविली.'' असे तो म्हणे.

गॅब्रिअल कोर्टात गेला तर इवानही कोर्टात गेला. न्यायखात्याकडून त्यांचे जाबजबाब घेण्यात आले. इतक्यात गॅब्रिअलच्या गाडीच्या जुंपण्या चोरीस गेल्या. गॅब्रिअलची बायकामाणसे म्हणू लागली की, त्या इवानच्या मुलाने चोरून नेल्या. 'गाडीकडे रात्री जाताना त्यास आम्ही पाहिला. त्या जुंपण्या घरमालकास देताना शेजाऱ्याने पाहिले , असे तो शेजारी म्हणतो.' वगैरे ती म्हणू लागली. जुंपण्याकरून पुनः भांडणे झाली व हेही प्रकरण कोर्टात गेले. भांडणाशिवाय एक दिवसही सुना जाईनासा झाला. मुले देखील मोठ्यांचे पाहून एकमेकांना शिवीगाळ करू लागली. बायका कपडे धुण्यासाठी जेव्हा नदीवर जात , तेव्हा त्यांच्या हाताऐवजी एकमेकींना शिव्या देण्यात त्यांच्या तोंडाची टकळीच चालत असे.

प्रथम एक शेतकरी एकमेकांविरुद्ध खरे खोटे आरोप करीत असत. परंतु पुढे पुढे दुसऱ्याची दिसेल ती वस्तू लांबविण्याचा त्यांनी सपाटा लाविला, मुलांनीही त्यांचाच कित्ता गिरविला. जगणे ही त्यांना कठीण गोष्ट होऊन बसली. गॅब्रिअल व इवान यांनी एकमेकांविरुद्ध ग्रामपंचायतीत , मामलेदाराकडे व जिल्हा कोर्टाकडे फिर्यादी करण्याचा क्रम ठेविला, इतका की, ह्या सर्व कोर्टांना भांडखोरांचा कंटाळा आला. गॅब्रिअलने इवानला दंड करविला, तर इवानने गॅब्रिअलला दंड करविला. एकमेकांबद्दल जसा द्वेष वाढला तसा रागही वाढला. कुत्री जशी भांडू लागली की, जास्त रागीट बनतात, तद्वतच त्यांची स्थिती झाली. एकाला शिक्षा किंवा दंड झाला म्हणजे त्याने म्हणावे,' थांब आता मी याचे उट्टे काढतो.' अशा रीतीने झगडा सहा वर्षे चालला. म्हातारा मात्र पुनःपुन्हा उपदेश करी.' बाळांनो, तुम्ही हे काय आरंभिले आहे ? उसने फेडण्याची हाव सोडून द्या. एकमेकांचा द्वेष न करता आपले काम कराल तर त्यांत तुमचे कल्याण आहे. द्वेष वाढवाल तर त्यात तुमचे अहित आहे.'

परंतु त्या बिचाऱ्याचे कोण ऐकणार ?

'मी गॅब्रिअलला घोडे चोरताना पाहिले' असा गॅब्रिअलवर सातव्या वर्षी इवानच्या सुनेने आरोप केला. गॅब्रिअलचा राग अनावर झाला. व त्याने तिला असा तडाखा दिला की, ती आठ दिवस बिछान्यावरून उठली नाही. आता आपल्याला गॅब्रिअलची पुरी खोड मोडता येईल असे वाटून एका दृष्टीने इवानला फार आनंद झाला. त्याने गॅब्रिअलविरुद्ध फिर्याद केली. परंतु मॅजिस्ट्रेटसाहेबांनी खटला हुसकून दिला. जिला मार बसला होता त्या बाईची शारीरिक परीक्षा घेता ती बरी असल्याचे दिसून आले. इवानने वरच्या कोर्टाकडे अपील केले , परंतु त्याने खटला पुनः खालच्या कोर्टाकडेच पाठविला. यामुळे इवान जास्तच चिडला. त्याने थोडी युक्ती लढवून कोर्टाचे नोकरास व अधिकाऱ्यास दारू पाजून खूष करुन गॅब्रिअलला फटक्यांची शिक्षा द्यावयास लाविली. शेतकरी गॅब्रिअल यास जिल्हा कोर्टामध्ये ' काठीचे वीस फटके देण्यात यावेत' अशी शिक्षा वाचून दाखविली असताना इवान मुद्दाम हजर होता व शिक्षा ऐकून गॅब्रिअनच्या चेहऱ्यावर काय परिणाम होतो, हे तो लक्षपूर्वक पाहात होता. शिक्षा ऐकल्याबरोबर त्याचे तोंड गोरेमोरे झाले व तो परतून जाऊ लागला. त्याचे मागे इवानही जाऊ लागला. 'काही हरकत नाही, माझ्या पाठीवर कोरडे बसतील व माझ्या पाठीची आग होईल, परंतु त्यालाही आग लावीन तर राहीन' असे गॅब्रिअल इवानला ऐकू जाईल इतक्या मोठ्याने पुटपुटला. इवान त्याच पावली परत फिरला व जज्जांना उद्देशून म्हणाला, 'पाहा हो, इवानच्या घराला आग लावीन , अशी हा मला दहशत घालीत आहे. या साक्षीदारांसमक्ष तो हे बोलला. पाहा, विचारा त्यांला' गॅब्रिअलला पुन्हा परत बोलावण्यात आले व तू असे म्हणालास का, असे त्याला विचारण्यात आले. 'मी काहीही बोललो नाही ,' असे तो म्हणाला. 'तुम्ही मला शिक्षा करा ,

कारण तुमच्या हाती सत्ता आहे, मी काहीही न करता शिक्षा मात्र मला. त्याने मात्र वाटेल ते करावे, त्याला कोण विचारणार ? ' गॅब्रिअलला आणखी बोलण्याची इच्छा होती, पण त्याचे ओठ थरथर कापत होते. रागारागाने त्याने आपली मान फिरविली. त्याचा चेहरा इतका क्रोधाविष्ट दिसत होता की, जज्जांना देखील त्याचे भय वाटले. ' हा स्वत:चे किंवा आपल्या शेजाऱ्याचे काहीतरी बरेवाईट केल्याशिवाय राहणार नाही,' असे ते स्वत:शी उद्गारले.

त्यांपैकी एक वृद्ध न्यायाधीश म्हणाला,' हे पहा मुलांनो, तुम्ही थोडा विचार करावा आणि आपले भांडण मिटवावे हे बरे. मित्रा गॅब्रिअला, गरोदर स्त्रीला मारणे हे तुला बरे दिसते का ? परमेश्वराची कृपा की, त्याचा काही वाईट परिणाम झाला नाही. परंतु काही बरेवाईट झाले असते तर? हे बरे आहे काय ? झाल्या गोष्टी कबूल करून तू इवानची क्षमा मागावीस हे उचित. तो तुला क्षमा करील व आम्हीही तुला मिळालेली कठोर शिक्षा रद्द करू.'

हे कोर्टाचे शब्द कारकुनाने ऐकले मात्र, तो ताडकन् उभा राहिला आणि म्हणाला,'नाही, कायद्याचे ११६ कलमाप्रमाणे आपणास शिक्षा रद्द करता येणार नाही. दोन्ही पक्षांना तडजोड करण्याची संधी दिली होती, परंतु त्यांनी तिचा फायदा घेतला नाही व म्हणून नाईलाजाने कोर्टास शिक्षा देणे भाग पडले.'

परंतु या कारकुनाच्या म्हणण्याकडे न्यायाधीशाने मुळीच लक्ष दिले नाही. उलट खरा न्याय कशास म्हणतात हे शिकविण्याचे दृष्टीने तो त्या कारकुनास म्हणाला,'आपण आपली जीभ आवरा. सर्व कायद्यांचे मर्म पाहिल्यास , परमेश्वराची आज्ञा पाळणे, हे आहे.परमेश्वरास शांती पाहिजे आहे, कलह नको आहे.' एवढे म्हणून त्याने त्या शेतकऱ्यांना पुन: दोन उपदेशाच्या गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. गॅब्रिअल मनात चरफडत होता.'मला पुढच्या वर्षी पन्नास वर्षे पूर्ण होतील. माझी मुले आज कर्ती झाली आहेत. आजवर कोणी मला बोटानेही दुखविले नाही व आज या खवड्या तोंडाच्या इवानने फटक्यांची शिक्षा

देवविली. इतके असून मीच त्याच्याकडे जावयाचे व त्याची क्षमा मागावयाची, हा कोठला न्याय ? छे, ते मुळीच होणे नाही. मी कष्ट सोसले व आणखीही सोसण्यास तयार आहे. माझी इवानला पुरी आठवण राहील असा सूड उगविल्याशिवाय मी कधीही राहणार नाही. हे तो मनात म्हणाला. हे मनात उठलेले काहूर त्याच्या चर्येवर स्पष्ट दिसत होते. त्याने बोलण्याचा प्रयत्न केला, परंतु तोंडातून शब्द उमटेना.

गावापासून कोर्ट सात मैल दूर होते. इवानला घरी पोहोचावयास संध्याकाळ झाली. त्याने घोड्याचे खोगीर उतरले व घरात गेला. तेथे कोणी नव्हते. शेतावरून मंडळी परत आली नव्हती. इवान खाली बसला व एकटाच विचार करू लागला. न्यायाधीशाने शिक्षा सांगताना गॅब्रिअलचा चेहरा कसा फिका पडला, त्याने दु:खाने आपले तोंड कसे फिरविले याचे चित्र त्याच्या डोळ्यापुढे पुन्हा स्पष्ट दिसू लागले व थोडे वाईटही वाटू लागले. हीच शिक्षा आपल्याला झाली असती तर आपल्याला काय वाटले असते. असा विचार त्याचे मनात उत्पन्न होऊन तो गॅब्रिअलची कीव करू लागला. त्याने आपल्या वृद्ध पित्याचे खोकणे ऐकले. इवान आलेला पाहून तो म्हातारा मुलाजवळ आला व आपला घसा साफ करून म्हणाला,'' काय, झाला का निकाल खटल्याचा ?''

'' होय, गॅब्रिअलला वीस फटक्यांची शिक्षा झाली '' इवानने उत्तर दिले. म्हाताऱ्याने नापसंतीदर्शक मान हलविली व कापऱ्या आवाजात तो म्हणाला,'' अरेरे, फार वाईट गोष्ट झाली. पोरा इवाना, ही गोष्ट जितकी गॅब्रिअलला नामुष्कीची आहे, त्यापेक्षा तुला जास्त काळिमा आणणारी आहे. त्याला वीस फटके बसतील, त्याने तुझे काय बरे होणार ?''

' तो पुन्हा तसे करणार नाही.' इवान म्हणाला.

' तो काय तसे करणार नाही ? तुझ्यापेक्षा जास्त वाईट असे त्याने काय केले ?'

'बाबा, असे का म्हणता ? त्याने दिलेला त्रास लक्षात आणा. त्याने माझ्या बायकोला जवळ जवळ ठार मारले, व आज तो पुन्हा , मी तुमचे घर जाळीन, असा धाक घालतो आहे. त्याबद्दल मी त्याचे आभार मानावेत असे आपले म्हणणे आहे काय ?'

म्हाताऱ्याने पुन्हा एक सुस्कारा टाकला आणि म्हटले,' इवान, तू या उघड्या जगात नेहमी फिरतोस व मी घरात बसून राहतो, यावरून तुलाच सर्व कळते व मला काहीच समजत नाही, असे का तुला वाटते ? मुला, तुलाच काही दिसत नाही. मत्सराने तुझी दृष्टी अंध झाली आहे. दुसऱ्याचे दोष काय ते तुलाच दिसतात, परंतु स्वत:चे दृष्टीआड करतोस. ' त्याचेच चुकले ' या म्हणण्यात काय अर्थ आहे ? त्याचेच जर चुकत होते, तर भांडण कसे लागते? एकाच हाताने टाळी कधी वाजते काय ? दोघांशिवाय भांडणेच होत नाहीत. त्याचा वाईटपणा तुला दिसतो, तुझा तुला दिसत नाही. तो वाईट असता व तू चांगला असतास, तर भांडण लागलेच नसते. त्याच्या दाढीचे केस कोणी उपटले? त्याच्या गवताच्या गंजीचा नाश कोणी केला ? त्याला कोर्टात कोणी खेचले ? इतके सर्व तू करून पुन्हा 'तो वाईट.' तुझे स्वत:चे चुकते आहे व ही गोष्ट फार वाईट आहे. मुला, त्याप्रमाणे आम्ही लहानपणी कधीही वागलो नाही व अशा वाकड्या रीतीने वागण्यासही तुला शिकविले नाही. गॅब्रिअलचा बाप आणि मी एकत्र कसे नांदलो ? शेजाऱ्यांनी जसे नांदावयास पाहिजे तसे. त्याच्या घरातले पीठ संपले तर कोणीही म्हणावे, ' तात्या, आम्हाला पीठ पाहिजे.' मी म्हणावे,'जा कोठारात व काय लागेल ते घ्या.' त्यांच्याजवळ घोडी चारावयास घेऊन जावयास कोणी नसले तर मी म्हणत असे, 'इवान , जा आणि घोड्यांना चार.' मला काही लागले तर मीही त्यांचेकडून मागून आणीत असे. असे प्रेमाने आम्ही दिवस काढले व यात आम्हाला किती आनंद वाटत होता म्हणून सांगू. परंतु आज काय ? काय मारामाऱ्या, काय मारामाऱ्या. याला काय जगणे म्हणावयाचे ? हा जिवंत नरक आहे. तू आज

घरचा धनी आहेस. त्याचा जाब , बाबा, तुला द्यावा लागेल. घरातील बायांना आणि मुलांना तरी तू काय शिकवण देत आहेस ? एकमेकांकडे पाहून गुरगुरावयाचे व बोटे मोडायची . परवा ती तुझी लहानशी पोरगी त्या शेजारणीला शिव्या देत होती, आणि तिची ती शहाणी आई खुशाल ऐकत होती व हसत होती. हे चांगले काय ? या सर्वांचा दोष तुझ्याकडे येतो आहे. जरा मनामध्ये विचार कर. चालले आहे ते सर्व ठीक आहे काय ? तू मला एक शब्द बोलतोस व मी प्रत्युत्तर म्हणून दोन शब्द बोलतो. तू एक टोला देतोस तर मी दोन देतो. नाही, नाही बाळा, ख्रिस्त ज्यावेळी या भूतलावर अवतरला त्यावेळी आम्हा पापी मानवांना हाच का धडा त्याने शिकविला ? 'जर तुला कोणी कठोर शब्द बोलला, तर तू स्तब्ध राहा, त्याची सदसद्विवेक बुद्धीच त्याला दोष देईल' हे प्रभूने आपणास शिकविले. ' एका गालावर कोणी मारले, तर दुसरा गाल पुढे करा. मी दोषास पात्र असेन तर मला मारा.' असे तुम्ही म्हणालात व खरोखरीच तुम्ही निर्दोषी असाल तर मारणाराचे मनाला थोडीतरी लाज वाटल्यावाचून कधीही राहणार नाही. त्याच्या हृदयाला पाझर फुटेल व तो तुमचे ऐकावयास तयार होईल. अहंकार टाकण्याबद्दल त्या प्रभुने आपणास उपदेश केलाना ? तू बोलत का नाहीस ? मी म्हणतो ते बरोबर आहे ना ? '' इवान स्तब्ध होता, त्यास काहीच उत्तर देता येईना. कारण म्हाताऱ्याच्या भाषणाने त्याच्या मनात जागृती झाली होती. म्हातारा खोकल्याने बेजार झाला होता. तो मधून मधून खोके, घसा साफ करी व पुन: बोलावयास सुरूवात करी.

'तुला असे वाटते की, ख्रिस्ताने आपणास चुकीचा उपदेश केला. परंतु तसे नसून तो सर्वस्वी आपल्या हिताचा आहे. या तुझ्या संसाराचा तू विचार कर. भांडण सुरू झाल्यापासून तू सुखी आहेस का दु:खी आहेस ? हा न्याय मिळविण्याच्या पायी तू किती खर्च केलास तो पहा. या भांडणाचा तुझ्या मुलाबाळांवर काय परिणाम झाला तो पाहा. अजूनही तुला सुखाने राहता येईल. परंतु तुझी मिळकत घटत चालली आहे आणि याचे कारण काय, तर

तुझा मूर्खपणा, तुझा गर्विष्टपणा. मुलांना घेऊन शेत नांगरावयाचे व बी पेरावयाचे, ही खरोखर तुझी कामे, परंतु ती सोडून, तुला अहंकाराची पिशाच्चबाधा झाल्यामुळे , तू कोर्ट-दरबार पाहू लागलास. वेळेवर नांगरणी, पेरणी होत नाही. बिचाऱ्या भूमातेने तुम्हाला जादा पैदास कशी करून द्यावी. ओट यावर्षी कमी का पिकावेत ? खटल्यापायी तू शहरात गेलास, तेथून परत आल्यावर पेरणी केलीस व त्याचा परिणाम काय झाला, तर एवढ्याशा धान्यावर मी माझ्या कुटुंबाचे पोषण कसे करू ? याची काळजी . बाळा, या तुझ्या खटपटीचा काय परिणाम होतो आहे तो पाहा. मुलामाणसांसह शेतामध्ये काम कर, कोण तुझी आगळीक करील तर त्याच्या वाटेस जाऊ नकोस, त्याला क्षमा कर. व अशाच तऱ्हेने तू वागावेस अशी परमेश्वराची इच्छा आहे. असा वागलास तर तुझा संसार सुखाने चालेल व तुझ्या जिवालाही आराम वाटेल.''

इवान कान देऊन शांतपणे ऐकत होता.

''माझ्या मुला, तुझा वृद्ध पिता काय सांगतो ते ऐक. घोड्यावर जीन चढव, सरकारात जा, खटला काढून घे. उद्या गॅब्रिअलकडे जा व परमेश्वरासाठी म्हणून त्याच्याशी सख्य कर व उद्यांच्या सणाला त्याला आपल्या घरी घेऊन ये. चहा कर, पाहिजे तर दारूची बाटली आण आणि या भांडणाला गाडून टाक. अशा रीतीने की, ते पुन्हा कधीही वर डोके काढणार नाही. भांडण तू विसर व घरातील मुलामाणसांनाही ते विसरावयास लाव.''

इवानने दीर्घ सुस्कारा टाकला व मनात विचार केला की. वडील म्हणतात ते काही खोटे नाही. त्याचे अंत:करण द्रवले, परंतु चूक दुरुस्त कशी करावी याची त्याला नीटशी कल्पना येईना. ही त्याच्या विचाराची चाललेली चलबिचल म्हाताऱ्याच्या लक्षात आली.

''जा इवाना, आजचे काम उद्यावर ढकलू नकोस. ही आग पसरण्यापूर्वीच विझवून टाक. मागाहून काही उपयोग होणार नाही.''

तो म्हातारा आणखी काही बोलणार होता, परंतु इतक्यात घरातील बाया टिटवीसारख्या बडबड करीत तेथे आल्या. गॅब्रिअलला फटक्यांची शिक्षा झाली व त्याने इवानचे घर जाळीन म्हणून धमकी घातली, ही बातमी या बायांना अगोदरच समजली. ही बातमी त्यांनी ऐकली व आपल्या पदरचे तिखट-मीठ लावून, ती वाढवून , ' गॅब्रिअल आता आमचे असे करणार आहे आणि तसे करणार आहे ' असे मोठमोठ्याने त्या सांगू लागल्या. ' गॅब्रिअलची सून आता आमच्यावर फिर्याद करणार आहे, गॅब्रिअलने काही न्यायाधीशांना आपलेसे केले असून ते आता सर्व खटला उलटवून टाकणार आहेत, त्याने शाळा-मास्तरकडून एक अर्ज खुद्द झारला लिहवला असून त्यात प्रथमपासूनची सर्व हकीकत नमूद केली आहे व इवानची अर्धी मालमत्ता हिसकावून घेण्याचा त्याचा बेत आहे, वगैरे त्या बोलू लागल्या. हे सर्व इवानने ऐकले व भांडण मिटवावे म्हणून थोड्या वेळापूर्वी, जी इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली होती ती पार मावळून गेली.

शेतावर शेतकऱ्यास पुष्कळ कामे असतात. इवान बायांच्या तोंडी न लागता उठला. तडक मळ्यावर गेला. तेथे थोडे काम केले, गडीमाणसांची पूसतपास केली, कामे किती झाली व किती राहिली आहेत ते पाहिले, घोड्याचे खोगीर दुरुस्त करण्यासाठी बरोबर घेतले, गुरांना वैरण घातली, टारासबरोबर रात्री चारण्यासाठी कुरणात घोडी पाठवावयाची असल्यामुळे ती मोकळी केली व फाटक लावून घरी जाण्यास निघाला. ' आता जेवण करू व झोपू ' तो स्वत:शी म्हणाला. घरात शिरेपर्यंत गॅब्रिअलचे भांडण व वडिलांनी केलेला उपदेश ही दोन्हीही तो विसरला होता. परंतु घरात शिरताच पलिकडच्या बाजूवरून शेजाऱ्याचे पुढील शिव्याशाप त्याचे कानी आले. ' तो अगदी पिशाच्च आहे. त्याला पुरा गाडलाच पाहिजे ' हे शब्द ऐकताच इवानचे मनातील शेजाऱ्याविषयीचा द्वेष पुन: जागृत झाला. गॅब्रिअलच्या सर्व शिव्या त्याने ऐकून घेतल्या व जेव्हा गॅब्रिअल स्तब्ध बसला तेव्हा इवान घरात शिरला.

घरात दिवा जळत होता. त्याची सून लोकर कातीत बसली होती, बायको स्वैपाक करीत होती, मुलगा स्वतःच्या जोड्याकरिता बंद तयार करीत होता, दुसरा मुलगा पुस्तक वाचीत होता व टारास घोड्यांना चारावयास घेऊन जाण्यासाठी निघाला होता. घरात सर्वत्र समाधान दिसत होते. वाईट गोष्ट एकच होती व ती म्हणजे शेजाऱ्याशी वितुष्ट.

इवान घरात शिरला, त्यावेळी तो खिन्न व दुर्मुखलेला दिसत होता. बाकावर बसलेले मांजर त्याने हुसकून दिले. सांडपाण्याचे घमेले भलत्याच ठिकाणी ठेवल्याबद्दल घरातील मंडळींना शिवी हासडली व फाटके खोगीर दुरुस्त करण्यासाठी खाली बसला. 'त्याला पुरा गाडलाच पाहिजे,' हे गॅब्रिअलचे शब्द त्याच्या कानात घुमत होते.

त्याच्या बायकोने टारासला जेवावयास घातले. जेवण आटोपल्यावर त्याने कपडे चढविले, थोडीशी भाकर बरोबर घेतली व घोडी चारण्यास नेण्यासाठी तो निघाला. त्याला पोचविण्याकरता इवान बाहेर आला. सर्वत्र काळोख पसरला होता. आकाशात ढग जमले होते व वाराही सुटलेला होता. मुलाला घोड्यावर बसविले व तो दूर जाईपर्यंत तसाच त्याकडे पाहात उभा राहिला. ' मी तुझ्या घराला आग लावीन ' हे गॅब्रिअलचे शब्द तो अजून विसरला नव्हता.

'तो आता जिवावर उदार झाला आहे,' इवान मनात म्हणाला. ' सर्व रान वाळून गेले आहे. वाराही जोराचा सुटला आहे. तो हरामखोर चोरून लपून येईल आणि माझी झोपडी जाळून टाकील, त्याचा नेम काय सांगावा ? आग लावताना जर तो सापडेल, तर त्याची पुरी शंभर वर्षे भरलीच. आपल्या घराभोवती एक चक्कर तर टाकावी, त्याचे काय बेत चालले असतील कोण जाणे.' इवान हळूच फाटकाबाहेर पडला. तो घराचा कोपरा ओलांडतो न ओलांडतो तोच पलीकडच्या कोपऱ्याजवळ कोणी तरी दिसल्यासारखे झाले. त्याने थोडावेळ स्तब्ध उभे राहून पाहिले, कानोसा घेतला, परंतु कोठेच काही

दिसेना. झाडांची पाने व छपराचे गवत सळसळ करीत होते.

' मला नुसताच भास झाला असे दिसते' इवान मनात म्हणाला. तरीपण पुनः एकदा चक्कर मारावी असा विचार करून पाय न वाजविता तो जाऊ लागला. ज्या बाजूस त्याला कोणी दिसल्याचा भास झाला, तेथे त्याला पुनः काहीतरी दिसले व नाहीसे झाले. इवानचे काळीज एकदम लक्क झाले व तो थोडा थांबला. थोडा वेळ उभा राहून पाहतो तो डोक्याला टोपी नसलेला कोणी माणूस पाठमोरा बसलेला त्याला दिसला. त्याच्या हातात पेटविलेला एक गवताचा पुंजका होता. इवानचे अंतःकरण घडघडू लागले. सर्व सामर्थ्य एकवटून लांब ढांगा टाकीत तो त्या माणसाकडे जाऊ लागला. आता हा पळून जाणे शक्य नाही, त्यास मी खात्रीने पकडीन, असे त्याला वाटले.

इवान अजून दूरच होता. इतक्यात झोपडीच्या वळचणीला आग भडकल्याचे त्याला दिसून आले व त्याखाली गॅब्रिअलची आकृती त्याला स्पष्ट दिसू लागली. भारद्वाज पक्षावर बहिरीससाण्याने ज्याप्रमाणे झडप घालावी त्याप्रमाणे इवान गॅब्रिअलवर झडप घालणार तोच गॅब्रिअलने इवानच्या पावलाची चाहूल ऐकली व तो चटकन् निसटला.

इवानही त्याचे मागे धावला. आता हा कोठे जाणार, असे त्याला वाटले. इवान गॅब्रिअलला पकडणार इतक्यात गॅब्रिअलने त्याला झुकांडी दिली. इवानच्या हाती गॅब्रिअलच्या कोटाचा पदर लागला. परंतु त्यायोगे गॅब्रिअल न सापडता पदर फाटून इवानच्या हाती आला व तो खाली पडला. तो तसाच उठला व ' धरा, पकडा, चोर, खून ' असे ओरडत गॅब्रिअलमागे धावला. गॅब्रिअल आपले घराचे फाटकापर्यंत जातो तोच इवानही तेथे जाऊन पोहोचला व त्याला पकडणार इतक्यात गॅब्रिअलने जवळच पडलेली काठी इवानच्या डोक्यात घातली व इवान मूर्च्छा येऊन खाली पडला.

इवानचे डोळ्यांपुढे काजवे उभे राहिले, सर्वत्र अंधार पडल्यासारखे झाले व घडपडत तो खाली पडला आणि बेशुद्ध झाला. थोड्याच वेळाने तो

शुद्धीवर आला. तेथे त्याला गॅब्रिअल दिसेना. उजाडावे त्याप्रमाणे सर्वत्र प्रकाश त्याला दिसला. इंजीनमध्ये घातलेला कोळसा जसा तडतड वाजावा तसे इवानचे पेटलेले घर वाजत होते. घराच्या मागची पडळही पेटलेली होती.

'भल्या गृहस्थांनो, हे काय केले ?' इवान छाती बडवीत ओरडत म्हणाला. 'अरेरे, वळचणीची पेटलेली पहिली गवताची कवळ खाली ओढून ती पायाखाली दाबून विझवावयास पाहिजे होती. मित्रांनो, हे मी काय केले ? अरेरे, हे काय केले ?' इवानची ही बडबड चालू होती. त्यास मोठ्याने ओरडावे असे वाटले, परंतु ओरडता येईना. आग विझविण्यास आपण जावे असे त्याला वाटे, परंतु पाय उचलेना. हळूहळू मागच्या पडळीजवळ जातो तो बाजूचीही पडळ पेटली. चोहोबाजूंनी आग भडकली. घराच्या अंगणात शिरता येईना. आजूबाजूची सारी माणसे गोळा झाली, परंतु उपयोग काय ? आग आपल्या घराला पोचेल या भीतीने ते आपल्या घरातील सामान व जनावरे बाहेर काढून दूर नेऊ लागले. इवानच्या घराची आग गॅब्रिअलच्या घराला लागली व वाऱ्याने इतकी भडकली की, अर्धे खेडे जळून खाक झाले.

इवानच्या घरातून तर म्हाताऱ्याला बाहेर काढता काढता मुष्कील झाली. बायामाणसे तर अंगावरील कपड्यांनिशी बाहेर पडली. घोडी चारण्याकरता बाहेर नेली होती तेवढी बचावली, बाकी गुरेढोरे , कोंबड्या, बदके, गाड्या, नांगर, कुळव, कपड्यांच्या पेट्या व धान्याची पोती वगैरे सर्व जळून गेले. गॅब्रिअलच्या घरातून काही जनावरे व दुसऱ्या थोड्या वस्तू बाहेर काढता आल्या एवढेच. बाकी त्याचीही गत तीच .

सर्व रात्रभर आग भडकत होती. इवान आपल्या घरासमोर बसला व चळ भरल्याप्रमाणे, 'अरे गृहस्थांनो, हे काय केले ? एकाद्याने ते गवत पायाखाली दडपून विझवावयास पाहिजे होते.' असे सारखा म्हणत होता. छप्पर खाली कोसळले. जळता वासा धरून इवान ओढू लागला. बायांनी त्याला परत बोलाविले, परंतु तो वासा ओढीतच होता. दुसऱ्या जळत्या वाशाला

त्याने पुन: हात घातला. इतक्यात त्याचा पाय सरकला व तो विस्तवात जाऊन पडला. त्याचा मुलगा त्याकडे धावत जाऊन त्याने त्यास बाहेर काढले. इवानची दाढी, डोक्याचे केस, व अंगावरील कपडे जळून गेले. परंतु त्याच्या चेहेऱ्यावर दु:खाची एकही छटा दिसेना. दु:खाने त्याला वेड लागले, असे लोक म्हणू लागले. आग विझत चालली होती, इवान मात्र भ्रमिष्टाप्रमाणे ' मित्रांनो, हे काय केले ? ही आग विझविता आली असती ' असे सारखे म्हणत होता.

सकाळी पाटलाचा मुलगा इवानकडे आला आणि म्हणाला, 'इवान दादा, आपले वडील घाबरे झाले आहेत व आपली शेवटची भेट घेण्याची इच्छा करीत आहेत.' इवान या वेळेपर्यंत आपल्या वडिलांना पूर्ण विसरला होता. तो मुलगा काय म्हणतो हे त्याला नीट समजेना.

'काय ? बाबा, आणि कोणाला ते बोलावीत आहेत ? ' इवानने घाबऱ्या घाबऱ्या विचारले.

'आपल्या वडिलांनी आपल्या भेटीची इच्छा दर्शविली आहे. त्यांचे प्राण कंठी आले आहेत. चला, दादा, लवकर चला.' असे म्हणून त्या मुलाने इवानचा हात धरून त्याला आपल्याबरोबर चालवले.

इवानचे वडील आगीने भाजल्यामुळे त्यांस गवताच्या एका कोपऱ्याला आगीपासून दूर अशा ठिकाणी नेण्यात आले होते. इवान बापाकडे आला त्यावेळी त्या म्हाताऱ्याजवळ पाटलाची बायको व काही लहान मुले फक्त होती. इतर सर्व माणसे आग लागल्या ठिकाणी होती. म्हाताऱ्याने हातात एक मेणबत्ती धरली होती व दाराकडे डोळे लावून तो सारखा पाहात बसला होता. मुलगा आला हे कळताच त्याने त्यास जवळ बोलावले व सद्गदित कंठाने तो म्हणाला, 'इवान, मी तुला काय सांगितले होते ? या गावाला आग कोणी लावली ?'

'बाबा, आग गॅब्रिअलने लावली. ती लावत असताना मी त्यास पकडले. हातात पेटलेले गवत खाली काढून विझविता आले असते व मग एवढा प्रसंग

टळला असता, परंतु —'

'इवान , मी आता मरत आहे . तुलाही केव्हातरी मृत्यूला तोंड द्यावे लागेल. हे कोणाचे पाप आहे ?'

इवानच्या तोंडून शब्द निघेना. तो वडिलांकडे पाहात स्तब्ध बसला.

'देवाला स्मरून सांग, हे कोणाचे पाप आहे ? मी तुला काय सांगत होतो ?'

इवानचे डोळे आता पूर्ण उघडले. त्याच्या अंत:करणात लख्ख प्रकाश पडला. त्याने एक सुस्कारा टाकला व वडिलांपुढे हात जोडून व गुडघे टेकून तो म्हणाला,' माझे , बाबा, ते पाप माझे आहे . क्षमा करा. मी तुमच्या घरी व देवाघरी गुन्हा केला आहे.'

म्हाताऱ्याची शक्ती क्षीण होत चालली होती. कसेबसे हात जोडून व आकाशाकडे डोळे लावून ' प्रभूची क्षमा माग. प्रभूची क्षमा माग ' असे तो त्यास म्हणाला.

' इवाना, अरे बाळ इवाना.'

' काय बाबा?'

' आता पोरा तू काय करणार ?'

इवानच्या डोळ्यांतून अश्रू सारखे वहात होते.

' बाबा, आता जगावे कसे हे मला कळेनासे झाले आहे .'

म्हाताऱ्याने आपले डोळे झाकले. मोठ्या प्रयत्नाने आपले ओठ हालविले व पुन्हा डोळे भरून इवानला पाहिले. ' परमेश्वराची आज्ञा पाळशील तर अजूनही जगणे कठीण नाही.' थोडे थांबून स्मित वदनाने तो पुन: म्हणाला, 'लक्षात ठेव. आग कोणी लाविली हे कोणासही सांगू नकोस. दुसऱ्याचे एक पाप दडवून ठेवशील, तरच परमेश्वर तुझ्या दोन पापांची तुला क्षमा करील.'

इतके बोलून दोन्ही हातांनी मेणबत्ती धरून त्याने ती आपल्या छातीजवळ आणली, एक सुस्कारा टाकला, हातपाय ताठ केले व शेवटी प्राण सोडला.

इवानने पुढे गॅब्रिअलविरुद्ध एक शब्द देखील उच्चारला नाही आणि आग कशी लागली हे कोणासही कळले नाही.

गॅब्रिअलविरुद्ध इवानचा राग पार मावळून गेला. इवानने आगीचे गुपित कोणासही कळवले नाही हे पाहून गॅब्रिअलला आश्चर्य वाटले. प्रथम गॅब्रिअलला फार भीती वाटली, परंतु पुढे त्याला विशेष वाटेनासे झाले. पुरुषांनी भांडण्याचे थांबविल्यामुळे बायकाही शांत झाल्या. या दोघांनी आपल्या झोपड्या बांधावयास काढल्या, तेव्हा दोघे एकाच घरात राहू लागले व नवीन बांधलेल्या झोपड्यांमधून पूर्वीप्रमाणेच ते चांगले शेजारी म्हणून राहू लागले.

चांगले शेजारी जसे गुण्यागोविंदाने राहतात, त्याप्रमाणे ते दोघे राहिले. मरताना आपल्या वडिलांनी उपदेशिल्याप्रमाणे इवान देवाची आज्ञा पाळू लागला व भांडणाची पहिली ठिणगी प्रथम विझवू लागला. कोणी त्याला दुखापत केली तर तो आता सूड घेण्याचा प्रयत्न न करता सलोखा कसा उत्पन्न होईल हे पाहतो. कोणी एखाद्याने त्याला अपशब्द केला, तर परत अपशब्द न करता तो दुसऱ्यास वाईट शब्द न बोलण्याबद्दल उपदेश करतो, त्याचप्रमाणे आपल्या स्त्रियांना व मुलांना तो उपदेश करतो. इवानने आज पूर्वव्रत आपला संसार चालविला असून त्याची स्थिती पूर्वीपेक्षा फार चांगली झालेली आहे.

: ७ :

एका माणसाला किती जमीन लागते ?



थोरली बहीण धाकट्या बहिणीस भेटण्यासाठी खेडेगावी आली. थोरलीचे लग्न शहरातील एका व्यापाऱ्याबरोबर लागले होते. धाकटीचे खेड्यातील शेतकऱ्याबरोबर लागले होते. चहा घेता घेता सहज बोलणें निघाले. थोरली बहीण शहराच्या राहणीची तरफदारी करून बोलू लागली. शहरात किती सुख असते, लहानांचा व मोठ्यांचा पोषाख किती सुरेख असतो, खाणे-पिणे किती चांगले असते, नाटक, सिनेमा वगैरे करमणुकीचा पुरवठा किती मुबलक असतो इत्यादी ती सांगू लागली. धाकट्या बहिणीस हे तिचे तोऱ्याचे बोलणे सहन झाले नाही. शहरातल्या व्यापाऱ्याच्या आयुष्यक्रमास दूषण देतच तिने आपल्या खेड्याच्या राहणीची स्तुती केली. 'मला बाई, आमचीच राहणी फार सुखाची वाटते.' ती म्हणाली, 'आमची राहणी साधी, जाडीभरडी, परंतु

मनाला काळजी नाही. तुम्ही आमच्यापेक्षा जास्त थाटात राहता, परंतु तुमची गरज भागून तुम्हाजवळ जे राहते ते गमावण्याची भीतीही तुम्हाला जास्त आहे. 'फायदा आणि तोटा हे सख्खे जुळे भाऊ आहेत' ही म्हण लक्षात ठेवा. आज जे श्रीमंत आहेत ते उद्या भिकेला लागण्याचा संभव आहे. आमचा मार्ग कमी धोक्याचा आहे. श्रीमंतीने जरी आम्हाला राहता आले नाही तरी खाण्यापिण्याची कधी पंचाईत पडणार नाही.'

थोरल्या बहिणीस एवढे बोलणे कसे खपणार ? ती एकदम रागाने कडाडली, 'बस कर, तूच आपली या गुराढोरांच्या खातेऱ्यात लोळत राहा. तुला शहरातल्या गोड रीतीभाती कोठून कळणार ? तुमच्या पुरुषांनी गुलामाप्रमाणे जरी कामे केली तरी, तुमची व तुमच्या मुलाबाळांची आहे ही स्थिती सुधारणार नाही.'

'त्यात काय मोठेसे,' धाकटी म्हणाली, 'आम्हाला काबाडकष्ट करावे लागतात, हे आम्ही कबूल करतो, परंतु कसेही असले तरी त्यासाठी आम्हाला कोणाची मनधरणी करावी लागत नाही. तुमच्या शहरात सतरा हजार मोह तुमच्या पाठीस लागलेले. आज ठीक आहे परंतु उद्या काय होईल, कोणी सांगावे ? आक्काबाईचा फेरा फिरला, जुगार, दारू, बाहेरख्यालीपणा यांच्या कचाट्यात यजमानांची स्वारी सापडली म्हणजे सर्वस्वाचा नाश. अशा गोष्टी घडताना आपण नेहमी पाहात नाही काय ?'.

घराचा धनी पाहोम हा चुलीच्या बाजूला पडल्या पडल्या हे संभाषण ऐकत होता. 'खरोखर आम्हा शेतकऱ्यांची स्थिती या म्हणतात त्याप्रमाणे वाईट आहे व याचे कारण आम्हाजवळ जेवढी जमीन असावयास पाहिजे तेवढी नसते, हेच होय. माझ्याजवळ जर आणखी जमीन असती तर मी काळालाही भीक घातली नसती.'

बायांचा चहा झाला. पोशाखासंबंधी थोडी विचारपूस झाली व नंतर विश्रांति घेण्याकरिता त्या सर्व निघून गेल्या.

'आपणाला आणखी जमीन पाहिजे' ही पिशाच्चरूपी तृष्णा पाहोमला स्वस्थ बसू देईनात. फाजील तृष्णेच्या मोहात सापडून आपण सैतानाचे स्वाधीन होत आहोत, याचे भानही पाहोमला राहिले नाही.

पाहोम ज्या खेड्यात राहात होता, तेथेच एक श्रीमंत बाई राहात होती. तिची तीनशे एकर जमीन होती. तिचे शेतकऱ्यांशी नेहमी सलोख्याचे वर्तन असे. परंतु तिने एका पेन्शनर शिपायास आपला कारभारी नेमल्यापासून हा संबंध नाहीसा झाला. शेतकरी शेजाऱ्याची जरा चूक झाली की, त्याने त्यांना दंड करावा. पाहोम फार दक्षतेने वागत असे, परंतु त्याचा घोडा त्या बाईच्या शेतात शिरे, किंवा त्याची गाय बागेत जाऊन त्याची नासाडी करी व त्यामुळे पाहोमला दंड भरावा लागे.

पाहोम हा दंड भरी, परंतु मनात चडफडे व घरी जाऊन मनातला राग मुलामाणसांवर काढी.

केव्हा एकदाची थंडी येते व गुरे घरात बांधून राहतात असे त्यास झाले होते. गुरांना थंडीमुळे चरण्याची बंदी झाली, हे पाहून त्याला जरा वाईट वाटे, परंतु रोज उठून दंडाची खटपट तरी टळली, या विचाराने त्याला समाधान वाटे.

ही बाई आपले शेत शेजारच्या खाणावळवाल्यास विकणार आहे असे शेतकऱ्यांना कळले व त्यांच्यामध्ये विचार सुरू झाला. 'त्या खाणावळवाल्याने जमीन घेतली तर आतापेक्षासुद्धा जास्त दंड भरण्याची पाळी आपणावर येणार,' असे जो तो म्हणू लागला. 'खाणावळवाल्यास जमीन न विकता आम्हा शेतकऱ्यांना ती द्या,' अशी विनंती शेतकऱ्यांमार्फत त्या बाईस करण्याचे ठरले. बाईनेही त्यांचे म्हणण्यास रुकार दिला. सर्वांनी मिळून जमीन खरेदी करावयाची, असे जरी ठरले होते तरी स्वार्थबुद्धीमुळे एकोप्याने ती खरेदी करता येईना. अखेरीस स्वतंत्ररीत्या प्रत्येकाने जमीन खरेदी करावी असे ठरले. व त्यासही बाईने कबुली दिली.

आपला शेजारी पन्नास एकर जमीन खरेदी करणार असून अर्धी रोख किंमत व अर्धी एक वर्षानंतर घेण्याचे त्या बाईने कबूल केल्याचे त्यास समजले. मत्सराने पाहोमचे मन जळू लागले.

'ती जमीन पाहा, बाई सर्व विकावयास निघाली आहे व आपणास एक टीचभरही मिळत नाही,' तो आपल्या बायकोला म्हणाला, 'दुसरे लोक खरेदी करू लागले आहेत व आपणासही कमीत कमी वीस एकर जमीन खरेदी केलीच पाहिजे. तो कारभारी दंडाने आपणास सारखा पिळून काढीत आहे.' सर्वजण विचार करू लागले. शंभर रुबल आपणाजवळ आहेत. एक शिंगरू विकून टाकू. अर्ध्या मधमाशा विकू, एका मुलास दुसऱ्याकडे कामास ठेवून त्याचा पगार अगोदर मागून घेऊ. मेहुण्याकडून थोडे पैसे उसने काढू व अशा रीतीने जमिनीची अर्धी किंमत आज देऊन टाकू, असा बेत ठरला. चाळीस एकरांचा एक तुकडा निवडण्यात आला. बाईचा व पाहोमचा करारमदार झाला. अर्धी रक्कम आता द्यावयाची व अर्धी दोन वर्षांचे मुदतीत द्यावयाची, असे ठरले.

आता पाहोमजवळ बरीच जमीन झाली. त्याने बी उधार आणिले आणि आपल्या जमिनीत पेरले. पीक चांगले आले व एका वर्षाचे अवधीत त्या बाईचे व आपल्या मेहुण्याचे कर्ज तो फेडू शकला. पाहोम आता जमीनदार झाला. स्वत: जमीन कसू लागला, स्वत:च्या जमिनीवर गवत तयार करू लागला, स्वत:ची झाडे तोडू लागला. व आपल्या कुरणातच आपली गुरे चारू लागला. जेव्हा तो शेतात जाई व आपल्या कुरणाकडे , पिकाकडे दृष्टी फेकी तेव्हा त्याचे अंत:करण आनंदाने उचंबळून येई. आपल्या शेतामध्ये तयार होणारे धान्य व उमलणारी फुले इतरत्र क्वचितच पाहावयास सापडतील, असे त्यास वाटे. ती जमीन ज्या वेळेला त्याची नव्हती, त्यावेळी किती वेळा त्या बाजूने तो गेला, परंतु असे कधीच त्याला वाटले नव्हते. आज मात्र त्याचे मनात सर्व पालट झाला.

पाहोमचे आता बरे चालले होते आणि त्याच्या शेजाऱ्यांनी त्याच्या

शेतामधून कधी कधी जाऊन अतिक्रमण केले नसते, तर तो फार सुखी झाला असता. त्याने त्यांना अनेक वेळा हात जोडून असे न करण्याबद्दल विनंती केली, परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. गावातल्या गाई त्याच्या कुरणात कधी चरत, कधी लोक घोडीच रात्रीच्या वेळी त्याच्या शेतात सोडून देत. पाहोमने अशा जनावरांना पुन: शेतातून हाकलून द्यावे व स्वस्थ बसावे, दुसऱ्यांनी केलेल्या खोड्या विसरून , कोणावरही फिर्याद करण्याचे त्याने टाळले. परंतु मनुष्य सहन तरी किती वेळ करणार ? शेवटी त्याने जिल्हा कोर्टात फिर्याद गुदरली. आपल्या शेजाऱ्यांना स्वत:ची पुरेशी जमीन नाही, म्हणून ते आपली गुरे माझ्या कुरणात सोडतात, हे तो जाणून होता, परंतु या विचाराने मी माझ्याजवळ आहे ते गमावून बसू काय ? या शेजाऱ्यांना तरी काही शिस्त पाहिजे की नाही, असेही त्याला पुन: वाटे.

एकावर फिर्याद झाली, दुसऱ्यावर झाली; एकाला दंड झाला, दुसऱ्याला दंड झाला. पाहोमचे शेजारी पाहोमचा द्वेष करू लागले व आता मुद्दाम आपली जनावरे ते त्याच्या शेतात सोडू लागले. एका शेजाऱ्याने रात्री पाहोमच्या बागेत जाऊन पाच लिंबाची कोवळी झाडे, केवळ सालींसाठी तोडली. पाहोम सहज बागेतून हिंडत असता साली काढलेली ही पांढरी लाकडे त्याला दिसली. शेजारीच झाडाचे तुटलेले बुंधेही त्याच्या निदर्शनास आले. 'एखादी फांदी तोडणे हे देखील वाईट; इथे तर या पाजी माणसाने सबंध झाडेच्या झाडेच तोडून टाकली. मला जर तो गुन्हेगार पकडता आला तर त्याला या पापाचे प्रायश्चित्त दिल्याशिवाय मी राहणार नाही.' त्याने आपले डोके खाजवून हा कोण असला पाहिजे, याचा विचार केला. 'हा सायमनच असला पाहिजे, दुसरे कोणी असे करणार नाही.' असे मनाशी ठरवून तो सायमनच्या घरी गेला. जो तो पाहोमकडे रागीट मुद्रेने पाहू लागला. आता तर त्याचे मनात पूर्ण घेतले की, हा गुन्हा सायमननेच केला असला पाहिजे. त्याने सायमनवरच फिर्याद गुदरली. खटला चालला. एकदा चौकशी झाली, दुसऱ्यांदा चौकशी

झाली; शेवटी सायमन सुटला. त्यानेच गुन्हा केला, यास पुरावाच नव्हता. पाहोम अगदी गरम झाला. 'तुम्ही प्रामाणिक असता तर या चोराला असे सोडून न देता. त्या गुलामाने तुमची मूठ दाबली असली पाहिजे.' अशी न्यायाधीशावर आग पाखडू लागला.

पाहोम अशा रीतीने शेजाऱ्याशी व वरिष्ठ न्यायाधीशाशी भांडू लागला. त्याच्याजवळ जमीन मुबलक होती, परंतु पूर्वी गावात त्याच्याविषयी लोकांना जो आदर वाटत असे, तो आता वाटेनासा झाला.

यावेळी अशी एक बातमी पसरली की, लोक नवीन वसाहत करण्याकरिता जाणार आहेत. मला माझी जमीन सोडून जाण्याचे काहीच कारण नाही. हे शेजारी बाहेर जातील, तर एकप्रकारे बरेच होईल. मी त्यांच्या जमिनी घेईन, म्हणजे त्यांच्यापासून आज मला जो त्रास पोहोचतो तो तरी पोहोचणार नाही. आहे त्या जमिनीत सुखाने राहता येईल, असे मला वाटत नाही. असा तो स्वत:शी विचार करू लागला.

एके दिवशी एक पांथस्थ शेतकरी त्याचे घरी उतरला. पाहोमने त्यास जेवण देऊन त्याची झोपण्याची व्यवस्था केली. जेवण झाल्यावर दोघे इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत बसले. पाहोमने पाहुण्याचे नाव गाव विचारले. मी व्होल्गा नदीच्या पलीकडील मुलखातून आलो असे त्याने सांगितले. बोलता बोलता वसाहतीविषयी गोष्टी निघाल्या. माझ्या गावचे काही लोक त्या वसाहतीमध्ये शेती करीत आहेत. या वसाहतीत प्रत्येकाच्या वाटणीस पंचवीस एकर जमीन आली आहे. जमीन चांगली असून त्यात राय धान्याचे पीक इतके भरदार येते की, पाच ताटांचीच एक पेंढी होते व ते इतके उंच येते की, त्यामध्ये घोडेदेखील बुडून जाते. एका शेतकऱ्याने बरोबर एक पैचेही भांडवल आणले नव्हते; परंतु आपल्या मेहनतीने तो आज सहा घोड्यांचा व दोन गाईंचा धनी झाला आहे.

पाहोमच्या तोंडाला पाणी सुटले. त्याला असे वाटले की, आपण या

अशा भिकारड्या स्थितीत राहण्यापेक्षा जमीन व घरदार विकून पैसा उभा करावा व त्या पैशामधून नवीन वसाहतीवर मुबलक जमीन खरेदी करावी. खरी वस्तुस्थिती काय आहे हे प्रत्यक्ष पाहण्याचे त्याने ठरवले.

उन्हाळा सुरू होताच त्याने निघण्याची तयारी केली. तो व्होल्गा नदीने सामारा गावाला गेला. तेथून पायांनी ३०० मैल गेला व योग्य स्थळी पोहोचला. वर्णन केल्याप्रमाणे पिकांची स्थिती त्याचे नजरेस आली. प्रत्येक शेतकऱ्यास पुरेशी जमीन असल्याचे त्याला दिसून आले. गावसमितीकडून प्रत्येकास २५ एकर जमीन मिळाली असून ज्याच्याजवळ पैसा आहे, त्याला दोन शिलिंगाला एक एकर याप्रमाणे जमीन, लागेल तितकी, स्वत:करिता खरेदी करता येते हे त्याने पाहिले.

पाहोम घरी आला व आपली चीजवस्तू विकण्यास त्याने सुरुवात केली. जमीन, घर, गुरेढोरे सर्व विकून टाकली. गावसमितीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला व वसंत-ऋतूचा समय पाहून मुलामाणसांसह तो नवीन वसाहतीकडे निघाला.

पाहोम आपल्या कुटुंबासह नवीन ठिकाणी पोहोचताक्षणीच त्याने गाव-समितीकडे समितीत स्वत:ला दाखल करून घेण्यासाठी अर्ज दिला. नियमाप्रमाणे कागदपत्र तयार केले. पाहोम व त्याची मुले यांना मिळून पंचविसाचा एक भाग असे पाच भाग, म्हणजे १२५ एकर मिळाले. शिवाय गावाकरिता राखून ठेवलेल्या चराईरानाचा उपभोग घेण्याचाही हक्क मिळाला. पाहोमने घर बांधले व जनावरे खरेदी केली. गावसमितीकडून त्याला मिळालेली जमीन त्याच्या पूर्वीच्या जमिनीच्या तिप्पट होती; शिवाय गुणाला उत्तम. पूर्वीपेक्षा त्याची स्थिती दसपटीने चांगली होती. शेतीला जमीन पुष्कळ व चराईरानही मुबलक - कितीही जनावरे वाढविली तरी चाऱ्याची पंचाईत नव्हती.

प्रथम काही दिवस, इमारती बांधण्याच्या व जनावरे खरेदी करण्याच्या धामधुमीमध्ये पाहोमचे दिवस सुखाने गेले. स्थिरस्थावर झाल्यानंतर थोड्या

दिवसांनी मात्र त्याला पुन्हा या स्थितीचा कंटाळा येऊ लागला. पहिल्या वर्षी ग्रामसमितीकडून मिळालेल्या जमिनीमध्ये त्याने गहू पेरला व त्याचे चांगले पीक आले. सालोसाल त्याला हे पीक काढावेसे वाटले, परंतु तसे करता येईना. कारण त्या देशाच्या रिवाजाप्रमाणे एका शेतातून लागोपाठ एक किंवा दोनच पिके काढता येत असत; व पुढे तीत गवत येईपर्यंत ती पाडून ठेवावी लागे. पाहोमने सर्व शेतात गहू पेरल्यामुळे पुढच्या वर्षी त्याला स्वस्थ बसावे लागले. आपल्याजवळ जास्त जमीन असती तर असे हात जोडून बसण्याचा प्रसंग आला नसता, असे त्याला पुन्हा वाटू लागले. पुष्कळांना दरवर्षी अशा प्रकारे लागवडी जमीन लागत असे व काही - ज्यांना स्वत: जमीन करता येत नसे ते दुसऱ्यास आपल्या जमिनी भाड्याने देत असत. अशा लोकांकडून पाहोमने जमिनी लागवडीस घेतल्या. त्यात गहू पेरला व पीकही चांगले आले. परंतु अशा जमिनी गावापासून जरा दूर असल्यामुळे, केलेले धान्य गाडीतून घरी आणावे लागत असे. ही परिस्थिती बरी नाही असे त्यास वाटले. ज्यांच्या जमिनी एकत्र आहेत त्यांना फायदा होतो. आपल्याही जमिनी एकत्र असत्या तर किती बरे झाले आते, असे त्यास वाटू लागले.

तीन वर्षे त्याने याप्रमाणे काढली. त्याला प्राप्ती चांगली झाली व पैशाचीही बचत होऊ लागली. समाधानाने दिवस घालविण्यासही परिस्थिती चांगली होती; परंतु दुसऱ्यापासून भाड्याने जमिनी घ्यायच्या, या गोष्टीचा त्याला हळूहळू कंटाळा येऊ लागला. जमिनी भाड्याने मिळू लागल्या म्हणजे त्या घेण्याकरिता शेतकऱ्यांच्या उड्या पडत असत व एखादा दक्ष नसला तर जमीन मिळणेही दुरापास्त होत असे. एखादा आपली जमीन भाडेपट्ट्याने देतो कधी व ती आपण घेतो कधी; अशा साशंक मनोवृत्तीने दिवस घालविणे त्याला बरे वाटेना. एकदा त्याने दुसऱ्या शेतकऱ्याच्या भागीमध्ये काही शेतकऱ्यांची जमीन केली. ती नांगरली व नंतर तीविषयी भांडणे सुरू झाली; अखेर ती जमीन त्याला सोडणे भाग पडले. नांगरणीसाठी केलेले श्रम व्यर्थ गेले. 'ही जमीन

आपली असती तर हा प्रसंग आला असता का ? आपण स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे असले दुःखाचे प्रसंग तरी येणार नाहीत.' असे पाहोमला वाटू लागले.

पाहोम जमीन विकत घेण्याच्या खटपटीस लागला. एका शेतकऱ्याजवळ १३०० एकर जमीन विकाऊ सापडली. तो बिचारा अडचणीमध्ये असल्यामुळे जमीन स्वस्त विकण्यास तयार झाला होता. घासाघीस करून त्या जमिनीची किंमत १५०० रुबल ठरली. काही रक्कम रोख द्यायची व काही पुढे द्यायची असे उभयपक्षी ठरले. हा सौदा ठरतो न ठरतो तो एके दिवशी एक वाटसरू शेतकरी घोड्यास वैरण मिळविण्यासाठी पाहोमच्या इथे थांबला. दोघांनी एकत्र चहा घेतला व गप्पागोष्टी झाल्या. तो शेतकरी बाशकर प्रांतातून आला होता. त्याने त्या ठिकाणी तेरा हजार एकर जमीन फक्त एक हजार रुबलास खरेदी केली होती. हे ऐकताच पाहोमला सानंद आश्चर्य वाटले व तो त्या वाटसरूला प्रश्नावर प्रश्न विचारू लागला. तो प्रवासी म्हणाला, 'ज्याला जमीन पाहिजे असेल त्याने बाशकरच्या प्रमुखांना खूष केले म्हणजे झाले. मी शंभर रुबल किंमतीचे रेशमी कपडे, सतरंज्या, चहाची पेटी व जे पितील त्यांना दारू दिली व मला एका एकराला एका पेनीपेक्षाही कमी किंमत पडली !' इतके सांगून त्याने आपले कागदपत्र पाहोमला दाखवले. 'ती जमीन नदीच्या काठी असून लागवडीस अजून आणलेली नाही. एक वर्षभर चालत राहिला तरी पुरणार नाही, एवढी जमीन तेथे सर्व बाशकीर लोकांच्या ताब्यात आहे. बिचारे गाईसारखे गरीब आहेत व त्यांच्याकडून जवळजवळ फुकट जमीन मिळण्यासारखी आहे.'

'अशी जर वस्तुस्थिती आहे तर १५०० रुबल देऊन फक्त १३०० एकर जमीन मी कशास घेऊ व शिवाय आणखी माझ्या उरावर कशाला ऋण ठेवू ? तेवढ्यात मला बाशकीर येथे दसपट जमीन खरेदी करता येईल.' पाहोम मनात विचार करू लागला.

त्या ठिकाणास जाण्याचा मार्ग पाहोमने विचारून घेतला व व्यापारी निघून गेल्यानंतर तिकडे स्वतः जाण्याची त्याने तयारी केली. आपल्या कुटुंबास घरादाराकडे लक्ष द्यावयास सांगून एक नोकर बरोबर घेऊन तो निघाला. प्रवासामध्ये त्यास एक शहर लागले; तेथे व्यापारी-मित्राने सांगितल्याप्रमाणे चहाची पेटी, दारू, देणगीदाखल देण्याकरिता इतर काही वस्तू खरेदी केल्या. सहा दिवसपर्यंत सारखा प्रवास चालला होता. तीनशे मैल ते चालून गेले. सातव्या दिवशी बाशकीर लोकांच्या तंबूजवळ ते येऊन दाखल झाले. व्यापाऱ्याने वर्णन केल्याप्रमाणे सर्व स्थिती त्यांना दिसून आली. नदीच्या काठी गवताळ जागेत लोकांनी तंबू ठोकले होते. हे लोक जमीन कसत नसत व भाकरी करून खात नसत. गुरेढोरे, घोडी चारावयाची, घोडीचे दूध काढायचे व स्त्रियांनी दुधाचा मावा किंवा कुमीश म्हणून त्याचे एक पेय बनवायचे. पुरुषांनी मावा, मटन खायचे व चहा प्यायचा आणि इतर वेळी पावा वाजवायचा. याशिवाय दुसरा उद्योग नाही. ते भले गलेलठ्ठ व आनंदी असत व सर्व उन्हाळा असा काढीत. त्यांना रशियन भाषा फारशी येत नव्हती; परंतु जरी ते अडाणी होते तरी स्वभावाने दिलदार होते.

पाहोमला पाहिल्याबरोबर ते तंबूबाहेर आले व सर्व त्याच्याभोवती जमले. त्यांनी दुभाष्याला बोलावून आणले व त्यांचे मध्यस्थीने बोलणे सुरू झाले. जमीन मिळावी यासाठी मी आलो आहे, असे पाहोमने सांगितले. सर्व बायकीर लोकांना आनंद झाला. त्यांनी त्यास एका चांगल्या तंबूमध्ये नेले, मऊ पराच्या गादीवर त्यास बसविले व सर्व त्याच्याभोवती बसले. त्यांनी त्यास मावा व चहा दिला. मुद्दाम एक बकरे मारून त्याचे मांस त्यास दिले. पाहोमने आपल्या गाडीतून बक्षीस देण्याकरता आणलेल्या वस्तू काढल्या व त्या आणि चहा त्या लोकांमध्ये वाटून दिला. बाशकीर दुभाष्याला काय बोलावयाचे ते तो सांगू लागला.

'आपण आल्याने आम्हास फारच आनंद होत आहे. आमचे जे पाहुणे

आहेत व जे आम्हास देणगीदाखल काही देतात त्यांना संतुष्ट करावे व त्यांच्या देणगीचा त्यांना मोबदला द्यावा, अशी आमची चाल आहे. तुम्ही आम्हास या वस्तू दिल्या, आता आम्ही आपणांस काय दिले असता आपणांस जास्त आनंद होईल, हे आम्हांस सांगा, म्हणजे आम्ही ते आपणांस देऊ.' दुभाष्याने बोलून दाखविले.

'तुमची एक गोष्ट जर मला विशेष आवडत असेल तर ती जमीन होय. आमच्या जमिनीवर माणसांची दाटी झाली असून जमिनीही निकस झाल्या आहेत. तुमच्याजवळ जमीन मुबलक आहे व चांगली आहे. यासारखी जमीन माझ्या कोठेच पाहण्यात आली नाही.' पाहोमने उत्तर दिले.

दुभाष्याने हे भाषण समजावून सांगितले. बाशकीर लोक पुन्हा एकमेकांत हसत मोठ्याने बोलू लागले व थोडे शांत होऊन पाहोमकडे पाहू लागले. दुभाष्याने त्यांचा मतलब पाहोमला कळविला. 'आपल्याला लागेल ती जमीन आम्ही आपणांस देण्यास तयार आहोत, असे त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही हातांनी फक्त दाखवा, तुम्हांस कोणती जमीन पाहिजे ती. की ती तुमची झालीच !'

यावर ते बाशकीर पुन्हा आपापल्यामध्ये चर्चा करू लागले. हे का बाचतात, असे पाहोमने दुभाष्यास विचारतां त्याने सांगितले की, काहींचे म्हणणे असे आहे की, मुख्यांना विचारल्याशिवाय जमीन देण्यात येऊ नये व काहींच्या दृष्टीने हे विचारण्याची जरूर नाही.

ही बाचाबाच चालली आहे तोच कोल्ह्याच्या केसाळ कातड्याची टोपी घातलेला एक गृहस्थ तेथे आला. इतक्यात सर्व स्तब्ध झाले व त्याला मान देण्याकरिता उठून उभे राहिले. दुभाष्याने पाहोमला उद्देशून सांगितले, हे आमचे प्रमुख. पाहोमने ताबडतोब पाच पौंडांचा चहाचा पुडा व एक उत्तम झगा देणगी म्हणून पुढे केला व त्याचा मुख्याने स्वीकार केला व आपल्या मानाच्या

जागी तो जाऊन बसला. नंतर त्याचे व त्याच्या लोकांचे आपसांत भाषण झाले व नंतर पाहोमकडे वळून तो रशियन भाषेत बोलू लागला.

'आपल्याला जी जमीन लागेल ती घ्या. आमच्याजवळ पुष्कळ जमीन आहे.'

'मला लागेल ती व लागेल तितकी जमीन मी कशी घेणार ! माझी जमीन म्हणून मला ती कागदपत्राने निश्चित करावी लागेल, नाहीतर आज मी माझी जमीन म्हणून म्हणेन व उद्या तिच्यावर दुसराच मालकी सांगावयास तयार व्हायचा. आपण जमीन मोजून माझ्या स्वाधीन करणार नाही काय ? जगणे व मरणे परमेश्वराचे स्वाधीन आहे ! तुम्ही सर्व मंडळी चांगली आहांत. ही जमीन तुम्ही मला दिलीत; परंतु उद्या तुमच्या मुलांनी जर ती परत घेण्याची इच्छा दर्शवली तर ?'

'तुमचे म्हणणे बरोबर आहे. आम्ही जमीन रीतसर तुमच्या स्वाधीन करू.'

'मला वाटते, थोडे दिवसांपूर्वी एकाने आपणांकडून काही जमीन मिळविली आहे, त्यास आपण जसा स्वदस्तुरचा करार करून दिला आहे, त्याप्रमाणे मलाही द्यावा.'

'होय, ते सहज करता येईल. आमच्याजवळ एक पंडित आहे. तो आपल्याबरोबर जवळच्या शहरी जाऊन कागद तयार करील.'

'परंतु आपण जमिनीची किंमत काय घ्याल ?' हे पाहोमने विचारले.

'आमची किंमत सर्वदा एकच आहे. एका दिवसाचे एक हजार रुबल.'

पाहोमला हे समजेना म्हणून त्याने पुन्हा विचारले.

'एका दिवसाला एक हजार रुबल ? हे काय माप आहे ? म्हणजे किती एकर झाले ?'

'ते एकराचे माप आम्हास माहीत नाही. आमचे हे दिवसाचे माप. एका

दिवसात जेवढ्या जमिनीच्या भोवती तुम्हाला पायी जाता येईल, तेवढ्या जमिनीस तुम्हांस एक हजार रुबल पडतील.'

'एका दिवसात बऱ्याच मोठ्या जमिनीला प्रदक्षिणा घालता येईल !' पाहोमने आश्चर्यचकित होऊन विचारले.

'मग तेवढी सर्व जमीन तुमची होईल.' मुख्याने हसत हसतच उत्तर दिले. 'मात्र याला एक अट आहे. ज्या ठिकाणावरून प्रदक्षिणा घालण्यास तुम्ही सुरुवात कराल त्या ठिकाणी तुम्हास सूर्यास्तापूर्वी परत येऊन पोहोचले पाहिजे. तसे न होईल तर तुमचा पैसा तुम्ही हरलात असे होईल.'

'परंतु मी अमुकच जमिनीतून गेलो हे निश्चित कसे करायचे ?'

'तुम्हाला जी जमीन लागेल तेथे आम्ही येऊ व थांबू. तुम्ही आपल्याबरोबर कुदळ घ्या. जेथे जेथे आपण वळाल तेथे तेथे जमीन खणून एक मातीचा लहानसा ढिगारा करा. मग आम्ही मागाहून नांगर घेऊन जाऊ व एका ढिगाऱ्यापासून दुसऱ्या ढिगाऱ्यापर्यंत नांगराच्या फाळाने खूण करू.' तुम्हाला जेवढी जमीन वेढावयाची असेल तेवढी वेढा, परंतु सूर्य अस्तास जाण्यापूर्वी मूळ ठिकाणावर तुम्हास आले पाहिजे.'

पाहोमला अत्यानंद झाला. दुसऱ्याच दिवशी सकाळी निघण्याचे त्याने ठरविले. नंतर सर्वांनी मिळून मटन, कुमीश पेय व चहा घेतला आणि रात्रीची विश्रांती घेण्याकरिता ते निघून गेले. पाहोमला मऊ पराचा बिछाना झोपण्यास दिला. दुसऱ्या दिवशी पहाटेस निघण्याचे सर्वांनी ठरविले.

पाहोम पराच्या मऊ बिछान्यावर झोपला होता, परंतु त्याला झोप येईना. जमिनीविषयी सर्व विचार त्याच्या डोक्यात खेळत होते.

'उद्या मोठी जमीन मी निवडतो. एका दिवसात पस्तीस मैल मला सहज जाता येईल. दिवसही सध्या मोठा आहे. पस्तीस मैलांच्या परिघामध्ये केवढी मोठी जमीन सामावेल ! कमी प्रतीची जमीन मी विकून टाकीन किंवा दुसऱ्यास

खंडाने देईन. दोन बैलांच्या जोड्या विकत घेईन. दीडशे एकर जमीन नांगरून लागवडीस आणीन व बाकीची चराईरान म्हणून राखून ठेवीन.'

पाहोमचा डोळ्याला डोळा लागला नाही. पहाटेस जरा डोळा लागतो न लागतो तोच त्याला एक स्वप्न पडले. 'आपण तंबूमध्ये असून तंबूचे बाहेर कोणीतरी तोंडाने चक्चक् असा आवाज करीत आहे' असे त्याला वाटले. कोण असावे म्हणून आश्चर्याने पाहण्याकरिता तो बाहेर गेला, तो त्यास बाशकीर-प्रमुख पोट धरधरून हसत असल्याचे दिसून आले. पुन्हा जवळ जाऊन पाहतो तो तो बाशकीर-प्रमुख नसून ज्या व्यापाऱ्याने आपणांस या जमिनीची माहिती दिली तो व्यापारी असल्याचे दिसून आले. आपण इथे केव्हा आला असे पाहोम विचारणार तो तो व्यापारी नसून व्होल्गा नदीच्या काठचा थोड्या दिवसांपूर्वी आपल्या घरी आलेला शेतकरी आहे, असे त्यास दिसून आले. पुन्हा जरा निरखून पाहतो तो तो शेतकरी नसून शिंगे व खूर असलेले भूत आहे व ते तेथे बसून चक्चक् असा आवाज काढीत आहे, असे शेवटी त्याचे प्रत्ययास आले. भुताचे शेजारीच शर्ट व पायजमा घातलेला व पायात जोडा नसलेला एक मनुष्य आडवा पडलेला त्याने पाहिला. पाहोम बारकाईने त्या मनुष्याकडे पाहू लागला तो त्यास तो मेला असल्याचे दिसून आले व तो मनुष्य दुसरा कोणी नसून आपणच आहोत हेही त्याने ओळखले! असे वेडेवाकडे स्वप्न पाहिल्याबरोबर तो भीतीने खडबडून जागा झाला व 'माणसाला काय स्वप्ने पडतात !' म्हणून स्वत:च आश्चर्य करू लागला. सभोवार पाहतो तो त्यास दिशा उजाळल्याचे दिसून आले. 'लोकांना आता उठविले पाहिजे, निघण्याची वेळ झाली' तो स्वत:शी म्हणाला. त्याने आपल्या गड्याला उठविले. घोड्यावर खोगीर घालण्यास सांगितले व आपण बाशकीर लोकांना उठविण्यास निघाला.

'जमीन मोजण्यास निघण्याची वेळ झाली.' पाहोम त्यांना म्हणाला. नंतर सर्व बाशकीर लोक गोळा झाले. त्यांनी चहा घेतला. कुमीस पेय घेतले.

पाहोमलाही चहा देऊ केला, परंतु चहा घेण्यासही त्यास वेळ नव्हता; इतका तो अधीर झाला होता. 'आपणास जर जायचे आहे, तर लवकर गेलेले बरे!' तो म्हणाला.

सर्व लोक निघाले. काही घोड्यावर निघाले. काही गाडीत निघाले. पाहोम आपल्या गड्यासह गाडीत बसला. त्याने बरोबर कुदळ घेतली होती. योग्य स्थळी पोहोचताक्षणीच तांबडे फुटू लागले. सर्व बाशकीर लोक एका टेकडीवर बसले. त्यांचा मुख्य पाहोमजवळ आला व हाताने जमिनीकडे बोट दाखवून म्हणाला, 'ही जी जमीन दिसते आहे, ती सर्व आमची. यातील वाटेल तो भाग घ्या.'

पाहोमच्या डोळ्यात आनंद नाचू लागला. पिकाखाली कधीही न आणलेली सपाट, काळीभोर जमीन असून मधून मधून खोलगट भागातून वेगवेगळ्या प्रकारचे गवत उंच-छताएवढे, वाढल्याचे त्याच्या दृष्टीस पडले. मुख्याने आपल्या डोक्यावरील टोपी काढली व जमिनीवर ठेवली. 'ही आपली खूण. चला इथून चालायला लागा व इथे पुन्हा परत या. जितक्या जागेला तुम्ही वळसा घालाल तेवढी जागा तुमची,' तो म्हणाला.

पाहोमने पैसे काढले व ते टोपीवर ठेवले. नंतर त्याने आपला कोट काढला; आखूड बाह्यांचा एक सदरा व त्यावर जाकीट एवढे फक्त अंगात ठेवले. कमरेचा पट्टा थोडा सैल करून पोटाखाली तो घट्ट बांधला. खिशात एक भाकरीची पिशवी घेतली व कमरेस पाण्याची थैली लटकावली व हातात कुदळ घेऊन निघण्यासाठी तो तयार झाला. सर्वच बाजू त्याला आकर्षक दिसत होत्या. कोणत्या बाजूने जावे हेच त्याला समजेना. अखेर उगवत्या सूर्याकडेच जाण्याचे त्याने ठरवले. पूर्वेकडे तोंड करून सूर्य वर डोकावण्याची तो वाट पाहात बसला. 'मला वेळ गमावता कामा नये. सकाळचा वेळ शांत असल्यामुळे चालण्याचाही विशेष त्रास होणार नाही.' तो स्वत:शी म्हणाला.

सूर्याची किरणे वर येऊन चमकतात तोच कुदळ खांद्यावर घेऊन पाहोमने चालण्यास सुरूवात केली. त्याने आपली चाल मध्यमच ठेवली होती. एक हजार यार्ड गेल्यावर त्याने एक खळगा केला व मातीची ढेकळे एकत्र रचून त्यांचा ढीग केला; व पुन्हा चालायला सुरुवात केली. आता त्याने आपली चाल वाढविली. थोड्या वेळाने दुसरा खड्डा केला व ढीग रचला. पाहोमने मागे पाहिले. सूर्यप्रकाशात ती टेकडी, तीवरील लोक व गाड्यांची चमकणारी चाके त्याला स्पष्ट दिसत होती. आपण तीन मैल आलो, असे पाहोमला वाटले. थोडी उष्णता भासू लागली. पाहोमने अंगातील जाकीट काढून खांद्यावर टाकले व चालण्यास सुरुवात केली. सूर्याकडे पाहून, आता आपणास लवकरच न्याहारी करावी लागेल, असाही विचार त्याच्या मनात आला. 'शेताची एक बाजू तर झाली, आता तीन आक्रमायच्या आहेत. परंतु इतक्यात वळणे बरें होणार नाही. मी माझ्या पायातील बूट काढतो.' असे म्हणून त्याने बूट काढला, तो कमरेस लटकावला व पुन्हा चालण्यास सुरूवात केली. त्याला चालताना हलके हलके वाटू लागले. आपण न वळता आणखी तीन मैल असेच जाऊ. ही जमीन फारच चांगली आहे. ती टाळून चालणार नाही, असा विचार करून तो सरळ जाऊ लागला. मागे वळून टेकडीकडे पाहू लागला. ती आता फारच लहान दिसत होती, त्यावरील माणसे तर काळ्या मुंग्यांएवढी दिसू लागली.

'मी एकाच दिशेने फार दूर आलो. आता वळणे जरूर आहे. शिवाय मला तहान लागली असून, घामही आला आहे. तो थांबला, एक खड्डा खणला व मातीचा एक ढीग रचला. पाण्याची किटली काढली, त्यातील थोडे पाणी प्यायला व डावीकडे वळून पुढे चालू लागला. गवत उंच वाढलेले होते व उन्हाचा तापही बराच जाचू लागला होता. पाहोमला थकल्यासारखे वाटले. सूर्याकडे पाहून दुपार झाल्याचे त्याचे निदर्शनास आले. आता आपण विश्रांती घ्यावी, असा विचार करून तो खाली बसला. थोडी भाकरी खाऊन पाणी प्याला, परंतु खाली लवंडला नाही; कारण खाली पडले की, कदाचित् झोप लागायची, अशी त्याला भीती पडली. थोड्या वेळाने त्याने चालण्यास सुरुवात

केली. आता त्याला बरीच हुषारी वाटत होती. उन्हाचे तापाने त्याला झोप येऊ लागली; परंतु तो तसाच रेटून चालू लागला. 'एका तासाच्या त्रासाने सबंध आयुष्यभर सुख मिळेल' असा विचार करून विश्रांतीचा विचार तो बाजूस सारी.

याही बाजूने तो बराच दूर गेला व आता डाव्या बाजूला वळणार तो त्याला एक खोलगट जमिनीचा तुकडा दिसला. 'ही जमीन सोडणे म्हणजे मूर्खपणाच. इथे तागाचे पीक किती उत्तम येईल !' असा विचार करून तो तसाच पुढे चालला व नंतर थोड्या वेळाने त्याने खड्डा खांदून मातीचा ढीग बनविला.

उष्णतेच्या योगाने जमिनीतून जणू काय वाफा निघत होत्या व त्यामुळे लांबचे फारसे स्पष्ट दिसतही नव्हते. टेकडी तर त्याला क्वचितच दिसत होती ! 'अरे बाप रे ! मी या बाजू बऱ्याच लांब घेतल्या. आता ही बाजू मला लहान केली पाहिजे.' आता तो तिसऱ्या बाजूने झपझप पावले टाकीत निघाला. त्याने सूर्याकडे पाहिले, तो बराच खाली ढळलेला दिसला. प्रथम खूण केलेल्या ठिकाणापासून तो दहा मैल दूर होता. 'जागा थोडी तिपड झालीतरी हरत नाही, परंतु आता मला सरळच मूळ स्थानाकडे गेले पाहिजे,' असे त्याने आपल्या मनाशी ठरविले व जमीन खोदून एक ढीग केला.

पाहोम टेकडीकडे निघाला, परंतु थकल्यामुळे त्याला जोराने चालता येईना. तो उन्हाने घामाघूम झाला होता. पायात काही नसल्यामुळे त्यांना कित्येक ठिकाणी फोड आले होते व ते काही ठिकाणी चिरले होते. पाय कापू लागले व आपण विश्रांती घ्यावी असे कितीतरी वेळा त्यास वाटले; परंतु सूर्यास्तापूर्वी मूळ ठिकाणी यायचे असल्यामुळे ते त्यास शक्य नव्हते. सूर्य काही कोणाकरिता वाट पाहात नसतो ! तो हळूहळू खाली उतरतच होता.

'पुष्कळ जमीन लाभावी या आशेने, अरेरे, मी केवढी चूक केली ! जर मला वेळीच पोहोचता आले नाही तर ?' अशीही शंका त्याच्या मनात आली.

सूर्याकडे पाहणे व टेकडीकडे पाहणे हे त्याचे चालूच होते. सूर्य क्षितिजाजवळ आला होता.

पाहोम आता अगदी टेकीस आला. तसाच जोर करून तो चालू लागला. अंगावरील जाकीट, डोक्याची टोपी, कमरेची पाण्याची किटली, बूट ही सर्व त्याने फेकून दिली व कुदळ टेकीत टेकीत त्याने हळूहळू पळण्यास सुरु वात केली. 'काय करावे ! अधाशीपणामुळे मी माझ्यावर केवढे संकट ओढवून घेतले ! मला सूर्यास्ताचे आत टेकडी गाठता येणार नाही असे दिसते.' या भीतीने तर त्याचे धैर्य पार गळून गेले. शर्ट, विजार भिजून चिंब झाली होती, तोंडाला कोरड पडली होती, सारखे पळाल्यामुळे तो जोराने धापा टाकू लागला व त्याचे पाय लटपटू लागले. आपण आता मरतो की काय असे पाहोमला वाटले.

मरणाची भीती वाटली तरी त्याला थांबवेना. 'इतका वेळ पळून जर मी आता थांबलो, तर सर्व लोक मला मूर्ख म्हणतील.' असा विचार करून तो स्वतःला पुन्हा धीर देई. बाशकीर लोक त्याला पाहून हाका मारू लागले. या आरोळ्यांनी पाहोमलाही थोडा धीर आला व पळण्यास उमेद आली. सूर्य लाल झालेला व अगदी क्षितिजाजवळ आलेला त्याने पाहिला. बाशकीर लोक हात हालवून आपणास लवकर येण्याबद्दल इशारा करीत आहेत, लोकरीची टोपी व त्यावर असलेले पैसे तसेच असून त्या शेजारी बसलेला तो प्रमुख पोट धरधरून हसतो आहे, हे पाहून तो चपापला व त्यास पहाटेस पडलेल्या स्वप्नाची आठवण आली. तो मनात म्हणू लागला, 'जमीन मुबलक आहे, परंतु तिचा उपभोग घेण्यास परमेश्वर मला जिवंत ठेवील का ? माझे प्राण कासावीस झाले आहेत ! मी जिवंत राहू शकत नाही. टेकडी गाठता येईल असे काही मला वाटत नाही !'

पाहोमने सूर्याकडे पाहिले. तो क्षितिजास टेकला होता. त्याचा थोडा भाग क्षितिजाखाली अदृश्य झाला होता. पाहोम टेकडीच्या पायथ्याशी आला

तो काळोख पडला. त्याने वर सूर्याकडे पाहिले, त्याला तो दिसेना. 'अरेरे ! माझे सर्व श्रम वाया गेले' असे म्हणून तो थांबणार तो बाशकीर लोंक ओरडून म्हणाले, 'अरे, सूर्य तुला दिसत नसला तरी आम्ही टेकडीवर असल्यामुळे तो आम्हास दिसत आहे; तर अजून प्रयत्न कर.' पाहोमने पुन्हा श्वास घेतला व आपले सर्व सामर्थ्य एकवटून तो टेकडीवर आला. तेथे त्याला प्रकाश अद्याप दिसत होता. ती टोपी व तिचे शेजारी बसलेला तो प्रमुख अजून मोठमोठ्याने हसत होता. पाहोमला पुन्हा स्वप्नाची आठवण झाली, त्याचे पाय गळाले व त्याने धाडकन् अंग टाकून टोपीस लांब हात करून स्पर्श केला.

'शाबास, काय हुशार मनुष्य आहे ! केवढी मोठी जमीन याने मिळवली!' सर्व ओरडले.

पाहोमचा नोकर धावत जवळ आला व त्याने त्याला वर उचलण्याचा प्रयत्न केला; परंतु पाहोमच्या तोंडातून रक्त वाहत असल्याचे व तो मरण पावल्याचे त्याला दिसून आले.

सर्व बाशकीर लोकांना फार वाईट वाटले. जो तो चक्चक् करून आपले दुःख दाखवू लागला.

पाहोमच्या गड्याने मालकाच्या जवळची कुदळ घेतली, पाहोमला पुरेल एवढा खड्डा खोदला व त्यात त्याला पुरले. पाहोमला कितीतरी जमीन पाहिजे होती ! परंतु खरे पाहता, एका माणसाला किती जमीन लागते ? डोक्यापासून पायापर्यंत केवळ सहा फूट; व तेवढ्यातच अखेर पाहोमला पडून रहावे लागले.

: ८ :

मनुष्य कशावर जगतो ?



सायमन नावाचा एक चांभार होता. त्याला घरदार, जमीनजुमला काही नव्हते. आपल्या मुलाबाळांसह एका लहानशा झोपडीत तो राहात असे व काम करून पोट भरीत असे. काम मुबलक मिळत असे. परंतु महागाई असल्यामुळे जे मिळे ते पोटासाठी सर्व खर्च होत असे. थंडीपासून संरक्षण करण्यासाठी उभ्या कुटुंबात फक्त मेंढ्यांच्या कातडीचा तयार केलेला गरम कोट होता. त्यांना आणखी एका कोटाची फार आवश्यकता होती. थंडी पडण्यापूर्वी सायमनने काही पैशाची बचत केली होती. तीन रुबलची एक नोट बायकोजवळ सुरक्षित होती; शिवाय पाच रुबलपर्यंत लोकांकडून येणे होते.

एके दिवशी सकाळी तो मेंढीचे कातडे खरेदी करण्याकरिता घराबाहेर

पडला. त्याने आपल्या अंगात शर्ट घातला. बायकोने तयार केलेले जाकीट व स्वत: विणून तयार केलेला कोट घातला. तीन रुबलची नोट खिशात घातली व जेवण करून तो निघाला. लोकांकडचे पाच रुबल मी वसूल करीन व माझ्याजवळचे तीन रुबल त्यात घालून कोटासाठी आठ रुबलचे मेंढीचे कातडे विकत घेईन, असे त्याने आपल्याशी ठरविले.

तो एका खेडेगावात एका शेतकऱ्याच्या झोपडीजवळ आला. शेतकरी घरी नव्हता. शेतकऱ्याचे बायकोने वायदा केला की, आम्ही आमचे देणे पुढच्या आठवड्यात देऊन टाकू. सायमन दुसऱ्या घरी गेला. शेतकरी भेटला, परंतु त्याच्याजवळ पैसे नव्हते. फक्त वीस कोपेक देण्यास तो तयार झाला (१०० कोपेक म्हणजे १ रुबल). उधारीने मेंढीचे कातडे मिळाले तर पाहावे, म्हणून सायमनने प्रयत्न केला, परंतु तो वाया गेला. कातडे विकणाराने रोखठोक जबाब दिला - 'पैसे रोख आण, आणि वाटेल ते कातडे निवडून घे. उधारी वसूल करण्यास काय त्रास होतो याची मला पूर्ण कल्पना आहे.' सायमनलाही हे त्याचे बोलणे पटले. केवळ वीस कोपेकपेक्षा जास्त उधारी वसूल झाली नाही. तळ लावण्याकरिता एका शेतकऱ्याने एक बुटाचा जोड दिला, एवढे नवीन काम मात्र त्याला मिळाले.

सायमन बराच कष्टी झाला. त्याने वीस कोपेकची व्होडका दारू घेतली व कातडे खरेदी न करता तो तसाच घराकडे परतला. सकाळच्या प्रहरी त्याला थंडी वाजत होती. परंतु आता थोडी दारू घेतल्यामुळे त्याचे अंगात उष्णता आली होती. रस्त्यावर पडलेल्या बर्फावर एका हाताने काठी मारीत, दुसऱ्या हातातील बूट हालवीत व स्वत:शीच बोलत तो चालला होता. 'माझ्या अंगात लोकरीचा कोट नाही, तरी पण पुरेशी उष्णता शरीरात उत्पन्न झाली आहे. दारूचे दोन थेंब घेतल्याबरोबर मला पुरेशी ऊब मिळत आहे. मला लोकरीच्या कोटाची काय जरूर आहे ? कातडे नाही खरेदी करता आले तरी त्याची मला पर्वा नाही. बायको थोडी कुरकुर करील, पण त्याला काय उपाय ! दिवसभर

काम करावे व कामाचे पैसे मिळू नयेत, ही केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे ! तो शेतकरी फक्त वीस कोपेक मला देतो. तेवढ्या पैशात काय करावे ? खाण्यापिण्यात ते खर्च करून टाकावेत. दुसरे काय करणार ? तो शेतकरी म्हणतो कसा, 'माझी अडचण आहे;' असेल तुझी अडचण, पण आम्ही काय करावे ? तुम्हाला घर आहे. तुमची दोन जनावरे आहेत व आणखी लागेल ते तुम्हास मिळत आहे. तुम्ही धान्य पैदा करता, परंतु ते आम्हाला विकत घ्यावे लागते. एका आठवड्याला केवळ धान्यासाठी तीन रुबल आम्हाला खर्च करावे लागतात. घरी जावे तो धान्य नसते. कोठून तरी पैशाची जुळवाजुळव करावी लागते. तरी कृपा करून आमचे देणे देऊन टाका. न देण्याचा अविचार करू नका.'

इतके आपल्या मनाशी तो पुटपुटतो आहे तो रस्त्याचे बाजूस असलेल्या एका देवळाजवळ तो आला. देवळाचे मागील बाजूस कायसेसे पांढरे त्याला दिसले. दिवसाचा प्रकाश थोडा मंद होत चालला होता. पांढरे काय आहे, म्हणून तो निरखून पाहू लागला. 'यापूर्वी तेथे पांढरा दगड नव्हता, आताच कोठून आला ? तो बैल असावा काय ? छे:! तो बैलासारखा दिसत नाही. डोके तर माणसासारखे दिसते, परंतु ते इतके पांढरे कसे असू शकेल ! आणि मनुष्य आहे असे धरून चालले तरी तो तेथे कशासाठी जाणार !' काय आहे ते पाहण्याकरिता सायमन जास्त जवळ गेला. तो खरोखरीच मनुष्य असल्याचे त्यास दिसून आले. परंतु तो जिवंत आहे की मृत आहे, याचा निर्णय त्यास करता येईना. तो नग्नस्थितीत असून हालचाल न करता पडलेला पाहून सायमनला भीतीच वाटली. कोणीतरी याला ठार मारले, याची चीजवस्तू हरण करून घेऊन गेले व याला इथेच टाकून दिले असे त्याला वाटले. 'इथे आपण काही कमी जास्त करावे, तर नसते लचांड मागे लावून घेण्यासारखे आहे.' असा विचार करून तो चांभार त्या देवळाचे बाजूने जरा पुढे गेला व तो मनुष्य न दिसेल अशा ठिकाणी उभा राहिला. इतक्यात तो मनुष्य हलल्याचे व आपण

ज्या बाजूला आहोत त्या बाजूला पाहिल्याचे त्यास दिसून आले. तो चांभार अधिकच भ्याला व स्वत:शी विचार करू लागला, 'मी या माणसाकडे जाऊ की असाच पुढे निघून जाऊ. मी त्याचेजवळ गेलो तर काही भीतिदायक प्रसंग ओढविण्याचा संभव दिसतो. तो कोण आहे, हे कोणी सांगावे ? काही चांगला हेतू मनात ठेवून तो खात्रीने इथे आला नसला पाहिजे. मी जवळ गेलो तर तो माझ्या मानगुटीवर बसून माझी मान मोडल्याशिवाय राहणार नाही ! हा प्रसंग आला नाही असे घटकाभर धरून चालले तरी या माणसाला मला काय मदत करता येणार ! तो बोलून चालून नागडा! असे कपडे तरी माझ्याजवळ कोठे आहेत की, ते मी यास देऊ शकेन. या प्रसंगातून मी सुटलो तर परमेश्वरी कृपाच समजायची !'

असा विचार करून तो चांभार तसाच पुढे झटकला. परंतु हे करणेही त्याचे मनास खाऊ लागले. तो स्वत:शीच पुटपुटला, 'सायमन, हे काय करतो आहेस ? तो मनुष्य भुकेने व्याकूळ होऊन मरत आहे आणि तू त्याला भिऊन सोडून जातोस ? चोराचे भय बाळगायला तू श्रीमंत कधी झालास ? अरेरे ! सायमन, ही तुला केवढी लाजिरवाणी गोष्ट आहे !' सायमन माघारा परतला.

सायमन त्या परक्या माणसाजवळ गेला व त्याने त्याच्याकडे पाहिले. बर्फाने गारठलेला, भयभीत झालेला व डोळे उघडण्यासही शक्ती नसलेला तो एक तरुण मनुष्य असल्याचे त्यास दिसून आले; मात्र अंगावर मारहाण झाल्याचे कोणतेही चिन्ह त्यास दिसेना. त्या तरूणाने वर डोके करून सायमनकडे प्रेमदृष्टीने पाहिले. सायमनचे मनात त्याच्याविषयी एकदम दया उत्पन्न झाली. त्याने आपल्या हातातील बूट खाली ठेवला व अंगातील कोट काढला. 'आता ही बोलण्याची वेळ नाही, उठ, हा कोट अंगावर घाल.' तो त्या तरुणास म्हणाला. सायमनने त्या मनुष्यास उठण्यास मदत केली. तो उठल्यानंतर सायमनने आपला कोट त्याच्या अंगावर टाकला, परंतु त्या तरूणास बाह्या घालता येईनात. सायमनने बाह्या घालण्यास त्यास मदत केली व कोटाच्या गुंड्या नीट

बसविल्या. सायमनने आपली फाटकी टोपी त्याच्या डोक्यास घालण्याचा विचार केला; परंतु माझ्या डोक्यास टक्कल असून याचे डोक्यास पुरेसे केस असल्यामुळे मीच ती टोपी घालणे इष्ट, असे वाटून त्याने ती टोपी पुन्हा आपल्या डोक्यास घातली. नीट करण्याकरिता हातात आणलेला बूट त्याच्या पायात चढविला व अंगात ऊब आणण्यासाठी थोडे चालल्याबद्दल त्याला तो विनंती करू लागला.

तो तरुण उभा राहिला. त्याने सायमनकडे पाहिले, परंतु त्यास तोंडाने शब्दोच्चार करता येईना. 'तू का बोलत नाहीस ?' सायमनने विचारले. 'इथे फार थंडी पडली आहे, आपण घरी गेल्यास बरे पडेल. तुला पाहिजे असल्यास ही माझी काठी घे व टेकीत टेकीत चल.' तरूणाने चालण्यास प्रारंभ केला व थोड्याच वेळात नेहमीप्रमाणे तो सहज पावले टाकू लागला. थोडे चालून गेल्यावर सायमनने त्यास विचारले, 'आपण कोठचे राहणारे ?'

'मी या देशाचा नाही.' एवढाच जबाब त्या तरूणाने दिला.

'असं मला वाटलंच; परंतु इकडे तुम्ही कसे आलात ?'

'ते माझे मलाच सांगता येत नाही.'

'तुम्हाला कोणी वाईट तऱ्हेने वागविले काय ?'

'कोणीही मला वाईट तऱ्हेने वागविले नाही, परमेश्वराने मला योग्य ती शिक्षा दिली, दुसरे काय ?'

'ईश्वर सर्वसत्ताधीश आहे. तरी पण अन्न आणि पाणी आपण स्वत:करता शोधलेच पाहिजे. तुम्हाला कोठे जावेसे वाटते ?' सायमनने विचारले.

'मी कुठेही गेलो तरी सारखेच !'

सायमनला आश्चर्य वाटले. मनुष्य तर लबाड दिसेना व आपली हकीकत काय आहे तीही सांगेना. बोलणे पाहावे तर अत्यंत नम्रपणाचे. याला काय झाले असावे बरे ! याचा त्याला काही अंदाज येईना. शेवटी 'तुम्ही माझ्याबरोबर

घरी चला व अंगात उष्णता आल्यानंतर पाहिजे तर दुसरीकडे कोठे जा.' असे त्याने त्या तरुणास सुचविले.

सायमन आपल्या घरी जाण्यास निघाला व त्याबरोबर तो तरुणही निघाला. गार वारा वाहू लागला व अंगात नुसता शर्ट असल्यामुळे सायमनला थंडी वाजू लागली. या वेळपर्यंत त्याची दारूची नशा पार मावळून गेली होती. तो तोंडाने हु: हु: करीत व अंगात घातलेले जाकीट जास्त घट्ट धरून चालू लागला. थंडीपासून आपला बचाव व्हावा म्हणून मेंढीचे कातडे आणण्यासाठी आपण घराबाहेर पडलो काय व मेंढीचे कातडे तर नाहीच, पण साधा कोटही मला खरेदी करता आला नाही; उलट असहाय असा एक तरुण पोहोचविण्याकरिता आपण घरी नेत आहोत; माझ्या बायकोला - मॅट्रीनाला - हे खात्रीने आवडणार नाही.' बायकोला काय वाटेल हा विचार येऊन सायमन खिन्न झाल्यासारखा दिसला. परंतु एका परक्या माणसास आपण दयेने वागविले, हा विचार मनात येऊन त्यास समाधान वाटले.

सायमनच्या बायकोने त्या दिवशी सकाळी सर्व प्रकारची तयारी केली होती. तिने लाकडे तोडली, पाणी आणले, मुलांना खाऊ घातले, स्वत: जेवली व स्वस्थ विचार करत बसली. 'भाकरी आज करावी लागेल की उद्या केली असता चालेल ?' ती मनाशी विचार करू लागली. 'अजून बरीच भाकरी पडली आहे. सायमन जेवण करून आला तर त्याला संध्याकाळी भाकरी लागणार नाही; म्हणजे आणखी एक दिवस हीच भाकर पुरविता येईल.' तिने भाकरी पुन्हा काढून आपल्या हातावर घेतली, तिच्या वजनाचा अंदाज केला व आता भाकरी करण्याची आवश्यकता नाही; असे मनाशी ठरविले. 'आता एका वेळच्या भाकरीचे पीठ उरले आहे व हे पीठ आपण शुक्रवारपर्यंत उपयोगात न आणले तरी चालेल.' असा विचार करून मॅट्रीनाने भाकरी बाजूला ठेवली व आपल्या नवऱ्याचा फाटका शर्ट घेऊन ती टेबलावर शिवत बसली. शिवता शिवता आपला नवरा मेंढीचे गरम कातडे विकत घेण्याकरता गेला आहे, या

गोष्टीची तिला आठवण झाली. 'दुकानदाराने आमच्या मालकाला फसविले नाही म्हणजे मिळवली. ते तसे भोळसटच आहेत. ते दुसऱ्याला फसवीत नाहीत, पण स्वत: मुलाकडूनही फसले जातील. आठ रुबल म्हणजे काही लहान रक्कम नाही. या किमतीत चांगला कोट विकत मिळेल. उत्तम कमावलेल्या कातड्याचा तो मिळणार नाही, परंतु थंडीपासून संरक्षण होण्याइतका तो खास मिळेल. गेल्या थंडीमध्ये कोट न मिळाल्यामुळे आमचे कोण हाल झाले. मला पाणी आणण्याकरिता नदीवर जाता येईना की बाहेर कोठे जाता येईना. सायमन जाताना सर्व कपडे घेऊन गेला आहे. माझ्याकरता काहीच ठेवले नाही. तो आज अगदी पहाटेस निघाला नसला तरी त्याची येण्याची वेळ झाली. एखाद्या दारूच्या गुत्त्यात न जावो म्हणजे झाले.'

मॅट्रीना असा विचार करते आहे तो कोणाची तरी पावले वाजल्याचा आवाज तिला ऐकू आला व ती चटकन् दाराजवळ गेली. तिला सायमन व त्याच्याबरोबर असलेला एक बोडका मनुष्य दिसला. मॅट्रीनाला एकदम दारूचा वास आला, म्हणून ती नवऱ्याकडे पाहते तो त्याच्या अंगात कोट नसून तिचे जाकीट आहे, बरोबर कशाचेही पुडके दिसत नाही; उलट हिरमुसले तोंड करून जो स्तब्ध बसलेला पाहून मॅट्रीनाचे काळीज धस्स झाले. 'याने या वाईट माणसाच्या संगतीने सर्व पैसे दारूत घालविले' असा तिने कयास बांधला. तिने त्यांना आत घेतले व त्यांचे मागोमाग घरात आली. परका मनुष्य तरुण असून सडपातळ आहे व त्याच्या अंगात आपल्या नवऱ्याचा कोट असून त्याखाली शर्ट नसल्याचे तिला दिसून आले. तो परका मनुष्य स्तब्ध उभा राहिला, वर देखील पाहीना; त्यावरून हा वाईट मनुष्य असला पाहिजे, असा तिने तर्क केला. मॅट्रीनाने कपाळाला आठ्या घातल्या व चुलीजवळ ही मंडळी पुढे काय करतात हे पाहण्यासाठी ती स्तब्ध झाली. सायमनने डोक्यावरील टोपी काढली व तो बाकावर बसला; जणू काय विशेष असे झालेच नाही. 'आटोप; मॅट्रीना, जेवण झाले असल्यास आम्हास वाढ,' तो म्हणाला.

मॅट्रीना स्वत:शीच काही तरी पुटपुटली व काही हालचाल न करता चुलीजवळ तशीच बसून राहिली. एकदा एकाकडे पाहावे, नंतर दुसऱ्याकडे पाहाचे व रागाने पुन्हा मान फिरवावी, असा तिने क्रम चालविला. बायकोला राग आल्याचे सायमनने ताडले, परंतु ही गोष्ट आपल्या लक्षात आली नाही, हे भासविण्याचा त्याने प्रयत्न चालविला. त्याने आपल्या मित्राचे हातास धरून, 'मित्रा, बस खाली, आपण आता जेवण करू,' असे म्हणून त्यास खाली बाकावर बसविले.

'आमच्याकरता काही शिजवले नाहीस काय ?' असे सायमनने विचारतास मॅट्रीना रागाने फणफणली - 'होय, शिजवले आहे, परंतु तुमच्याकरता नाही, माझ्याकरता. दारू पिऊन तुम्ही आपली अक्कल पार घालवली असे वाटते. मेंढीचे कातडे आणण्याकरता म्हणून तुम्ही बाहेर पडलात व आपला कोट गमावून एका कफल्लक व भटक्या माणसाला बरोबर घेऊन आलात. पुन्हा दारूड्यांना द्यायला माझ्या घरात अन्न नाही.'

'बस् बस् मॅट्रीना ! वेड्यासारखी उगीच बडबडू नकोस. मनुष्य कोण आहे, काय आहे, त्याची चौकशी -'

'मग तुम्ही आपल्या पैशाचे हो काय केलेत ?' मॅट्रीना एकदम कडाडली!

'हे पहा तुझे पैसे -' असे म्हणून सायमनने तीन रुबलची नोट खिशातून काढली व ती उलगडून मॅट्रीनाच्या पुढे केली. मॅट्रीनाने ती हिसकावून घेतली व म्हणाली, 'तुमच्याकरता मजजवळ अन्न नाही. जगातील सगळ्या दारुड्यांना आम्ही पोसायचा काही मक्ता नाही घेतला !'

'जरा तोंड आवरशील का ? प्रथम या गृहस्थाला काय सांगायचे आहे ते सांगू तर दे.'

'मूर्ख दारूबाजापासून शहाणपण मला नको आहे. तुमच्यासारख्या दारूबाजाबरोबर मी लग्न केले हा खरोखरी माझाच मूर्खपणा ! माझ्या आईने दिलेले कपडे विकून तुम्ही दारू प्यालात. आता कापड खरेदी करण्याकरता

गेलात व दारू पिऊन आलात.'

या माणसाची गाठ कशी पडली, आपण वीस कोपेकपेक्षा जास्त काही खर्च केला नाही, हे सायमनला आपल्या बायकोस सांगायचे होते, परंतु ती बोलू देईल तेव्हा ना ! वड्याचे तेल वांग्यावर काढून तिने भांडणास सुरुवात केली. भांडण इतके विकोपास गेले की शेवटी तिने नवऱ्याची पैरण धरून ओढली व 'द्या माझ्या आईने दिलेले माझे जाकीट' असे म्हणून ते हिसकावून घेऊ लागली.सायमनने जाकीट काढून दिले. या झटापटीत ते थोडेसे फाटलेही. जाकीट घेऊन घराबाहेर निघून जावे, असे तिला वाटले; परंतु तो परका माणूस काय लायकीचा आहे हे समजावून घेण्यासाठी ती तेथे थांबली. 'हा जर सज्जन असता' ती म्हणाली, 'तर हा असा वस्त्रहीन का हिंडता ? शीलवान असता तर त्याचा लाभ कोठे घडला हे तुमच्याकडून नसते का सांगणे झाले ?'

'अगं ! मी तर तेच सांगण्याचा केव्हाचा प्रयत्न करीत आहे. मी त्या वाटेतील देवळाजवळ आलो त्या वेळी हा गृहस्थ तेथे उघडा-बोडका व बर्फाने गारठलेला असा दिसला. उघडे बसण्याची का ही हवा आहे ? परमेश्वराने मला त्याच्याकडे पाठविले, नाही तर बिचारा मरूनच जायचा ! मी अशा वेळी काय करावे हे माझे मला कळेना. त्याची काय गती झाली असती हे आज कसे सांगावे ? मी त्याला जवळ केले, त्याच्या अंगावर कपडे घातले व त्यास येथे घेऊन आलो. मॅट्रीना, इतके रागावू नकोस. असे करणे पाप आहे, हे लक्षात ठेव. अग, एके दिवशी आपणा सर्वांनाच मरायचे आहे !'

मॅट्रीना रागाने काही बोलणार होती, परंतु त्या परक्या माणसाच्या तोंडाकडे पाहून ती स्तब्ध झाली. तो परका माणूस बाकाचे एका बाजूस शांत बसला होता. हात गुडघ्याभोवती, हनुवटी छातीवर, डोळे मिटलेले व दुःखाने भुवया चढविलेल्या अशा स्थितीत त्याला पाहून सायमन म्हणाला, 'मॅट्रीना, तुला दया-माया काही आहे का ?' मॅट्रीनाने पुन्हा त्या गृहस्थाकडे पाहिले व तिचेही अंत:करण द्रवले. ती तडक घरात गेली ! काय होते नव्हते ते जेवणाकरता

घेऊन आली व काटे चमचे टेबलावर मांडून त्यांना जेवायला बोलावले. सायमन त्या तरुणाला बरोबर घेऊन जेवायला लागला. भाकरी कुस्करून आमटीत घातली. मॅट्रीना एका बाजूला असून पाहुण्याच्या तोंडाकडे निरखून पाहात होती. तिच्या मनात त्याच्याबद्दल थोडी दया उत्पन्न झाली. पाहुण्याचा चेहराही जरा खुलला. कपाळावरच्या आठ्या नाहीश्या झाल्या व हसतमुखाने तो मॅट्रीनाकडे पाहू लागला.

जेवण झाल्यावर मॅट्रीनाने खरकटी ताटे नेली, टेबल साफ केले व पाहुण्याला स्वत: प्रश्न विचारू लागली.

'तुम्ही कोठून आलात ?' तिने विचारले.

'मी या प्रांतातलाच आहे.'

'परंतु तुम्ही या रस्त्याने कसे आलात ?'

'काय सांगावे ते ?'

'तुम्हाला कोणी चोराने लुबाडले काय ?'

'परमेश्वराने मला शिक्षा केली.'

'आणि तुम्ही तेथे उघडेबोडके पडला होता ?'

'होय, अगदी नग्न स्थितीत व थंडीने गारठून गेलेला. सायमनने मला पाहिले, माझी कीव केली, आपला कोट काढून माझ्या अंगावर घातला व मला इथे आणले. तुम्ही मला अन्नपाणी दिले व माझ्यावर करुणा केलीत. परमेश्वराचे घरी हे रुजू झाल्याशिवाय राहणार नाही !'

मॅट्रीना उठली व सायमनचा जो जुना शर्ट तिने शिवून दुरुस्त केला होता तो शर्ट व एक पायजमा पाहुण्यास घालायला दिला व म्हणाली, 'हा शर्ट अंगात घाला व तुम्हाला पाहिजे तर वरच्या खोलीत किंवा येथे चुलीच्या उबाऱ्यात झोपा.' त्या तरुणाने कोट काढून अंगात शर्ट घातला व तो वरच्या खोलीत जाऊन झोपला. मॅट्रीनाने दिवा विझवला व कोट अंगावर घेऊन ती

चुलीशेजारी पडली. ती बिछान्यावर पडली, परंतु तिला झोप येईना. तो तरुण व त्याची केविलवाणी स्थिती तिच्या डोळ्यांपुढून जाईना. 'आपल्याजवळ होती नव्हती ती भाकर मी यांना दिली, फाटके-तुटके दोन कपडे होत तेही यांना दिले, आता आपल्याजवळ काही उरले नाही,' हा विचार मनात येऊन ती कष्टी झाली; परंतु आपण दिलेल्या अन्न-वस्त्राने तरुणाला किती आनंद झाला ! हे स्मरून तिचे अंत:करण आनंदाने भरून आले.

बराच वेळ मॅट्रीना जागी होती. सायमनही जागाच होता.

'सायमन -' मॅट्रीनाने हाक मारली.

'काय ?' म्हणून सायमनने उलट विचारले.

'आज शेवटची भाकरी मी तुम्हाला दिली. उद्या सकाळच्याकरता काही नाही. उद्या आपण काय खावे ? मला वाटते शेजारच्या मार्थाकडून आपण काही उसने घ्यावे.'

'आपण जिवंत राहिलो तर काही तरी मिळवू', सायमन म्हणाला. मॅट्रीना स्तब्ध राहिली. 'हा परका मनुष्य कोणीतरी मनुष्य दिसतो, परंतु आपण कोण आहोत हे तो का सांगत नाही ?' असे तिने आपल्या नवऱ्यास विचारले. 'न सांगायला त्याला काहीतरी कारण असले पाहिजे,' सायमन म्हणाला.

'सायमन -'

'काय ?'

'आपण दुसऱ्याला देतो, पण दुसरे आपल्याला का देत नाहीत ?' मॅट्रीनाने विचारले.

सायमनला या प्रश्नाला काय उत्तर द्यावे हे सुचेना. 'आता आपण बोलणे बंद करून झोपू या.' असे म्हणून तो झोपी गेला.

सकाळी सायमन उठला. मुले झोपलेलीच होती. बायको शेजारी जाऊन उसनी भाकर मिळते की काय हे पाहण्यास गेली होती. तो तरुण एकटाच

बाकावर बसला होता. त्याच्या अंगात जुना शर्ट व पायजमा होता आणि त्याने वर दृष्टी लावलेली होती. सायमन त्यास उद्देशून म्हणाला, 'मित्रा, या पोटाला अन्न व अंगाला वस्त्र लागते. प्रत्येकाला यासाठी काम करावे लागते. तुला कोणते काम येते ?'

'कोणतेच काम येत नाही' मित्राने उत्तर दिले. हे ऐकून सायमनला आश्चर्य वाटले व तो म्हणाला, 'परंतु ज्याला शिकायची इच्छा आहे तो सहज काहीही शिकतो.'

'माणसे काम करतात व मीही काम करण्यास तयार आहे.'

'तुझे नाव काय ?'

'मायकेल.'

'बरे तर मायकेल, तुला स्वत:बद्दल काही सांगण्याची इच्छा नसेल तर आमचाही फारसा आग्रह नाही; परंतु तुला आपल्या पोटासाठी काही करणे प्राप्त आहे . मी सांगेन त्याप्रमाणे जर तू काम करशील तर मी तुझ्या पोटाला देईन.'

'परमेश्वर तुमचे कल्याण करो ! मी काम शिकण्यास तयार आहे. काय करायचे ते मला सांगा.'

सायमनने लोकर घेतली, आपल्या अंगठ्याजवळ धरली व तिचा धागा कसा तयार करायचा हे दाखवले. मायकेलने ते लक्षपूर्वक पाहिले व सायमनप्रमाणे लोकर घेऊन धागा काढण्यास सुरुवात केली. नंतर त्या धाग्यास मेण कसे लावायचे व कसे शिवायचे हे सायमनने दाखवले व तेही मायकेल शिकला.

सायमनने काही दाखवले तरी मायकेल ताबडतोब समजून घेत असे. तीन दिवसांनंतर एखाद्या माहीतगार चांभाराप्रमाणे तो बूट शिवू लागला. काम करायला बसला म्हणजे सारखा काम करीत असे व खाणेही थोडेच खाई.

काम संपले म्हणजे वर डोळे लावून स्वस्थ बसे. रस्त्यावर क्वचितच जात असे. कारणाशिवाय फारसे बोलत नसे, हसत नसे व थट्टामस्करीही करीत नसे. त्या नवराबायकोंनी त्याला फक्त एकदा हसताना पाहिला आणि ते म्हणजे मॅट्रीनाने त्याला पाहिले, जेवण दिले त्यावेळी.

दिवस गेला, आठवडा गेला, वर्षही निघून गेले. मायकेल सायमनबरोबर काम करीत असे. लवकरच सर्वत्र त्याची ख्याती झाली की, सायमनच्या दुकानातील मायकेलसारखा जोडा शिवण्याचे कामात कोणीही पटाईत नाही.

एका थंडीच्या दिवशी, सायमन व मायकेल काम करीत बसले असता, एक तीन घोड्यांची गाडी त्याच्या झोपडीजवळ येऊन थडकली. त्या दोघांनी खिडकीतून बाहेर पाहिले. गाडीच्या बाजूस असलेल्या नोकराने चटकन् उडी टाकून मालकाकरता दार उघडले. गाडीतून केसाळ कातडीचे कपडे परिधान केलेला एक सभ्य गृहस्थ खाली उतरला व झोपडीत शिरला. सायमनने नमस्कार केला व आश्चर्याने त्याकडे पाहू लागला. पूर्वी त्याप्रमाणे कोणीही गृहस्थ त्याकडे आलेला नव्हता. सायमन काटकुळा होता. तीच स्थिती मायकेलचीही होती. मॅट्रीना तर हाडाचा सापळाच होती. हा मनुष्य मात्र कोणत्या तरी वेगळ्या जगातून आल्याचा भास होत होता. अंगाने जाड, लालबुंद चेहरा व रेड्यासारखी ताठ गर्दन; एकंदरीत जणू काय लोखंडाचा ओतीव पुतळाच !

तो गृहस्थ बाकावर बसला, अंगावरील गरम कोट काढून बाजूला ठेवला व तंबाखू ओढता ओढता म्हणाला, 'तुमच्यापैकी मालक कोण ?' सायमन पुढे होऊन, हात जोडून 'मी, सरकार' म्हणाला. नंतर त्या गृहस्थाने आपल्या माणसाला कातडे आणायला सांगितले व ते टेबलावर पसरून तो सायमनला म्हणाला, 'हे कातडे पाहिलेस का ?' सायमनने, 'हो, महाराज' म्हणून उत्तर दिले. 'पण कोणत्या जातीचे कातडे आहे हे कळले का ?' सायमन ते कातडे चाचपून पाहू लागला व म्हणाला, 'ओहो ! हे चांगले कातडे आहे.'

'चांगले ! हा वेड्या, असे कातडे तुला पूर्वी पाहायला तरी मिळाले होते

का ? हे जर्मन कातडे आहे. या तुकड्याला मला वीस रुबल पडले.'

सायमन आश्चर्याने म्हणाला, 'सरकार, असले कातडे आम्हाला कोठून पाहायला मिळणार ?'

'खरे आहे तुझे म्हणणे ! बरे, या कातड्याचा माझ्यासाठी लांब बूट बनवायचा आहे.'

'होय सरकार, तो मी बनवू शकेन.'

'काय, बनवू शकशील ?' तो गृहस्थ ओरडून म्हणाला. 'तू कोणाकरता हा बूट तयार करणार आहेस व कातडे किती किंमतीचे आहे, हे लक्षात ठेव. हा बूट कमीत कमी मला एक वर्षभर टिकला पाहिजे. या मुदतीत त्याचा आकार वेडावाकडा होता कामा नाही व तो उसवताही कामा नाही. असा जोडा बनविता येत असेल तर तसे स्पष्ट सांग, नाहीतर नाही म्हणून सांग. जर बूट उसवला किंवा आकार वेडावाकडा झाला तर मी तुला तुरुंगात टाकीन. जोडा चांगला टिकून राहिला तर तुझ्या कामाबद्दल मी तुला दहा रुबल देईन.'

सायमन थोडा घाबरला व काय उत्तर द्यावे हे त्यास कळेना. त्याने मायकेलकडे पाहिले व कोपराने खुणावून हळूच विचारले, 'मी हे काम अंगावर घेऊ का ?'

मायकेलने काम घ्या म्हणून मान हलवून सुचविले. मायकेलने सुचविल्यावरून सायमनने कामाची जबाबदारी पत्करली. त्या गृहस्थाने आपल्या गड्याकडून आपला बूट काढला व सायमनपुढे पाय करून पायाचे माप घेण्यास सांगितले. सायमनने आपल्या कपड्याला हात पुसून व कागद घेऊन तो माप घ्यायला लागला. एक कागद पुरेना म्हणून दुसरा घेतला. 'माप नीट घे, नाहीतर बूट आवळ व्हायचा' त्या श्रीमंत गृहस्थाने बजावले. सभोवार पाहता पाहता त्याची दृष्टी सहजच मायकेलकडे गेली व त्याने विचारले, 'हा कोण आहे ?'

'हा माझ्या दुकानातील कारागीर आहे. तोच हा बूट शिवणार आहे.'

'नीट लक्षात ठेव, एक वर्ष टिकेल अशा रीतीने तो बांध.'

सायमनने मायकेलकडे पाहिले, तो मायकेल त्या गृहस्थाकडे पाहात नसून त्याच्या पलीकडील कोपऱ्यात कोणाकडे तरी पाहात आहे, असे दिसले. मायकेल त्या बाजूला सारखा पाहात होता. नंतर तो थोडा हसला. त्याचा चेहरा सतेज दिसू लागला.

'अरे खुळ्या, कोणाकडे पाहून तू दात विचकतोस ? वेळेवर हा बूट तयार झाला पाहिजे. या गोष्टीकडे जरा ध्यान दे; समजलास का ?' त्या गृहस्थाने बजावले.

'तो बूट अगदी वेळेवर होईल सरकार,' मायकेलने प्रत्युत्तर केले. 'हे नीट लक्षात ठेव' असे म्हणून त्या श्रीमंत गृहस्थाने आपला बूट घातला व कोट अंगावर घेऊन गडबडीने तो बाहेर पडू लागला, तो दाराच्या चौकटीवर त्याचे कपाळ आपटले. कपाळ चोळत व तोंडाने काही अपशब्द पुटपुटत तो गाडीत बसला व निघून गेला.

'पाहिलास ना मनुष्यजातीचा नमुना ?' सायमन उद्गारला. 'हातोडा डोक्यात घातला तरी याला मरण यायचे नाही. माझ्या दाराची चौकट मात्र याने खिळखिळी केली; परंतु त्याच्या डोक्याला काहीही इजा झाली नाही.' सायमन म्हणाला.

'अशा तऱ्हेने निष्काळजीपणाने आयुष्य घालविल्यावर कोण धडधाकट राहणार नाही? या कणखर खडकाला प्रत्यक्ष काळ तरी स्पर्श करू शकेल का?' मॅट्रीना बोलली.

नंतर सायमन मायकेलला म्हणाला, 'हे पाहा, आपण आता काम तर पत्करले आहे. कबूल केल्याप्रमाणे हे बिनबोभाट झाले पाहिजे. कातडे किंमतीचे आहे व गिऱ्हाईक थोडे रागीट आहे. आपण कोणत्याही प्रकारची चूक करता

कामा नये. तुझे डोळे माझ्यापेक्षा चांगले असून हातही कुशल आहेत. तेव्हा मापाप्रमाणे तू कातडे काप, मी जोड्याचा पुढचा भाग नीट शिवून देतो.'

मायकेलने सांगितल्याप्रमाणे केले. त्याने ते कातडे घेतले, टेबलावर पसरले, दुहेरी केले व रापी घेऊन ते कापण्यास सुरुवात केली. मॅट्रीनाने त्याला ते कातडे कापताना पाहिले. ती या कारागिरांना कातडे कापताना नेहमी पाहात असे. बुटासाठी कातडे जसे कापायला पाहिजे तसे ते न कापता हा असे वाटोळे का कापतो आहे याचा तिला उलगडा होईना. तिला काही विचारावेसे वाटले, परंतु आपल्याला यात काय समजते आहे, उगीच मध्ये तोंड घालणे बरे नाही; असा विचार करून तिने मुग्धता स्वीकारली.

कातडे कापल्यानंतर मायकेलने ते शिवण्यास घेतले. बूट जसा शिवायला पाहिजे तसे ते कातडे शिवले जात नाही, हे पाहून मॅट्रीनाला पुन्हा आश्चर्य वाटले; परंतु तिला बोलण्याचे धैर्य होईना. दुपारपर्यंत शिवण्याचे काम मायकेलने सारखे चालू ठेवले. नंतर सायमन जेवणाकरता उठला, त्याने सहज सभोवार पाहिले. तो त्यास मायकेलने बुटाचे ऐवजी स्लीपर तयार केल्याचे दिसून आले.

'अरेरे ! गृहस्था, तू हे काय केलेस ? एक वर्ष तू माझ्याबरोबर काम करतो आहेस, परंतु अशा प्रकारची चूक तू कधीही केली नाहीस. त्या गृहस्थाने गुडघ्यापर्यंतचे लांब बूट करायला सांगितले व तू त्याचे स्लीपर बनविलेस ! त्याला मी काय उत्तर देऊ ? असले कातडे मला परत तरी देता येईल का ? मित्रा, तू माझा सर्वस्वी घात केलास !' याप्रमाणे सायमन बोलतो आहे तोच रपरप असा आवाज दारी ऐकू आला. इतक्यात कोणी तरी दार ठोठावले. त्यांनी दार उघडले व जो नोकर पूर्वी त्या थोर गिऱ्हाईकाबरोबर आला होता, तो आत आला. उभयता नमस्कार झाल्यानंतर 'काय हुकूम आहे ?' म्हणून सायमनने विचारले. 'बाईसाहेबांनी मला बुटासंबंधी पाठविले आहे.' 'बुटासंबंधी काय ?' पुन्हा सायमनने विचारले.

'आपण ते बूट तयार करू नका. आमचे मालक वारले आहेत.'

'अस्सं !' सायमन आश्चर्याने उद्गारला.

'आम्ही येथून निघालो तो मालकांचा गाडीतच अंत झाला. घरी गेल्यावर गाडीचे दार उघडून पाहातो तो मालक एखाद्या पोत्याप्रमाणे गाडीतून मृतस्थितीत बाहेर पडले ! बाईसाहेबांनी मला आपल्याला कळविण्यासाठी मुद्दाम पाठविले आहे की, आता बुटाची जरूर नसून त्या कातड्याचे मृताकरिता स्लीपर तयार करावेत. थोडे इथेच थांबून स्लीपर बरोबर घेऊन येण्यास त्यांनी मला सांगितले आहे व मी यासाठी घाईघाईने आपणाकडे आलो आहे.' मायकेलने स्लीपर व उरलेले कातडे नोकराजवळ दिले व नोकर त्यांना नमस्कार करून घरी परतला.

या गोष्टीला काही वर्षे लोटली. सायमनबरोबर काम करायला लागून मायकेलला सहावे वर्ष लागले होते. पूर्वीप्रमाणे त्याचे काम चालू होते. तो बाहेर कोठे जात नसे व जरूर असेल तेवढेच बोलत असे. या पाच वर्षांत तो फक्त दोन वेळा हसला. प्रथम जेव्हा मॅट्रीनाने त्यास जेवायला दिले तेव्हा व दुसऱ्यांदा जेव्हा तो श्रीमान् गृहस्थ सायमनकडे आला होता तेव्हा. सायमन त्याच्या कामावर नेहमी खूष असे. तुम्ही कोठून आला हे आता तो मायकेलला विचारीनासा झाला. मायकेल गेला तर कसे होईल, ही भीती मात्र त्याला वाटू लागली होती.

एके दिवशी सर्व मंडळी घरी होती. मॅट्रीना स्वयंपाक करत होती. मुले इकडे तिकडे धावपळ करीत खेळत होती. एका खिडकीजवळ सायमन जोडे शिवत होता व दुसऱ्या खिडकीजवळ मायकेल बुटास टाच लावीत होता. एक मुलगा मायकेलजवळ आला, मायकेलच्या खांद्यावर त्याने हात ठेवले व खिडकीबाहेर पाहिले.

'ते पहा मायकेलकाका, एक बाई आपल्या दोन मुलींना घेऊन इकडे येत आहे. त्या मुलींपैकी एक मुलगी लंगडी आहे.' हे ऐकल्याबरोबर मायकेलने

हातातील काम खाली ठेवले व खिडकीमधून रस्त्यावर पाहिले. सायमनला आश्चर्य वाटले. मायकेल सहसा बाहेर पाहात नसे, परंतु या वेळी खिडकीवर रेलून तो कोणाकडे तरी टक लावून पाहात होता. सायमनही बाहेर पाहू लागला, तो त्यास चांगला पोषाख केलेली स्त्री, दोन हाताला दोन मुली घेऊन आपल्याकडे येत असल्याचे दिसून आले. दोघा मुलींचा तोंडावळा अगदी एकसारखा होता; एका मुलीचा पाय थोडा लंगडा होता, एवढेच. तिने सायमनला प्रथम नमस्कार केला. सायमननेही नम्रपणे आपणांस काय पाहिजे म्हणून विचारले. ती स्त्री टेबलाजवळ बसली, त्या मुली त्या स्त्रीच्या गुडघ्याजवळ झोपडीतील मंडळींना भिऊन की काय कोण जाणे - उभ्या राहिल्या. 'मला या मुलींकरता जोडे पाहिजेत.' ती स्त्री म्हणाली.

'आम्ही इतके लहान जोडे अजून कधीही केले नाहीत, तरी ते आम्ही करून देऊ. माझ्या दुकानातील कारागीर तुम्हाला पाहिजे तसा जोडा बांधून देईल.'

सायमनने मायकेलकडे दृष्टी फिरवली, तर तो काम सोडून त्या दोन मुलींकडे न्याहाळून पहात असल्याचे त्यास दिसून आले. त्या मुली सुस्वरूप असून टापटीपीने पोषाख केलेल्या होत्या; परंतु एकतानतेने मायकेलने त्यांच्याकडे का पाहावे हे सायमनला कळेना. कदाचित या मुली मायकेलच्या परिचयाच्या असाव्यात असे सायमनला वाटले. तरी पण त्याने त्या स्त्रीशी आपला बोलण्याचा क्रम सुरूच ठेवला होता. जोड्याची किंमत ठरली. त्या बाईने त्या लंगड्या मुलीस आपल्या मांडीवर घेतले व पायाचे माप घेण्यास सांगितले. दोघी जुळ्या मुली असल्यामुळे धडक्या व मोडक्या पायाची अशी फक्त दोनच मापे घेण्यात आली. मापे घेतल्यानंतर सायमनने त्या स्त्रीस सहज विचारले की, 'ही मुलगी सुंदर दिसते; परंतु हिचा पाय वाकडा कसा ? ही जन्मत:च लंगडी होती काय ?'

त्यावर त्या स्त्रीने उत्तर दिले, 'नाही, तिच्या आईने तिचा हा पाय असा

वाकडा केला' हे ऐकून मॅट्रीनाला कुतूहल उत्पन्न झाले व हिची आई कोण, काय वगैरे सर्व माहिती तिच्याकडून मिळविली. ती बाई त्या मुलीची आई आहे, अशी प्रथम तिची कल्पना झाली होती. 'एकूण तुम्ही यांची आई नाही तर ?' पुन्हा कौतुकाने मॅट्रीनाने विचारले.

'नाही, मी यांची आई नाही व नातलगही नाही. अर्थाअर्थी यांचा माझा काहीही संबंध नाही. दैववशात या माझ्या पदरी पडल्या, एवढेच.'

'या तुमच्या मुली नाहीत; पण तुमचे तर यांच्यावर पोटच्या मुलापेक्षाही अधिक प्रेम दिसते !'

'प्रेम का असणार नाही ? पोटच्या मुलाप्रमाणे मी त्यांना अंगावर पाजले, माझे स्वत:चे मूल होते; परंतु परमेश्वराने ते नेले ! या मुलीवर मी इतके प्रेम करते की, तितके प्रेम त्या मुलावर करत नसे.'

'मग या कुणाच्या मुली आहेत ?'

नंतर त्या बाईने सर्व पूर्व-इतिहास सांगितला.

'या मुलीचे आईबाप वारून सहा वर्षे झाली. दोघे बिचारे एका आठवड्यात निवर्तले. त्यांचा बाप मंगळवारी वारला, तर आई शुक्रवारी वारली. या मुली बाप वारल्यावर तीन दिवसांनी जन्मास आल्या व यांना जन्म देऊन यांची आई निवर्तली ! मी व माझा नवरा त्याच गावात शेतकरी म्हणून राहात होतो, आम्ही यांचे शेजारी होतो; आमच्या अंगणाला लागून त्यांचे अंगण होते. या मुलींचा बाप लाकूडतोड्या होता. लाकूड तोडीत असता एके दिवशी झाड अंगावर पडून त्याच्या पोटाचा कोथळा बाहेर पडला. घरी आणण्यापूर्वीच बिचाऱ्याचे प्राण निघून गेले. याच आठवड्यात या जुळ्या मुलींना त्याच्या बायकोने जन्म दिला. ती बिचारी घरात एकटीच होती. वडीलधारे मनुष्य कोणीही जवळ नव्हते. या मुलींना जन्म दिला केव्हा व बिचारी मेली केव्हा हेही कोणास कळले नाही.'

'दुसऱ्या दिवशी सकाळी मी तिच्याकडे जाते, तो ती अगोदरच मरून पडलेली मला दिसली. मरताना गडाबडा लोळताना या मुलीच्या पायावर आली व तिचा पाय दुखावला. नंतर गावातले लोक जमा झाले व त्यांनी तिला मूठमाती दिली. ते लोक फार चांगले होते. या अर्भकांना मात्र कोणी सांभाळणारा राहिला नाही. यांचे पालनपोषण कसे करावे हे समजेना. त्यावेळी अंगावर मूल पीत असलेली मी एकटीच बाई होते. माझे दोन महिन्यांचे मूल होते. थोडा वेळ या मुलींचा मी सांभाळ केला. शेवटी गावचे लोक माझ्याकडे आले आणि म्हणाले, 'मेरी ! तू सध्या या मुलींचा सांभाळ कर, दुसरी काही योजना करता येणे शक्य असल्यास आम्ही पाहतो.' प्रथम या धड मुलीस मी विशेष पाजीत असे; कारण ही लंगडी मुलगी जगेल असे मला वाटले नाही. परंतु मी पुढे विचार केला की, या बिचाऱ्या हतभागी मुलीची उपासमार मी का करावी! तिलाही मी पोटभर पाजू लागले. मी तरुण व सशक्त असल्यामुळे तिघांनाही पुरेसे दूध मिळत असे. कधी कधी तर एका वेळी मी दोघांना पाजीत होते, इतके दूध परमेश्वराने मला दिले. परंतु परमेश्वराचा नेमानेम असा की माझा मुलगा दोन वर्षांचा होण्यापूर्वीच मरण पावला ! आज खाऊन पिऊन आम्ही सुखी आहोत, परंतु आम्हास मूलबाळ काही नाही. माझा नवरा गिरणीतील धान्याच्या व्यापाऱ्याचा गुमास्ता म्हणून काम करीत असून त्याला पगारही बरा मिळतो पण या मुली नसत्या तर आमचे आयुष्य किती एकलकोंडेपणाचे गेले असते. यांच्याशिवाय प्रेम करायला आम्हाजवळ काय आहे ? या मुली म्हणजे आमच्या संसाराचा आनंद आहे' असे म्हणून एका हाताने त्या लंगड्या मुलीस तिने कुरवाळले व दुसऱ्या हाताने डोळ्यांत आलेले अश्रू पुसले.

ही हकीकत ऐकून मॅट्रीनाने दुःखाचा उसासा टाकला. व म्हणाली, 'मातापितरांशिवाय एखादे वेळी राहता येईल; परंतु परमेश्वरस्वरूप प्रेमाशिवाय या जगात राहता येणार नाही, असे जे म्हणतात तेच खरे. ती स्त्री आपल्या मुलींना घेऊन निघून गेली. इकडे मायकेल ज्या कोपऱ्यात बसला होता त्या कोपऱ्यातून एकदम प्रकाश दिसू लागला. मायकेलने आपले हात गुडघ्यावर ठेवले असून डोळे वर आकाशाकडे लावले आहेत, असे त्यांस दिसून आले. मायकेल उठला, त्याने सर्वांना नमस्कार केला व म्हणाला, 'आता मला जाण्यास निरोप द्यावा. परमेश्वराने माझ्या अपराधाची क्षमा केली आहे. माझ्या हातून काही आगळीक झाली असल्यास मला क्षमा करावी.'

मायकेलच्या दिव्य देहातून तेव्हा प्रकाश निघत आहे हे सर्वांनी पाहिले. सायमनने आदरपूर्वक मायकेलला नमस्कार केला व तो म्हणाला, 'मायकेल, यापुढे माझ्या घरी तुला राबविणे किंवा केलेल्या चाकरीमध्ये तुझी चूक काढणे शक्य नाही. मला फक्त एवढी माहिती पाहिजे आहे की, मी तुला प्रथम पाहिले व घरी आणले त्यावेळी तू कष्टी का होतास ? तसेच ज्या वेळी माझ्या बायकोने तुला जेवण वाढले त्यावेळी तू हसलास व सतेज झालास; त्याचप्रमाणे तो गृहस्थ बूट तयार करण्यास सांगण्याकरता आला त्याहीवेळी तू हसलास व पूर्वीपेक्षा अधिक सतेज झालास; आणि ती बाई आपल्या मुलींना घेऊन आली त्यावेळी पुन्हा तू हसलास व हे दिव्य तेज तुला प्राप्त झाले. तुझ्या चेहऱ्यावर ही कांती कोठून आली व वरील तिन्ही वेळी तू का हसलास, हे कृपा करून मला कळेल का ?'

मायकेल म्हणाला, माझे पाप पार जळून गेले व मी शुद्ध झालो. या शुद्धीचा हा दिव्य प्रकाश आहे. परमेश्वराने माझ्या पापाबद्दल मला शिक्षा केली होती, परंतु आज त्याने क्षमा केल्यामुळे मी पूर्ववत् झालो आहे. मी तीन वेळा हसलो; कारण परमेश्वराने तीन गोष्टी शिकण्याकरता मला या जगात पाठविले होते. तुझ्या बायकोने ज्यावेळी माझ्यावर दया केली त्यावेळी मी पहिली गोष्ट- किंवा सत्य शिकलो, व म्हणून त्यावेळी मी हसलो. तसेच तो श्रीमंत मनुष्य जेव्हा आपल्या झोपडीत आला, तेव्हा दुसरे सत्य माझ्या प्रत्ययास आले व म्हणून मी दुसऱ्यांदा हसलो; आणि आता ज्यावेळी मी मुलींना पाहिले त्यावेळी मी तिसरे सत्य शिकलो व म्हणून मी हसलो.'

यावर सायमनने पुन्हा विचारले, 'मायकेल ! ईश्वराने तुला का शिक्षा केली? व तीन सत्ये म्हणतोस ती कोणती ? कृपा करून समजावून सांगशील का ?'

मायकेल म्हणाला, 'मी परमेश्वराची आज्ञा अवमानिली म्हणून त्याने मला शिक्षा केली. मी स्वर्गात देवदूत होतो. एकदा देवाने एका स्त्रीचा प्राण हरण करून आणायला मला सांगितले. मी या मर्त्यलोकांत आलो. त्या स्त्रीने दोन जुळ्या मुलींना नुकताच जन्म दिला होता. त्या दोन मुली आईच्या बाजूला चळवळ करीत होत्या. तिला त्यांना स्तनाला लावण्याची शक्ती नव्हती. जेव्हा तिने मला पाहिले तेव्हा यमदूत आल्याचा तर्क तिने केला व ती रडून म्हणाली, 'अहो यमदूतहो ! माझे यजमान अंगावर झाड पडून नुकतेच मरण पावले आहेत. मला कोणी बहीण नाही, आई नाही की आत्या नाही. या माझ्या बाळांची काळजी घेण्यास कोणीही नाही. माझे प्राण हरण करू नका. मरण्यापूर्वी माझ्या या बाळांना निदान चालते बोलते तरी मला करू द्या. आईबापाशिवाय मुले कशी जगू शकतील ? ही तिची प्रार्थना मी मान्य केली. एक मूल तिच्या स्तनाला लावले व दुसरे तिच्या हातात दिले व परत स्वर्गाकडे निघून गेलो आणि परमेश्वराला म्हणालो, 'देवा, मला त्या मातेचे प्राण हरण करण्याचे धैर्य होईना ! झाड पडून तिचा नवरा वारला होता व तिला दोन जुळ्या मुली होत्या. त्यांच्यासाठी स्वतःचे प्राण रक्षण करण्याबद्दल तिने मला विनंती केली. ती म्हणते, 'माझ्या मुलींना मला पोसू द्या व त्यांना चालत्या बोलत्या करू द्या. आईबापांशिवाय मुलांचे संगोपन कोण करील ? मी तिचे प्राण हरण केले नाहीत.' परमेश्वर म्हणाले, 'जा, त्या मातेचे प्राण घेऊन ये व तीन सत्ये शीक. एक म्हणजे मनुष्यामध्ये कांय वास करते ? दुसरे मनुष्याला कोणती गोष्ट दिलेली नाही ? व तिसरे मनुष्य कशावर जगतो ? या तीन गोष्टी शिकल्यावर तू स्वर्गाला परत येशील.' परमेश्वराच्या या शापामुळे मी या मृत्युलोकांत आलो व त्या मातेचे प्राण हरण केले.

त्या बिचाऱ्या मुलींची व त्यांच्या आईची ताटातूट झाली, आईच्या

जड शरीराखाली एका मुलीचा पाय चेंगरला गेला. मी ते प्राण घेऊन जात असता जोराचा वारा सुटला. माझे पंख मोडून मी असहाय स्थितीमध्ये खाली पडलो व त्या बाईचे प्राण एकटेच देवाकडे निघून गेले.

आपल्या घरी इतक्या दिवस जो राहिला व ज्याला आपण अन्नवस्त्र दिले, तो खरोखर कोण होता याची पूर्ण कल्पना सायमन व मॅट्रीना यांना आली. मायकेलविषयी वाटणाऱ्या आदराने व आनंदाने त्यांच्या डोळ्यात अश्रुबिंदू उभे राहिले. तो देवदूत म्हणाला, 'मी एका शेतात वस्त्रहीन असा येऊन पडलो. थंडी, भूक व मनुष्याच्या काय गरजा आहेत याची कल्पना मनुष्य जन्माला येईपर्यंत मला नव्हती. मी भुकेने व्याकूळ झालो, थंडीने गारठून गेलो व काय करावे हे मला कळेना. या शेताशेजारी एक देवाचे देऊळ मला दिसले. तेथे आश्रय मिळेल म्हणून मी गेलो, तो देवळाला कुलूप लागलेले होते व मला आत जाता येईना. म्हणून देवळापाठीमागे निदान गार वाऱ्यापासून तरी माझे संरक्षण व्हावे म्हणून मी बसलो. संध्याकाळ होत आली. मी जास्तच व्याकूळ झालो. इतक्यात त्या बाजूने एक मनुष्य जात असताना मी पाहिले. त्याच्या हातात बूट होते व तोंडाने काहीतरी तो बडबडत चालला होता. मनुष्यदेह मला प्राप्त झाल्यावर पहिला माणूस हाच मी पाहिला. तो मला भयप्रद वाटला म्हणून त्याला टाळण्याचा मी प्रयत्न करू लागलो. थंडीपासून आपला बचाव कसा करावा व बायकामुलांना पोटाला कुठून आणावे याविषयी तो स्वतःशी बोलत होता. मी इथे थंडीने व भुकेने मरत आहे आणि हा मनुष्य तर आपले व आपल्या बायकामुलांचे थंडीपासून रक्षण कसे होईल व त्यांना पोटाला कसे मिळेल याचाच फक्त विचार करतो आहे, असे मला वाटले. जेव्हा त्या मनुष्याने माझ्याकडे पाहिले तेव्हा त्याने आपल्या कपाळाला आठ्या घातल्या; त्यामुळे तर तो पहिल्यापेक्षाही अधिक भेसूर लागला. तो दुसऱ्या बाजूने निघून गेला व मला पूर्ण निराशा वाटली. थोड्या वेळाने त्याच्या पावलांची चाहूल ऐकू आली. मी त्याच्या तोंडाकडे पुन्हा पाहिले, तो त्यात मला पुष्कळ फरक

दिसला. पूर्वी त्याच्या चर्येवर प्रेतकळा दिसत होती, परंतु आता त्याच ठिकाणी जिवंतपणा व परमेश्वर दिसत होता. तो माझ्याजवळ आला, त्याने आपले कपडे माझ्या अंगावर घातले व मला आपल्या घरी नेले. मी घरात गेलो; एक बाई आम्हाला भेटली व बोलवावयास लागली. गृहस्थापेक्षादेखील ही बाई अधिक उग्र दिसली. कठोर वाणी तिच्या मुखातून निघू लागली. आजूबाजूला पसरलेल्या या भेसूर वातावरणामध्ये श्वासोच्छ्वास घेणेदेखील मला कठीण झाले. मला घराबाहेर हाकून देण्याची तिची इच्छा होती व यात आत्मिकदृष्ट्या तिचे मरण होते. इतक्यात तिच्या नवऱ्याने तिला परमेश्वराची आठवण करून दिली व तिच्या वागणुकीत एकदम फरक पडला. तिने जेव्हा मला अन्न आणले त्यावेळी तिच्या चेहऱ्याकडे मी पाहिले, तो त्यावरील मृत्यूची छटा अजिबात गेल्याचे मला दिसू आले. ती जागृत झाली व या स्थितीत तिचे ठिकाणी मला ईश्वराचे वास्तव्य दिसू लागले.'

यावेळी परमेश्वराने दिलेल्या पहिल्या धड्याची मला आठवण झाली. 'माणसामध्ये काय वास करीत आहे ?' माणसामध्ये प्रेम वसत आहे. जे प्रेम मजवर दाखविण्याचे परमेश्वराने कबूल केले होते, ते प्रेम मला मिळू लागले, हे पाहून मला आनंदाने हसू आले. परंतु अजून मला दोन गोष्टी शिकायच्या होत्या. त्या म्हणजे; 'मनुष्याला काय दिलेले नाही' व 'मनुष्य कशावर जगतो.' मी तुमच्याबरोबर राहिलो व एक वर्ष निघून गेले. एक मनुष्य एक वर्षपर्यंत न बिघडता टिकेल असा बूट तयार करण्यास सांगू लागला. मी त्याकडे पाहिले, तो त्याच्यामागे माझा मित्र यमदूत मी पाहिला. माझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही तो यमदूत पाहिला नाही व सूर्यास्तापूर्वी तो या श्रीमान् मनुष्याचे प्राण हरण करून घेऊन जाईल, अशी माझी खात्री होती. मी स्वत:शी विचार केला, हा मनुष्य एक वर्षाच्या गोष्टी बोलतो आहे व आज संध्याकाळी आपणास मरायचे आहे ही गोष्ट त्याला कळत नाही. इथे ईश्वराने दिलेला तिसरा धडा मी शिकलो. 'उद्या आपले काय होईल, हे ज्ञान ईश्वराने मनुष्यास दिले नाही.'

मनुष्यामध्ये काय वास करीत आहे हे मला समजले. मनुष्याला काय दिलेले नाही, हे आता मला आता समजले, म्हणून मी पुन्हा एकदा हसलो. माझा मित्र मला भेटला. तसेच दुसरा धडा मला परमेश्वराने शिकविला याबद्दल मला आनंद वाटला; परंतु अजून एक धडा मला घ्यायचा होता. मनुष्य कशावर जगतो, हे अजून मला शिकायचे होते. मी काही दिवस घालविले. परमेश्वर मला तिसरा धडा शिकवील म्हणून मी वाट पाहात होतो. सहाव्या वर्षी एक बाई आपल्या दोन मुलींना घेऊन इथे आली व त्या मुली जिवंत कशा राहिल्या याबद्दलची सर्व हकीगत तिच्याकडून श्रवण केली. गोष्ट ऐकून मला वाटले, 'या मुलींसाठी त्यांच्या आईने माझ्याजवळ प्राणाची याचना केली, आईबापाशिवाय मुलांचे संगोपन दुसरे कोणी करणार नाही, या तिच्या शब्दावर मी विश्वास ठेवला, परंतु वस्तुस्थिती अशी होती की परक्याने त्या मुलींचे संगोपन केले व त्यांना वाढविले. ज्यावेळी शेजारच्या मुलींसाठी त्या बाईच्या डोळ्यांतून अश्रू आले, त्यावेळी तिच्या ठिकाणी परमेश्वराची जागती ज्योत मला दिसून आली व 'मनुष्य कशावर जगतो ?' हा तिसरा धडा मी शिकलो. परमेश्वराने माझ्या पापांचे क्षालन करून मला ज्ञान दिले म्हणून मी तिसऱ्यांदा हसलो.'

इतके आत्मवृत्त सांगितल्यावर या देवदूताचे जड शरीर प्रकाशमय झाले व त्याचा आवाज मोठा होऊन शब्द जणू काय आकाशातून उठतो आहे, असा भास होऊ लागला. तो देवदूत म्हणाला, 'सर्व माणसे केवळ काळजी करून जगत नाहीत, तर प्रेमावर जगतात, हे मी शिकलो. आपल्या मुलांना त्यांच्या आयुष्यात कशाची जरूर लागेल हे आयांना सांगता येणार नाही. आपल्याला काय लागेल हे श्रीमंतांना कळणार नाही. तसेच कोणाही माणसाला आपल्याला बूट लागतील किंवा आपल्या मृत शरीराला स्लीपर लागतील हे कळणार नाही. माझे कसे होईल या माझ्या काळजीने मी जिवंत राहिलो नाही, तर वाटसरूने माझी करुणा केली, त्याच्या बायकोने माझ्यावर दया दाखविली

म्हणून मी जिवंत राहिलो. त्या पोरक्या मुली जिवंत राहिल्या यास कारण त्यांच्या आईची त्यांच्याविषयीची काळजी नसून, शेजारीण बाईने त्यांच्यावर केलेले प्रेम हेच होय. सर्व माणसे आपल्या स्वत:करता जी काळजी वाहतात त्यामुळे जी जगत नसून सर्वसाधारण मनुष्याच्या ठिकाणी जे प्रेम वसते आहे, त्यामुळे ती जगतात.'

पूर्वी माझी अशी कल्पना होती की, परमेश्वराने मनुष्याला देह दिला व त्याने या जगात राहावे अशी परमेश्वराची इच्छा आहे. परंतु यापेक्षा जास्त ज्ञान मला आता प्राप्त झाले आहे. मनुष्याने केवळ एकट्याने स्वत:पुरती दृष्टी ठेवून जगावे अशी परमेश्वराची इच्छा नसून सर्वांशी मिळून मिसळून त्याने कालक्रमणा करावी, अशी त्याची इच्छा आहे व यासाठी माणसाने कसे वागावे याचे धडे तो सदैव देत असतो. स्वत:पुरते पाहिले म्हणजे आपला चरितार्थ ठीक चालेल असे लोकांना वाटते, परंतु खरे पाहू गेले असता ते दुसऱ्याच्या प्रेमामुळेच जगत असतात. ज्याच्याजवळ प्रेम आहे, तो परमेश्वरामध्ये वास करतो किंवा परमेश्वर त्याचे ठिकाणी वास करतो, कारण परमेश्वर म्हणजेच प्रेम आहे.'

इतके बोलणे झाल्यानंतर त्या देवदूताने परमेश्वराची प्रार्थना आरंभिली. सर्व झोपडी त्याच्या आवाजाने थरारू लागली. छप्पर दूर झाले व जमिनीपासून स्वर्गापर्यंत एक अग्निस्तंभ दिसू लागला. सायमन, त्याची बायको व मुले जमिनीवर मूर्च्छा येऊन पडली. दूताला पंख फुटले व त्यांनी तो स्वर्गात उडून गेला.

सायमन जेव्हा देहभानावर आला, तेव्हा त्याला त्याची झोपडी; आणि तिच्यात असलेले त्याचे कुटुंब पूर्ववत् असल्याचे दिसून आले.